Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST

महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक ३५४ * * नागपूर * बुधवार, दिनांक २६ मार्च २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## दिल्लीत पहिल्यांदाच १ लाख कोटी रुपयांचे बजेट

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २५ :

दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी मंगळवारी पहिल्यांदाच १ लाख कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला. महिला समृद्धी योजनेसाठी ५१०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याद्वारे दिल्लीतील महिलांना दरमहा २५०० रुपये दिले जातील. यमुना स्वच्छ करण्यासाठी ९ हजार कोटी रुपयांचे बजेट आहे.

मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी आयुष्मान योजनेसाठी २१४४ हजार कोटी रुपयांचे बजेट ठेवले आहे. केंद्र सरकारकडून तुम्हाला ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार नक्कीच मिळतील. याशिवाय, दिल्ली सरकार त्यांच्याकडून ५ लाख रुपये देखील जोडत आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### वानराच्या गळ्यात मोत्याची माळ

सध्या बांगलादेशचे तात्पुरते राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून न आलेल्या मोहम्मद युनूस यांची नेमणूक झालेली आहे. निवडणुकीतून निवडून आलेल्या आणि बांगलादेशला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या शेख मुजीबूर रहमान यांची कन्या शेख हसीना यांच्याविरुद्ध काही अतिरेक्यांनी अतिरेक करून बांगलादेशात असंतोष पेटविलेला आहे. अखेर शेवटच्या घटकेला शेख हसीना यांना बांगलादेशातून पलायन करावे लागले. त्या पलायनाला एक तास जरी उशीर झाला असता. तरी जातीयवादी आक्रमक अतिरेक्यांनी त्यांची हत्याच केली असती. त्यांचे विमान आधी भारतात उतरले. नंतर त्या इतर एखाद्या देशात आश्रय घेतील, असा कयास लावला जात होता. पण ते जमले नाही आणि त्यांना भारतातच राहावे लागले. ज्या शेख मुजीबूर रहमान यांनी पाकिस्तानच्या तावडीतून बांगलादेश मुक्त केला. त्यांच्याच स्मृती आता नष्ट केल्या गेल्या. बंगाली अतिरेकी आणि त्यांना फूस देणारे पाकिस्तानी लष्करवाले यांनी बांगलादेशचा सत्यानाश करण्याचे ठरविलेले दिसते. बलुचिस्तानात पाकिस्तान विरुद्ध प्रचंड आक्रोश आहे. भारताची फाळणी झाली तेव्हा बलुचिस्तान स्वतंत्र ठेवण्यात येईल, असा तेथील बादशहाचा इरादा होता. पण पाकी लष्कराने बळजबरीने बलुचिस्तानला स्वतंत्रता मिळू दिली नाही. आज पाकिस्तानातील 43% भूभाग बलुचिस्तानमध्ये आहे. त्याची लोकसंख्या तीन कोटी पेक्षाही कमी आहे. हा प्रदेश खनिज संपत्तीने समृद्ध असल्यामुळे पाकिस्तानला कसेही करून बलुचिस्तानला आपल्यापासून दूर करायचे नाही. पाकिस्तानात सिंधी, पश्तूनी, मुजाहिद वगैरे सारख्या मुस्लिम जमाती आहेत. मात्र पाकिस्तानी लष्कराला हे दादागिरी करण्याचे ठिकाण आहे, असे वाटते. पंजाबी मुस्लिमांनी बलुचिस्तानला स्वातंत्र्यलढा लढण्यास प्रवृत्त केले आहे. पण तो भूभाग पाकिस्तानला लागून असल्यामुळे पाकच्या लष्करासमोर बलुच योद्धे टिकू शकत नाहीत. 1971 साली सर्वाधिक लोकसभेच्या जागा जिंकूनही शेख मुजीबुर रहमान यांना आताच्या पाकड्यांनी सत्तेवर बसू दिले नाही. त्यांच्या आवामी लीग या पक्षाचे बहुमत असताना सुद्धा त्यावेळी झुल्फिकार अली भूत्तो यांनी प्रचंड विरोध केला आणि ते सत्तेवर आले. त्यानंतर नेहमीप्रमाणे लष्करी उठाव होऊन भुत्तो यांना फासावर लटकावे लागले. त्यानंतर त्यांच्या कन्येलाही अपघातात मरण्यात आले. पण आता हे पाकडे बांगलादेशचे वाकडे करण्यासाठी त्यांच्या सवयीप्रमाणे येथील अतिरेक्यांना मदत करीत आहेत. ही मदत आर्थिक नाही, त्या स्वरूपाची मदत करण्याऐवजी कुवत पाकिस्तानामध्ये नाही. पण इस्लामच्या नावावर अनेक अतिरेक्यांनी शेख हसीनाची सत्ता उलथवून टाकण्यासाठी फार मोठा प्रयत्न केला आणि तो यशस्वी ठरला. त्यावेळी घाईघाईत एका बँकेचे अध्यक्ष असलेल्या आणि शेख हसीना यांचे कट्टर विरोधक असलेल्या मोहम्मद युनूस यांना तात्पुरते सत्तेवर बसविले गेले. अजूनही त्या ठिकाणी निवडणूक घेण्याची कोणतीही हालचाल दिसत नाही. आवामी लीगच्या अनेक नेत्यांना कोणतेही कारण नसताना अतोनात त्रास देण्यात येत आहे. आवामी लीग निवडणूक लढवूच नये. अशी पावलेही उचलण्यात येत आहेत. शेख हसीना भारताशी चांगले संबंध ठेवून बांगलादेशच्या विकासासाठी तत्पर होत्या. त्यांच्या कार्यकाळात बांगलादेशची बरीच प्रगती झाली. पण अमेरिकेलाही शेख हसीना त्यांचा अलिप्तपणा पचला नाही. त्यामुळे पाकिस्तानचे भावनात्मक आवाहन आणि अमेरिकेचा पैसा यामुळे बांगलादेशचे लोकनियुक्त सरकार पाडले गेले आणि शेख हसीना यांना देश सोडावा लागला. मोहम्मद युनूस यांनी राज्यकारभार हाती घेतला. पण त्यांच्या कार्यकाळात त्या देशातील हिंदूंवर हल्ले होऊ लागले. त्याला आवर घालणे त्यांना जमले नाही. आता बांगलादेशात अशी काही अवस्था निर्माण झालेली आहे की, कोणाचा पायपोस कोणाच्या हातात नाही. भारताशी सहकार्य केल्याशिवाय बांगलादेशाची अर्थव्यवस्था चालू शकत नाही. पण मोहम्मद युनूस सारख्या केवळ अर्थतज्ज्ञ वानराच्या हातात मोत्याची माळ दिल्यामुळे हा माणूस त्या माळेचे मणी चावून चावून फोडून फेकून देत आहे. अशा स्थितीत पाकिस्तान मित्र अतिरेक्यांना आणि अनेक वाह्यात तरुणांना मोकळे मैदान मिळालेले आहे. आता बांगलादेशात पुन्हा लष्कराची सत्ता येते की काय, हाच एक प्रश्न शांततावादी जनतेच्या मनात रेंगाळत आहे. अल्लाह बांगलादेशचे रक्षण करो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## आदित्य ड्रग्जच्या व्यापारात, उद्धव ठाकरेही आरोपी...

### दिशा सालियन मृत्यू प्रकरण

# वडिलांचे गंभीर आरोप!



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :

दिशा सालियनच्या वडिलांनी आज मुंबईच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तांची भेट घेऊन आपल्या मुलीच्या हत्येची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.

या प्रकरणी त्यांनी आदित्य ठाकरे यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी करत या प्रकरणात उद्धव ठाकरे यांनाही सहआरोपी केले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आदित्य ठाकरे यांना वाचवण्यासाठी आपल्या पदाचा गैरवापर केला, असा आरोप त्यांनी केला आहे.

आदित्य ठाकरे यांचा ड्रगजच्या व्यापारात हात असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. या आरोपांमुळे राज्याचे राजकारण अधिकच तापण्याची चिन्हे आहेत.

दिशा सालियनचा ८ जून २०२०रोजी संशयास्पद मृत्यू झाला होता. पण ही आत्महत्या होती की हत्या? यावरून बरेच राजकारण रंगले आहे. पण आता दिशाचे वडील सतीश सालियन यांनी हायकोर्टात याचिका दाखल करून आपल्या मुलीची सामूहिक अत्याचारानंतर हत्या करण्यात आल्याचा आरोप केला आहे.

या प्रकरणी त्यांनी मंगळवारी मुंबईच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तांची भेट घेऊन लेखी तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांशी बोलताना त्यांच्या वकिलांनी या प्रकरणात उद्धव ठाकरे यांनाही सहआरोपी करण्यात आल्याचे सांगितले.

**कुणाकुणाचा सहभाग?**

सतीश सालियन यांचे वकील नीलेश ओझा म्हणाले की, आम्ही आमची तक्रार मुंबईच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तांकडे (गुन्हे) दिली आहे. त्यांनी सीपींशी चर्चा करून आमची तक्रार दाखल करून घेतली आहे.

आता आरोपींना केव्हा अटक करणार? याची जबाबदारी पोलिसांवर आहे. आरोपींमध्ये आदित्य ठाकरे, डिनो मोरिया, सुरज पंचोली, त्यांचे अंगरक्षक, परमबीर सिंह, सचिन वाझे, रिया चक्रवर्ती यांचा समावेश आहे.

परमबीर सिंह यांनी हे प्रकरण दाबण्याच्या प्रकरणातील मुख्य मास्टरमाईंड आहेत. परमबीर यांनी या प्रकरणात आदित्य ठाकरे यांचे नाव आल्यानंतर कव्हरअप करण्यासाठी एक पत्रकार परिषद घेतली.

त्यात त्यांनी सीसीटीव्ही फुटेजमध्ये घटनास्थळी कोणताही राजकारणी आला नसल्याचा दावा केला. पण मोबाईल टॉवरच्या लोकेशनपासून प्रत्यक्षदर्शींच्या जबाबापर्यंत सर्वच गोष्टी त्यांचा हा दावा खोटा असल्याचे सिद्ध करतात. इतरही अनेक गोष्टी आमच्या तक्रारीत नमूद आहेत.

## मंत्री जयकुमार गोरे यांना अडकवण्याचा प्रयत्न



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :

मंत्री जयकुमार गोरे यांना अडकवण्याच्या प्रकरणात शरद पवार यांच्या पक्षाचा मोठा हात असल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात केला आहे.

या प्रकरणात सुप्रिया सुळे आणि रोहित पवार हे आरोपी तुषार खरात याच्या संपर्कात होते. या प्रकरणाचे विरोधात जे व्हिडिओ तयार केले गेले, ते आधी खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांना पाठवण्यात आले असल्याचा मोठा आरोप देखील फडणवीस यांनी केला आहे. त्यामुळे आता या प्रकरणावरून राज्यभरात चांगलाच गोंधळ निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**फडणवीसांचा विरोधकांवर निशाणा**

आप इतना भी गरज गरज के ना बरसों,
की मैं आंधी तूफान या सैलाब बन जाऊं।
खैर मुश्किल मुझ में तो अभी साख बाकी है,
आप खुद अपनी फितरत के बारे में सच बोलो,
आप में वह पहले वाली बात कहा बाकी है।

अशा शेरोशायरीने फडणवीस यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जितेंद्र आव्हाड ज्यावेळी राज्यातील घटना घडामोडींबद्दल बोलत होते. त्यावेळी ते बांगलादेश विषय बोलता की काय? असा मला प्रश्न पडत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. दंगेखोर आणि बलात्कार करणा?यांचा एवढा पुळका का? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी विचारला आहे.

अक्षय शिंदे याचा एनकाऊंटर झाला नसता तर चांगले झाले असते. मात्र तो स्वातंत्र्य सेनानी असल्यासारखी छाती बडवली जात असल्याचा आरोप फडणवीस यांनी केला आहे. दंगेखोर आणि बलात्कार यांना कायद्याने शिक्षा झाली पाहिजे. मात्र त्यांच्या विषयी कोणाच्या मनात संवेदना निर्माण झाली असेल तर ते योग्य नाही. त्या संदर्भात त्यांची मने तपासूनच पहावी लागतील, असे फडणवीस म्हणाले आहे.

विरोधकांनी कितीही प्रयत्न केला तरी आम्ही तिघे एकमेकांच्या पायात पाय घालणार नाही. तर एकमेकांच्या हातात हात घेऊन काम करणारे असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. दादा एकदम दराडून बोलतात, त्यामुळे त्यांच्याविषयी कोणी बोलत नाही. मात्री आम्ही दोघे, शांततेत बोलत असतो. मात्र तुम्ही कितीही काड्या घालण्याचा प्रयत्न केला, तरीही आमच्यात एकी कायम राहणार असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे.

## समृद्धीवरच्या अपघातात सोनू सूदची पत्नी जखमी

### भाच्यासह दोघांवर नागपुरात उपचार सुरू



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.२५ :

बॉलिवूड अभिनेता सोनू सूद याची पत्नी सोनाली सूद मुंबई - नागपूर समृद्धी महामार्गावर झालेलया भीषण कार अपघातात गंभीर जखमी झाल्या आहेत. या घटनेत सोनाली यांचा भाचाही जखमी झाला आहे. या दोघांवर नागपूर येथील एका रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच सोनू सूद तातडीने नागपुरात दाखल झाला आहे.

सोनाली सूद यांचा सोमवारी रात्री मुंबई - नागपूर हायवेवर अपघात झाला. त्यांची कार एका ट्रकला धडकली. त्यात गंभीर जखमी झाल्या. हा अपघात झाला तेव्हा त्यांच्यासोबत त्यांची बहीण व भाचा सोबत होता. सोशल मीडियावर सोनाली सूद यांच्या गाडीचे काही फोटो व्हायरल झालेत. त्यात कारचा समोरील भाग अक्षरशः चक्काचूर झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सूद यांच्या कारने अतिशय वेगाने ट्रकला धडक दिली असावी असा अंदाज बांधला जात आहे.

या अपघातानंतर सोनाली सूद व त्यांचा भाचा या दोघांना नागपूर येथील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे त्यांच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या निगराणीखाली उपचार केले जात आहेत. दुसरीकडे, या अपघाताची माहिती कळताच सोनू सूद तातडीने नागपूरच्या दिशेने धाव घेतली. त्यांनी डॉक्टरांशी चर्चा करून आपल्या पत्नी व भाच्याच्या प्रकृतीची माहिती घेतली. ते सध्या त्यांच्यासोबतच आहेत. सोनाली व त्यांच्या भाच्याला पुढील ४८ ते ७२ तास सातत्याने निगराणी व वैद्यकीय देखभालीत ठेवले जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. अभिनेता सोनू सूदने या अपघाताची पुष्टी केली आहे.

## आमिर खानने घेतली धनंजय देशमुखांची भेट

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २५ :

बॉलिवूड अभिनेता आमिर खान याने मस्साजोग येथे दिवंगत सरपंच संतोष देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. आमिरने देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन करत त्यांना धीर दिला.

पुण्यामध्ये पाणी फाउंडेशनचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाला धनंजय देशमुख यांच्या संतोष देशमुख यांचा मुलगा विराज देशमुख उपस्थित होते. यावेळी आमिर खाने धनंजय देशमुख यांची आस्थेने विचारपूस केली. आमिर खानने विराजला पोटाशी धरून घट्ट मिठी मारली.

### संतोषच्या मुलाला मारली घट्ट मिठी



बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली. या हत्या प्रकरणाला १०५ दिवस उलटून गेले आहेत. या प्रकरणात ८ आरोपींना अटक झाली असून न्यायालयात खटला सुरु आहे. मात्र, कृष्णा आंधळे अद्याप फरार आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे राज्यातील राजकारणाबरोबरच सामाजिक क्षेत्र ढवळून निघालेले आहे. अशातच आमिर खान याने संतोष देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी, आमिर खान भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

यावेळी आमिरने देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीदरम्यान आमिर खानने धनंजय देशमुख यांची व्यथा ऐकून घेतली. यानंतर आमिर खान भावूक झाला होता. त्याने संतोष देशमुख यांचा मुलगा विराज देशमुख याला कडाडून मिठी मारली. आमिरची पूर्वाश्रमीची पत्नी किरण राव हिने देखील धनंजय देशमुख यांना धीर दिला.

## भंडारा तहसीलदारांची विभागीय चौकशी

### विधानसभेत घोषणा



■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि.२५ :

तहसीलदार विनीता लांजेवार यांना भ्रष्टाचार प्रकरणात निलंबित करण्यात आले होते. मात्र त्यांला मॅटने स्थगिती दिली. त्यावर असहमती दर्शवत आमदार भोंडेकर यांनी भ्रष्टाचाराचा आरोप असलेल्या कार्यक्षेत्रात लांजेवार कार्यरत कशा राहू शकतात? असा प्रश्न केला. यावर उत्तर देताना भंडाऱ्याच्या महिला तहसीलदाराने भ्रष्टाचाराच्या सर्व मर्यादा पार केल्यात, असे म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी आजपासून त्यांच्या विरोधात विभागीय चौकशी सुरू करीत असल्याचे जाहीर केले.

आदेश नसतांना शेतीला अकृषक परवानगीचे आदेश दिल्याप्रकरणी भंडाराच्या तहसीलदार विनीता लांजेवार यांना महसूल खात्याने निलंबित केले होते.

या आदेशाविरुद्ध लांजेवार यांनी मॅट मध्ये धाव घेतली. तेथे त्यांच्या या निलंबन आदेशाला स्थगिती देण्यात आली. मात्र मॅटचा निर्णय हा एकतर्फी असल्याचा आरोप आमदार भोंडेकर यांनी विधानसभेत केला.

या निर्णयाच्या विरोधात शासन अपील करणार का? भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप असलेल्या तहसीलदार लांजेवार यांची अँटी करप्शन आणि विभागीय चौकशी होणार का? असा प्रश्न उपस्थित केला. यावर महसूल मंत्री बावनकुळे यांनी आमदार भोंडेकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना विभागीय चौकशीची घोषणा केली.

## मंगळवार ठरला घातवार : चौघे ठार

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि.२५ :

जिल्ह्यासाठी मंगळवार घातवार ठरला. दोन वेगवेगळ्या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला. चिखली तालुक्यातील चिखली-जाफ्राबाद मार्गावर मंगळवारी दुपारी भीषण अपघात झाला. भरधाव दुचाकीचे नियंत्रण सुटल्याने ती रस्त्या लगताच्या झाडावर आदळली. यात दुचाकी वरील तीन युवकांचा जागीच मृत्यू झाला. पळसखेड दौलत गावाच्या समोर भोकरवाडीजवळ हा अपघात झाला.

घटनेची माहिती मिळताच चिखली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. ठार झालेले तिघेही तरुण मराठवाड्यातील सिल्लोड ( जिल्हा छत्रपती संभाजी नगर ) तालुक्यातील पिंपरी येथील रहिवासी आहेत. रोहित महादू चाबूकस्वार (वय २४), शुभम रमेश चाबूकस्वार (वय २५), सोनू सुपडू उसरे (वय २३) अशी अपघातात ठार झालेल्या तरुणांची नावे आहेत.

हे तिघे युवक एम एच १५/०७५७ क्रमांकाच्या पल्सर वाहनाने कुंभारी येथे जात होते अशी प्राथमिक माहिती आहे. घटनेचा विस्तृत तपशील मिळाला नाही. पोलीस कारवाई सुरु होती.

### भरधाव वाहनाने शेतकऱ्याला चिरडले

वाहन अपघातात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. तांदूळवाडीतील वाणी मळ्याजवळ आज मंगळवारी, २५ मार्च रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास ही दुर्घटना घडली. धाड मार्गावरील तांदूळवाडीत आज, रस्ता ओलांडणाऱ्या शेतकऱ्याला भरधाव वाहनाने चिरडले. या अपघातात शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. बळीराम पांडुरंग वाणी (५६), रा. तांदुळवाडी, ता. बुलढाणा असे मृत्यूमुखी पडलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

भरधाव कारने त्यांना धडक दिली. त्यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आला आहे. बळीराम वाणी यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. या घटनेमुळे दुःखाचे सावट पसरले आहे.

# नक्षल नेता मुरलीसह तिघांचा खात्मा!

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि.२५ :

छत्तीसगडच्या दंतेवाडात झालेल्या चकमकीत जहाल नक्षल नेता मुरलीसह तीन नक्षलवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा दलाला यश आले आहे.

२५ मार्च रोजी ही चकमक उडाली. यात २५ लाखांचे इनाम असलेला जहाल नक्षलवादी व दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटी सदस्य सोनासाई उर्फ सुधीर उर्फ मुरली उर्फ रामसाई (६२)याचा समावेश आहे. नक्षल चळवळीत पदार्पण केल्यानंतर सुरुवातीला पाच वर्षे तो गडचिरोली जिल्ह्यात सक्रिय होता. चकमकीत तो ठार झाल्याने नक्षलवादी वादी चळवळीला धक्का बसला आहे.

दंतेवाडा व बिजापूर जिल्ह्यांच्या सीमेवरील गिरसापारा, नेलगोडा, बोडगा व इकेली या भागात काही नक्षलवाद्यांचा वावर असल्याची माहिती मिळाल्यावरुन सुरक्षा दलातील राखीव पोलीस जवान (डीआरजी), स्फोटकविरोधी पथकाने दंतेवाडाचे पोलीस अधीक्षक गौरव राय यांच्या मार्गदर्शनाखाली नक्षलविरोधी अभियान हाती घेतले होते. २५ मार्च रोजी सकाळी गिदम पोलीस ठाण्याच्या हद्दीत नक्षलवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार सुरु केला. यावेळी जवानांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले.

चकमकीत जहाल नक्षलवादी मुरलीसह अन्य दोन नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळून आले. अन्य दोघांची ओळख पटविण्याचे काम सुरु आहे. परिसरात नक्षलविरोधी अभियान गतिमान केल्याची माहिती दंतेवाडाचे उप पोलीस महानिरीक्षक कमलोचन कश्यप यांनी दिली.

घटनास्थळी १२ बोअर रायफल, इंसास रायफल, घातक स्फोटक असा शस्त्रसाठा आढळून आला. याशिवाय दैनंदिन गरजेच्या वस्तूही आढळून आल्या. शस्त्रांसह सर्व मुद्देमाल जप्त केला आहे. बस्तर परिक्षेत्रात २०२५ मध्ये आतापर्यंत तीन महिन्यांत वेगवेगळ्या चकमकींमध्ये शंभर नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात सुरक्षा जवानांना यश आले.

### मुरलीचा नक्षल प्रवास

सोनासाई उर्फ मुरली हा मूळचा तेलंगणा राज्यातील वारंगल जिल्ह्यातील रहिवासी होता. अहेरी दलममध्ये १९९५ ते १९९७ पर्यंत त्याने काम केले, त्यानंतर १९९७ ते १९९९ पर्यंत तो पेरिमिली दलममध्ये सक्रिय होता. पुढे त्याने गडचिरोली जिल्हा सोडला व आपला मुक्काम अबुजमाडमध्ये हलविला.

## महाराष्ट्रात फिरतो एक नेपाळी...

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २५ :

### अनिल परबांचा नीतेश राणेंवर घणाघात

शिवसेना आमदार अनिल परब यांनी मंगळवारी विधान परिषदेत भाजप आमदार नीतेश राणे यांच्यावर कडाडून हल्ला चढवला. त्यांनी त्यांचा उल्लेख 'नेपाळी' असा केला.

महाराष्ट्रात एक नेपाळी आहे. मीच हिंदू धर्म वाचवू शकतो असे त्याला वाटते, असे ते म्हणालेत. यावेळी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे परब यांच्या बाजूलाच बसले होते हे विशेष. अनिल परब म्हणाले की, हल्ली काय झाले आहे की मांसाहार करायचा नाही असे कुणीतरी सांगत आहे. त्यांना हा अधिकार कुणी दिला? मटण कोणते खायचे, झटका मटण खायचे की हलाल खायचे हे तुम्ही सांगणार का? राज्यात हिंदू - मुस्लिम वाद होतील असे वातावरण हुतुपुरस्सर तयार केले जात आहे.

## आमदार संजय गायकवाड यांची संजय राऊत यांना शिवीगाळ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

कॉमेडियन कुणाल कामरा प्रकरणावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. कामरा आणि माझा डीएनए सारखाच असल्याचे वक्तव्य खासदार संजय राऊत यांनी केल्यानंतर शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी थेट राऊत यांना शिवीगाळ केली. यामुळे विधानभवन परिसरात मोठा गदारोळ झाला.

संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले की, कुणाल कामरा चुकला असेल तर कायद्याने कारवाई करावी. मात्र, कामरा आणि माझा डीएनए सारखाच आहे. राऊत यांच्या या वक्तव्यावर शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड भडकले आणि त्यांनी पातळी सोडून अपशब्द वापरत राऊत यांना शिवीगाळ केली.

गायकवाड म्हणाले, कामराने माफी मागणार नाही, असे म्हणत जी मुजोरी दाखवली आहे, ती पाहता त्याला चांगलाच माज चढलाय. ही मस्ती कोणाच्या भरोशावर आहे? त्याचा माज आमचे शिवसैनिक उतरवल्याशिवाय राहणार नाही. राऊत यांच्या 'डीएनए' वक्तव्यानंतर संजय गायकवाड यांनी वापरलेल्या अपशब्दांमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सत्ताधारी आमदाराने अशा पद्धतीने खासदारावर केलेली शिवीगाळ ही अभूतपूर्व असून, यावरून सत्ताधाऱ्यांची बेताल भाषा पुन्हा एकदा समोर आल्याची चर्चा सुरू आहे.

## अण्णा बनसोडे विधानसभेचे उपाध्यक्ष

### एकमेव अर्ज आल्याने बिनविरोध निवड; राहुल नार्वेकर करणार औपचारिक घोषणा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २५ :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे यांची विधानसभेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. अध्यक्ष राहुल नार्वेकर उद्या त्यांच्या निवडीची औपचारिक घोषणा करतील.

विधानसभेच्या उपाध्यक्षपदासाठी राष्ट्रवादीच्या राजकुमार बडोले, संजय बनसोडे व अण्णा बनसोडे या ३ नेत्यांची नावे चर्चेत होती. अखेर या अण्णा बनसोडे यांनी बाजी मारली. या पदासाठी महायुतीकडून अण्णा बनसोडे यांचा एकमेव अर्ज आला होता. त्यामुळे त्याची या पदावर बिनविरोध निवड झाली आहे.

अण्णा बनसोडे यांनी महापालिकेत ३ टर्म नगरसेवक म्हणून काम केले आहे. त्यांनी स्थायी समितीचे अध्यक्षपदही भूषविले आहे. ते राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक आहेत. ते पुणे जिल्ह्यातील पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे विधानसभेत नेतृत्व करतात. ते २००९ मध्ये पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. २०१९ मध्ये ते पुन्हा विधानसभेत पोहोचले.

# एसटीचे स्मार्ट कार्ड ४ वर्षांपूर्वी बंद १० हजारांत बनावट कार्ड

■ महासागर प्रतिनिधी,
नाशिक, दि. २५ : राज्य शासनाच्या वतीने अधिस्वीकृतीधारक पत्रकार, दिव्यांग आणि सवलतीस पात्र विविध पुरस्कारप्राप्त व्यक्तींना एसटी महामंडळाच्या बसेसमध्ये मोफत प्रवासासाठी २०२०-२१ मध्ये वितरित स्मार्ट कार्डची वर्षभराची मुदत संपल्यानंतर ते कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहेत. परंतु, तरी ८ ते १० हजारांत बनावट स्मार्ट कार्ड काढून नाशिक जिल्ह्यात १०० हून अधिक तोतया पत्रकार, दिव्यांग मोफत प्रवासाचा लाभ उठवत शासनाची फसवणूक करत आहेत.




निफाडमध्ये हे बनावट कार्ड देणारी टोळी कार्यरत आहे.

जिल्ह्यात ११४ अधिस्वीकृतीधारक पत्रकार आहेत. यामध्ये दैनिकांसह वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे. महामंडळाकडून अधिस्वीकृतधारकांच्या मूळ प्रतीची रेकॉर्डला नोंद करून वर्तमानपत्राचे ओळखपत्र, आधार कार्डची प्रत सोबत घेऊन त्याची खात्री पटल्यानंतरच मोफत प्रवासाचे कार्ड वितरित केले जाते. एप्रिल २०२१ नंतर स्मार्ट कार्ड बंद करण्यात आले. त्याऐवजी साधे ओळखपत्र देण्यात आले. तरीही नाशिक शहरासह निफाड, लासलगाव, सिन्नर, येवला, कोपरगाव भागात तोतया पत्रकारांकडून बनावट स्मार्ट कार्डद्वारे विनातिकीट प्रवास केला जात आहे. वाहकांनी हे कार्ड जप्त करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्याशी वाद घालण्याचे प्रसंग घडत आहेत. लासलगाव आगारातील एका वाहकाने १० हून अधिक बनावट स्मार्ट कार्डचे फोटो काढले असता संबंधितांनी तिकीट काढून प्रवास केला. मात्र, वाहकालाच तुझी बदलीच करतो, अशी धमकीदेखील दिली.

### अजब.. सर्वच स्मार्ट कार्डवर श्रीरामपूर आगाराचा कोड

विशेष बाब म्हणजे या सर्वच बनावट स्मार्ट कार्डांवर परिवहन महामंडळाच्या श्रीरामपूर आगाराचा एसएमपीआर ५१०००४३२ असा असून आयडी क्रमांक १६०००००० ०७१४ देखील असा आहे. याच एका क्रमांकाची नोंद सर्वत्र करत हे बनावट कार्ड तयार करण्यात आले आहेत.

## धारावीत गॅस सिलेंडरच्या ट्रकला भीषण आग



**मुंबई :** धारावीमध्ये बस डेपोजवळ गॅस सिलिंडरची वाहतूक करणाऱ्या एका ट्रकला आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत १२ ते १३ सिलिंडरचे एकापाठोपाठ स्फोट झाल्याची माहिती आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलिस आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. रात्री दहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेत अद्याप कुणी जखमी झाल्याचे वृत्त समोर आले नाही. या घटनेमुळे परिसरातील लोकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. या आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आले आहे.

### अनेक दुचाकी जळून खाक झाल्याची माहिती

मिळालेल्या माहितीनुसार, धारावीच्या पीएमजीपी कॉलनी परिसरामध्ये रस्त्यावर पार्क केलेल्या सिलेंडरच्या गाडीत अचानक आग लागली. यानंतर गाडीत असलेल्या १२ ते १३ सिलेंडरचे एकामागे एक स्फोट झाले. मोठी वर्दळ असलेल्या बस डेपोजवळ ही घटना घडली. सिलेंडरच्या स्फोटामुळे परिसर दणाणून गेला होता. या घटनेत ट्रकच्या आसपास असणाऱ्या ५ ते १० दुचाकी जळून खाक झाल्या. ही आग कशामुळे लागली याचे कारण अद्याप समजू शकले नाही. अग्निशामक दलाच्या ८ ते १० गाड्या आणि पाण्याचे १० टँकर घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाला आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले असून सध्या कुलिंगचे काम सुरू आहे. यादरम्यान, पोलिसांकडूनही सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर काळजी घेतली गेली. सिलिंडर ब्लास्टनंतर ट्रकला आग लागल्याने हवेत धुराचे लोटही पसरले होते.

## सीईटी परीक्षेत मोठा घोटाळा उघड

**मार्क वाढवून देण्यासाठी २२ लाखांची देवाणघेवाण, चौघे अटकेत**

### उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची विधान परिषदेत माहिती विद्यार्थ्यांना सतर्कतेचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ :

राज्यातील सीईटी परीक्षेत मोठा घोटाळा उघडकीस आला असून एका पेपरमध्ये टक्केवारी वाढवून देण्यासाठी तब्बल २२ लाख रुपयांचा आर्थिक व्यवहार झाल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली असून, गुन्हेगार उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या परराज्यातील असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत दिली.

सीईटी कक्षातर्फे एमबीए, एमएमएस आणि अभियांत्रिकीसह विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) घेण्यात आली होती. २०२५-२६- या शैक्षणिक वर्षासाठी इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागवण्यात आले होते. अर्ज प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी हेल्प डेस्कची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

दरम्यान, दोन विद्यार्थ्यांनी स्पॅम कॉलद्वारे मार्क वाढवून देण्याचे आमिष दाखवण्यात आल्याची तक्रार दिली. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तत्काळ समिती नेमून चौकशीचे आदेश दिले. चौकशी अहवालात आर्थिक व्यवहाराचे पुरावे समोर आले असून या रॅकेटचा फैलाव देशभरात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

एका पेपरमध्ये टक्केवारी वाढवून देण्यासाठी प्रत्येकी २२ लाख रुपये घेण्यात आल्याचे उघड झाले आहे. आरोपींनी विविध विद्यार्थ्यांना फोन करून मार्क वाढवण्याचे आमिष दाखवले. याप्रकरणी चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. या रॅकेटचा अधिक तपास सुरू असून प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचेही चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी अशा फसवणूक करणाऱ्या टोळ्यांपासून सावध राहावे आणि अशा भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहनही पाटील यांनी यावेळी केले. सीईटी परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी आणि अशा प्रकारचे प्रकार रोखण्यासाठी सीईटी कक्षाला योग्य ती दक्षता घेण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

# मराठी असल्याने असोसिएशनचे सदस्यत्व नाकारले, ठाकरे गट आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ : मराठी माणसांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणाऱ्या गिरगावात मराठी असल्याने पंचरत्न डायमंड असोसिएशनचे सदस्यत्व नाकारल्याची धक्कादायक घटना घडली आहे. त्यामुळे ठाकरे गटाने आक्रमक होत जाब विचारला आहे. गिरगावात मराठी असल्याने पंचरत्न डायमंड असोसिएशनचे सदस्यत्व नाकारले, ठाकरे गट आक्रमक मराठी असल्याने गिरगावात पंचरत्न डायमंड असोसिएशनचे सदस्यत्व न दिल्याने ठाकरे गटाने संस्थेच्या कार्यालयात जाऊन जाब विचारला आहे. या असोसिएशनचे मुंबईत १७ हजार सभासद असून संघटनेत मराठी माणसांना डावल्याचे उघडकीस आले आहे. या असोसिएशनचे सभासद होण्यासाठीचे अर्जही गुजराती आणि इंग्रजी भाषेत असल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या शिवसैनिकांनी येथे जोरदार हंगामा केला आहे. या प्रकरणात मराठी असल्यामुळे



डायमंड असोसिएशनचे सभासत्व सभासत्व न दिल्याने ठाकरे गट आक्रमक होऊन डायमंड असोसिएशनच्या कार्यालयात जाऊन बोर्डाला काळ फासले आहे. दि मुंबई डायमंड मर्चंट असोसिएशन पंचरत्न गिरगाव ऑपेरा हाऊस या असोसिएशनचे मुंबईत १७ हजार सभासद आहेत. आता नव्याने आठशे जणांना सभासद केले आहे. त्यात एकही मराठी माणसाला सभासद केले नसल्याचे उघडकीस आले आहे. या असोसिएशनच्या काही सभासदांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या वारसांना केवळ ते मराठी असल्याने सभासत्व देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे याचा जाब विचारण्यासाठी शिवसैनिकांनी मंगळवारी गिरगावातील दि मुंबई डायमंड मर्चंट असोसिएशन पंचरत्नच्या कार्यालयात जाऊन जोरदार घोषणाबाजी केली आहे.

### मराठी माणसांना डावलण्याची हिंमत होतेच कशी?

दि मुंबई डायमंड मर्चंट असोसिएशन पंचरत्न गिरगाव ऑपेरा हाऊस या असोसिएशनच्या कर्मचाऱ्यांना आता निवडणूका नाहीत असा बचाव केला. त्यावेळी ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी जोरदार हंगामा केला. निवडणूका गेल्या खड्ड्यात आधी मराठी माणसांना सभासद का केले नाही ते सांगा. आणि सभासत्व मिळण्यासाठी नवीन सभासद अर्ज बनवला होता तो सुद्धा इंग्लिश आणि गुजरातीमध्ये बनवला आहे. यामुळे ठाकरे गटाने आक्रमक होत.

## शिंदे गटाच्या माजी नगरसेवकाला भर रस्त्यात चोपलं

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ :

कल्याण पश्चिमे येथे शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवकला शिवसेना महिला कार्यकर्तीने भर रस्त्यात मारहाण केल्याची घटना घडली आहे. .या मारहाणीत माजी नगरसेवकाच्या डोळ्याला दुखापत झाली आहे. नेमकी ही मारहाण का करण्यात आली?

कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यामुळे सध्या महाराष्ट्रामध्ये मोठा वाद पेटला आहे. मात्र आता ही घटना ताजी असतानाच दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाच्या माजी नगरसेवकाला शिवसेनेच्या महिला कार्यकर्तीने भर रस्त्यावर चांगलाच चोप दिल्याची घटना घडली आहे. रस्त्याच्या भूमिपूजन कार्यक्रमावरून या दोघांमध्ये वाद झाला असल्याचं म्हटलं जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण पश्चिमेमध्ये ही घटना घडली आहे. राणी कपोते असं या महिलेचं नाव आहे. कल्याण पश्चिमेतील मोहिंदर सिंग काबूल सिंग परिसरात एका रस्त्याच्या कामाचा शुभारंभ होता. हा कार्यक्रम रविवारी संध्याकाळी पार पडला. या कार्यक्रमाला कल्याण पश्चिमेचे



आमदार विश्वनाथ भोईर हे काही कामानिमित्त बाहेर असल्याने त्यांचे सुपुत्र वैभव भोईर यांच्या उपस्थितीत पार पडला.

### रस्त्याचा कामाच्या श्रेयवादावरून वाद सुरु झाला

त्याठिकाणी माजी नगरसेवक मोहन उगले यांच्यासह महिला कार्यकर्त्याही उपस्थित होत्या. त्याठिकाणी कार्यक्रमासाठी शिवसेना महिला कार्यकर्त्या राणी कपोतेही पोहचल्या होत्या. यावेळी रस्त्याचा कामाच्या श्रेयवादावरून वाद सुरु झाला. कामाचा पाठपुरावा आपण केला, असा दावा राणी कपोते यांनी केली होता. त्यानंतर या ठिकाणी दोन्ही गटामध्ये जोरदार गोंधळ झाला. त्यावर माजी नगरसेवक उगले यांनी या कामाचा पाठपुरावा मी केला असल्याचा दावा केला. यामुळे काही काळ त्याठिकाणी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. आणि हा वाद अखेर टोकाला केला.

अहिल्याबाई चौकात राणी कपोते आणि मोहन उगले यांच्यात पुन्हा या विषयावरून वाद निर्माण झाला.

तसेच यावेळी राणी कपोते यांनी तू मला शिव्या का देतो? माझ्यासोबत गैरवर्तन का केलं? असं म्हणत उगले यांना थेट मारहाण करायला सुरुवात केली. भर रस्त्यात सर्वांसमोर त्यांनी उगले यांना चोप दिला. यात उगले यांच्या डोळ्याला दुखापत झाली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

राणी कपोते यांनी उगले यांच्यावर गैरवर्तन केल्याचा आरोप केला आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## आयपीएलमध्ये मोठ्या प्रमाणावर बेटिंग सुरू अंबादास दानवे यांचा गंभीर आरोप

**मुंबई :** मुंबई पोलिसांच्या मदतीने आयपीएल क्रिकेट सामन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बेटिंग सुरू असल्याचा गंभीर आरोप विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. या संदर्भातील संभाषण असलेला पेनड्राइव्ह त्यांनी थेट सभापतींकडे सादर केला. त्यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. दानवे यांनी आपल्या भाषणात म्हटले की, बेटिंग रॅकेटमध्ये मेहुल जैन, कमलेश जैन आणि हिरेन जैन यांचा समावेश असून, या रॅकेटमध्ये पाकिस्तानी खेळाडूंचाही वापर केला जात असल्याचा धक्कादायक आरोप त्यांनी केला. नुकत्याच झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये 'लोटस २४' या ॲपच्या माध्यमातून हे बेटिंग झालं असून, आता ही मंडळी मुंबईत आयपीएलसाठी दाखल झाली आहेत, असे दानवे यांनी स्पष्ट केले.

### राज्याच्या विभागांमध्ये घोटाळ्यांचा पाढा

आपल्या भाषणात दानवे यांनी परिवहन, सिडको, महसूल, आरोग्य विभागांतील घोटाळ्यांचा पाढा वाचला. अनेक मंत्र्यांवर थेट भ्रष्टाचाराचे आरोप करत त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. राज्याची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस ढासळत चालली आहे, असा आरोप करत दानवे यांनी सरकारच्या कार्यपद्धतीवर तीव्र निषेध नोंदवला.

माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या कविता सादर करत दानवे म्हणाले -छोटे मनसे कोई बड़ा नहीं हो सकता, टूटे मनसे कोई खड़ा होई न सकता. या ओळी सांगून त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर निशाणा साधला. दानवे म्हणाले, राज्य सरकारने गेल्या दोन वर्षांपासून 'क्राईम इन महाराष्ट्र' अहवाल प्रसिद्ध केलेला नाही. राज्यात एकूण ५६४ विविध गुन्हे दाखल झाले आहेत. दंगली, बलात्कार, विनयभंगाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. नागपूर, पुणे, संभाजीनगर याठिकाणी बलात्काराच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. दररोज २२ बलात्कार आणि ४५ विनयभंगाच्या घटना घडत आहेत. कायद्याचा धाकच राहिलेला नाही, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

सरकारने महिलांच्या सुरक्षेसाठी सुरु केलेल्या मिशन शक्ती अभियानात केवळ २२ टक्केच निधी खर्च झाला आहे. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे, असे सांगत दानवे यांनी सरकारच्या महिला सुरक्षाविषयक दाव्यांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

### सरकारवर सर्व बाजूंनी हल्लाबोल

अंबादास दानवे यांच्या या आरोपांमुळे सभागृहात एकच खळबळ उडाली. त्यांनी बेटिंग रॅकेटपासून ते गुन्हेगारी वाढ, महिला अत्याचार आणि विभागीय घोटाळे अशा सर्व मुद्द्यांवरून सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. आता या आरोपांची दखल सरकार घेते की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## कायदा आणि सुव्यस्थेवरून सरकार लक्ष्य

### जयंत पाटील, नाना पटोले यांची टीका

**मुंबई:** राज्यातील कायदा-सुव्यवस्थेचीस्थिती बिघडली असून सरकार राज्यात शांतता राखण्यात अपयशी ठरले आहे. सत्तेवर येण्यापूर्वी दिलेले एकही आश्वासन सरकारने पूर्ण केलेले नाही. १०० दिवसांत राज्यातील गुन्हेगारी वाढली असून सरकारमध्ये बसलेलेच प्रक्षोभक विधाने करून राज्यातील परिस्थिती बिघडवत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी वेळीच सावध होऊन महाराष्ट्राला सावरण्याचे काम करावे, अशा शब्दात विरोधी पक्षाने सोमवारी कायदा आणि सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून फडणवीस सरकारला लक्ष्य केले. आज विधानसभेत विरोधी पक्षाच्या वतीने मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली. या चर्चेत सहभागी होताना काँग्रेसच्या जयंत पाटील आणि काँग्रेसच्या नाना पटोले यांनी नागपूर दंगल, महिला अत्याचार, गुन्ह्यांची वाढती संख्या यावरून सरकारला धारेवर धरले. राज्य सरकारने १०० दिवसांचा कार्यकाळ पूर्ण केला. १०० दिवसांचे व्हिजन डॉक्युमेंट मांडू असे सांगणाऱ्या सरकारला विकासाची दिशा मांडण्यात अपयश आले आहे. या १०० दिवसात राज्यात हत्याकांड, महिलांवरील अत्याचार, भ्रष्टाचार, ड्रग्ज, वाचाळवीर, दंगली हेच दिसले, अशी बोचरी टीका विरोधकांनी केली.

राज्यात २०२४ मध्ये १२ दंगली घडल्या. देशातील इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात घडलेल्या दंगली सगळ्यात जास्त आहेत. नागपूरची दंगल पूर्वनियोजित कट होता, असे सरकार म्हणते. दंगल हा पूर्वनियोजित कट होता तर मग पोलीस खाते काय करत होते? सरकारमध्ये बसलेल्यांनी उदात्तीकरण करण्याची भूमिका घेऊ नये.

समाजजीवन उद्धवस्त झाले तर दावोसमधून सामंजस्य कराराच्या माध्यमातून आलेले १५ लाख कोटी दुसऱ्या राज्यात जातील, असा इशारा पाटील यांनी यावेळी दिला. मागील तीन वर्षांत छत्रपती शिवाजी महाराजांचा ज्यांनी-ज्यांनीअवमान केला आहे त्यांच्याविरोधात सरकारने गुन्हे दाखल करावेत, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी जयंत पाटील यांनी वांद्रे येथील सरकारी जमिनीवर सुरु असलेल्या बेकायदा झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प, एमआयडीसीसी आणि मुंबईतील महत्वाच्या रस्ते प्रकल्पात सुरु असलेल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा मांडला.

### यांच्या घरावर बुलडोझर चालवणार का?

कुणाल कामराने कविता केली तर त्याच्याविरोधात उद्रेक केला. मग शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह बोलणाऱ्या कोरटकर, सोलापूरकर यांच्याविरोधात हा उद्रेक का दिसला नाही? त्यांना अजून का अटक झाली नाही? कामरा प्रमाणे त्यांच्या घरावरही सरकार बुलडोझर चालवणार का? असे सवाल नाना पटोले यांनी यावेळी केले.

## तुम्ही बाळासाहेबांचा अपमान नाही केला का? जया बच्चन यांच्याकडून कामराचे समर्थन अन शिंदेंना सवाल



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ : कुणाल कामराने एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या टीकेमुळे निर्माण झालेल्या वादावर जया बच्चन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी कामराला पाठिंबा दिला असून एकनाथ शिंदेंवरही काही सवाल उपस्थित केले आहेत.

तुम्ही बाळासाहेबांचा अपमान नाही केला का? जया बच्चन यांच्याकडून कामराचे समर्थन अन थेट एकनाथ शिंदेंना सवाल - स्टँड-अप कॉमेडिअन कुणाल कामराने त्याच्या गाण्यातून एकनाथ शिंदे यांच्यावर एक टीका केली आहे. जाणूनबुजून अपमानित करण्याचा आणि मोठ्या नेत्यांना बदनाम करण्याचं काम करू नये. त्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. कामराने माफी मागितली पाहिजे अशी मागणीही त्याच्याकडून केली जात आहे. आता कुणाल कामरा यांनी एका कार्यक्रमात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टिप्पणी केल्यानंतर एक मोठा वाद निर्माण झाला आहे. मात्र आता या वादावर जया बच्चन यांनी देखील प्रतिक्रिया दिली असून जया बच्चन यांनी कामराला पाठिंबा दिला आहे. इतर राजकीय पक्षांच्या नेत्यांप्रमाणे आता अभिनेत्री आणि खासदार जया बच्चन यांनीही या विषयावर उघडपणे आपले मत व्यक्त केले आहे. तसेच त्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याबद्दलही बोलल्या आहेत. कुणाल कामराने हॅबिटॅट कॉमेडी क्लबवर त्यांच्या लाईव्ह शो दरम्यान शिवसेना युवा शाखेच्या सदस्यांनी हल्ला केला. शो बंद करण्यात आला आणि सेटची तोडफोडही करण्यात आली. आता या प्रकरणात केलेल्या कारवाईत आरोपींना अटक करण्यात आली आहे. जया बच्चन यांनी या मुद्द्यावर संसदेबाहेर माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, जर बोलण्यावर बंदी असेल तर तुमचे काय होईल? तसही तुमची परिस्थिती वाईट आहे. जर तुमच्यावर बंधने आहेत. तुम्हाला फक्त काही विशिष्ट विषयांवर बोलण्यास सांगितलं जात असेल आणि काही प्रश्न विचारू नका असंही सांगितलं जात असेल, तर यात अभिव्यक्ती स्वातंत्र्य कुठे आहे? जया बच्चन पुढे म्हणाल्या, एखाद्यावर कारवाई करण्याचे स्वातंत्र्य तेव्हाच असते जेव्हा काही गोंधल होतो जसं की विरोधकांना मारहाण करणे, महिलांसोबत वाईट वागणे, लोकांची हत्या करणे, अजून काय? तुम्ही (एकनाथ शिंदे) तुमचा मूळ पक्ष सोडून फक्त सत्तेसाठी दुसरा पक्ष स्थापन केला. हा बाळासाहेबांचा अपमान नाही का? असं म्हणत त्यांनी एकनाथ शिंदेंवरही प्रश्न उपस्थित केला आहे. खार पोलिस उपनिरीक्षक विजय यांच्या मते, कुणाल कामराच्या नया भारत स्पेशल चित्रपटाच्या रिलीजनंतर हा हल्ला झाला. विनोदी कलाकाराच्या वक्तव्याबद्दल आणि तोडफोडीबद्दल युवा विंगच्या सदस्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

# प्रशांत कोरटकरला तेलंगणात भाजपच्या नेत्याने लपवले

### वडेट्टीवार यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ : शिवछत्रपतींचा अवमान करणाऱ्या प्रशांत कोरटकला तेलंगणात भाजपच्या कार्यकर्त्यांनी लपवून ठेवल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. त्यांनी भाजपने यासंबंधी काँग्रेसवर केलेली टीका जोरकसपणे फेटाळून लावली आहे. प्रशांत कोरटकर हे भाजपचे पाप असून, त्याचा काँग्रेसशी कोणताही संबंध नाही, असे ते यासंबंधी ठणकावत म्हणालेत. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी अवमानास्पद विधान करणारा तथा इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना धमकी देणारा प्रशांत कोरटकर तेलंगणात लपून बसला होता. कोल्हापूर पोलिसांनी सोमवारी त्याच्या मुसक्या आवळल्या. त्यानंतर आता त्याची कसून चौकशी केली जात आहे. तत्पूर्वी, भाजप आमदार परिणय फुके यांनी प्रशांत कोरटकर हा



तेलंगणातील एका काँग्रेस नेत्याच्या घरात लपून बसल्याचा खळबळजनक आरोप केला होता.

### तेलंगणात काँग्रेस नेत्याच्या घरी सापडला –फुके

प्रशांत कोरटकर हा तेलंगणातील एका काँग्रेस नेत्याच्या घरी लपून बसला होता. काँग्रेसच्या येथील काही नेत्यांनी त्याला तेलंगणात जाण्यास मदत केली. गडचिरोलीमार्गे त्याला कशा पद्धतीने तेंलगणात नेले ही माहिती ज्या लोकांनी दिली तेच लोक यात सहभागी आहेत. यावरून काँग्रेसचा त्याला वाचवण्याचा प्रयत्न होता असे स्पष्ट होते. पण आमचे सरकार त्याला कडक शासन करेल याची मी सर्वांना खात्री देतो. कोरटकर हा काँग्रेसशासित राज्यात एका काँग्रेस नेत्याच्या घरात सापडला. त्यामुळे यात कुणाचा हात होता हे चौकशीत पुढे येईल. त्याचे कॉल रेकॉर्डिंग तपासून आणखी काही सत्य बाहेर येतील. त्यातून महाराष्ट्र काँग्रेसचे नेते उघडे पडतील, असे परिणय फुके यांनी सांगितले.

### विजय वडेट्टीवारांनी फेटाळला आरोप

दुसरीकडे, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी परिणय फुके यांनी केलेले आरोप जोरकसपणे फेटाळून लावले आहेत. काँग्रेसचा प्रशांत कोरटकरशी कोणताही संबंध नाही. कोरटकर हे भाजपचे पाप आहे. पोलिस त्याला जाऊन भेटले होते. तो कुठे लपला होता हे त्यांना ठावूक होते. पोलिसांनी चंद्रपुरात जावून त्याची सेवा केली. यावरून तो पोलिसांच्या बुरख्याखाली लपून वावरत होता हे स्पष्ट होते.

सरकारने कोरटकरला महाराष्ट्र द्रोही म्हणून घोषित करावे. त्याला तडीपार करावे. भाजपवाले स्वतःचे पाप लपवण्यासाठी काँग्रेसचे नाव घेत आहेत. तेलंगणातील भाजपच्या एका कार्यकर्त्याने त्याला आपल्या घरी आश्रय दिला होता. आम्ही तेथील नेत्यांशी व मंत्र्यांशी चर्चा केली आहे. काँग्रेसचा त्या लोकांशी दुरान्वयेही संबंध नाही, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

### कोरटकर याचे घर सरकार तोडणार का?

प्रशांत कोरटकरला अटक झाली असली तरी त्याला खूप उशीर झाला. कोरटकरला अटक करायला इतके दिवस लागतात हे महाराष्ट्र पोलिसांचे अपयश आहे. प्रशांत कोरटकर हा महाराष्ट्राद्रोही आहे.

त्याचे तोंड न लपवता त्याला राज्यात आणा. आता प्रशांत कोरटकर याचे घर सरकार तोडणार का? या प्रश्नाचे उत्तर फक्त आता सरकारने द्यावे, असेही वडेट्टीवार या प्रकरणी म्हणाले होते.

# अजित पवार जे बोलले तेच मीं बोललो:कुणाल कामरा



■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ : स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा यांनी एका निवेदनाद्वारे आपण उपमुख्यमंत्री अजित पवारांनी जे म्हटले त्याचा पुनरुच्चार केल्याचा दावा करत शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांना पुन्हा एकदा डिवचण्याचा प्रयत्न केला आहे. मला या जमावाची भीती वाटत नाही. त्यामुळे मी लपून बसत प्रकरण शांत होण्याची वाट पाहणार नाही. मी काहीही चुकीचे बोललो नाही. अजित पवार (पहिले मुख्यमंत्री) यापूर्वी जे म्हणाले होते तेच मी म्हणालो, असे त्याने म्हटले आहे.

### मुंबई पोलिस पोहोचले कामराच्या घरी

मुंबई पोलिसांनी कुणाल कामराला समन्स बजावून आज सकाळी ११ वाजेपर्यंत चौकशीसाठी हजर राहण्यास बजावले होते. पण तो आला नाही. परिणामी, पोलिसांनी मुंबई स्थित त्याच्या घरी जावून त्याची चौकशी करण्याचा प्रयत्न केला. पण तो तिथे सापडला नाही. या घरी कुणाल कामराचे आई-वडीलाहतात.

### वादानंतर २४ तासांनी भूमिका स्पष्ट

कुणाल कामराने आपल्या कवितेवरून तोडफोड झाल्यानंतर जवळपास २४ तासांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते आपल्या ४ पानी निवेदनात म्हणाले, मी माफी मागणार नाही. अजित पवार (प्रथम उपमुख्यमंत्री) हे एकनाथ शिंदे (द्वितीय उपमुख्यमंत्री) यांच्याविषयी जे म्हणाले होते, तेच मी म्हणालो. मी या जमावाला घाबरत नाही आणि मी पलंगाखाली लपून बसून प्रकरण शांत होण्याची वाटही पाहणार नाही.

ते म्हणाले, मनोजरंजनाचा कार्यक्रम ज्या ठिकाणी झाला (शूटिंगचे स्थळ) ते फक्त एक व्यासपीठ आहे. सर्व प्रकारच्या कार्यक्रमांची ती जागा आहे. हॅबिटेट (किंवा इतर कोणतेही ठिकाण) माझ्या विनोदासाठी जबाबदार नाही. मी काय बोलतो किंवा करतो याचा त्यांच्याशी कोणताही संबंध नाही. त्यांचे माझ्यावर नियंत्रणही नाही. तसेच कोणत्याही राजकीय पक्षाचा यात संबंधही नाही. विनोदी कलाकारांच्या शब्दांसाठी अशा सेटवर हल्ला करणे म्हणजे चिकन दिले नाही म्हणून तुम्ही टोमॅटोचा ट्रक पलटी केल्यासारखी निरर्थक गोष्ट आहे. कुणाल कामराने आपल्याला धडा शिकवण्याची धमकी देणाऱ्या नेत्यांवरही बेधडक मत व्यक्त केले. तो म्हणाला, भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचा वापर केवळ शक्तिशाली आणि श्रीमंत लोकांची खुशामत करण्यासाठी केला जाऊ नये.

# लोकअदालतीमुळे १६ विभक्त जोडपी पुन्हा एकत्र

**अकोला :** कौटुंबिक न्यायालयात आयोजित लोकअदालतीद्वारे १६ प्रकरणांत जोडप्यांनी मतभेद दूर करून पुन्हा एकत्र नांदण्याचा निर्णय घेतला.अकोला येथे कौटुंबिक न्यायालयात न्यायाधीश श्रीमती आय. जे. नंदा यांच्या मार्गदर्शनात लोकअदालत दि. २२ मार्च रोजी झाली. त्यात ४० प्रकरणे ठेवण्यात आली. त्यात १६ प्रकरणांतील जोडप्यांनी नात्यातील कटुता परस्पर सामंजस्य व संवादाने मिटवत पुन्हा मुलांसह एकत्रित राहण्याचा गोड निर्णय घेतला.घटस्फोट न घेता नात्याला नव्याने संधी देऊन नात्यात गोडवा आणण्याचा निर्धार या जोडप्यांनी केला. त्यांच्या निर्णयामुळे चिमुकल्या मुलांच्या चेह-यावरही छान हसू फुलले. याप्रसंगी न्यायाधीशांनी या जोडप्यांना रोपटे देऊन सन्मानित केले.

कौटुंबिक न्यायालयात सुरू असलेल्या प्रकरणांत पक्षकारांनी लोकन्यायालयात सहभागी होऊन प्रकरण सामंजस्याने सोडवावे, असे आवाहन न्या. श्रीमती नंदा यांनी केले आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष प्र. जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. डी. क्षीरसागर, सचिव वाय. एस. पैठणकर, न्यायाधीश श्रीमती आय. जे. नंदा, जिल्हा अधिवक्ता संघाच्या उपाध्यक्ष श्रीमती कपिले यांच्या मार्गदर्शनात लोकअदालत यशस्वी झाली. पॅनलप्रमुख म्हणून दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए. ए. देसाई यांनी, तसेच पॅनल सदस्य म्हणून अधिवक्ता किरण जायभाये यांनी काम पाहिले. श्रीमती एस. एन. गांजरे यांनी पक्षकारांचे समुपदेशन केले.

# महिला शक्तीचे उल्लेखनीय योगदानातूनच शेती क्षेत्राचा सर्वांगीण विकास दृष्टीपथात : कुलगुरु

## विदर्भातील १४ महिलांचा 'प्रेरणा पुरस्कार' देऊन केला सन्मान



■अकोला,दि २५ (प्रतिनिधी):
काळाच्या ओघात विज्ञान तंत्रज्ञानाने अविश्वसनीय प्रगती केली असून कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर कृषि क्षेत्रात होतांना देखील महिलांच्या निरंतर आणि अथक परिश्रमानेच आर्थिक संपन्न शेती आणि ग्राम व्यवस्था कृतीत येत असल्याचे प्रशंसनीय प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला चे कुलगुरू डॉ.शरद गडाख यांनी केले. विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला द्वारा जागतिक महिला दिनाचे पार्श्वभूमीवर आयोजित 'विदर्भस्तरीय महिला सक्षमीकरण मेळावा व स्त्रीशक्ती उत्सव 'प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना ते बोलत होते.

आयुष्यात प्रगतीसाठी व जिवनमान उंचावण्यासाठी आर्थिक प्रगती होणे आवश्यक आहे व याकरिता आवश्यक तंत्रज्ञान आणि माहिती अकोला कृषि विद्यापीठात उपलब्ध असून शेतीच्या या महाकुंभात युवक, युवती, स्त्री – पुरुष सर्वांसाठी उपयुक्त सर्वकाही आहे फक्त आपण त्याचा फायदा घेणे गरजेचे असल्याचे देखील डॉ. गडाख यांनी सांगितले. शेती क्षेत्रातील महिलांचा सहभाग उल्लेखनीय असल्याचे सांगतानाच आर्थिक संपन्न कुटुंबासाठी उद्योजक मातृशक्तीची मध्यवर्ती भूमिका सोदाहरण विषद करीत उपस्थित महिला वर्गात उत्साह आणि आत्मविश्वास वृद्धिंगत केला. तर गाव खेड्यांमध्ये नवचैतन्य फुलविण्यासाठी ग्रामीण भागात उत्पादित होणाऱ्या शेती आणि शेतीपूरक उत्पादनांवर गाव पातळीवर प्रक्रिया करणे गरजेचे असून प्रत्येक गावं आदर्श होणेसाठी अकोला विद्यापीठाच्या प्रयत्नांना सर्वांनीच तन, मन, धनाने सहकार्य करावे आणि सर्व शासकीय, निम शासकीय, खाजगी संस्थाचे एकात्मिक प्रयत्नातून आर्थिक संपन्न गांव निर्मितीच्या कार्यात सहभागी व्हावे असे कळकळीचे आवाहन अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती बी. वैष्णवी याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून बोलतांना केले.

कृषी महाविद्यालय अकोलाच्या स्व. के. आर. ठाकरे सभागृहात कुलगुरु डॉ. शरद गडाख यांचे अध्यक्षतेत संपन्न झालेल्या या अतिशय महत्त्वाकांक्षी आणि तितक्याच भावनाप्रधान सोहळ्याचे प्रसंगी विद्यापीठ कार्यकारी परिषदेच्या सदस्या श्रीमती हेमलता अंधारे, जिल्हा परिषद अकोलाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती बी. वैष्णवी, विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे, अधिष्ठाता कृषी डॉ. श्यामसुंदर माने, अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी डॉ.सुरेंद्र काळबांडे, अधिष्ठाता उद्यानविद्या डॉ. देवानंद पंचभाई, नियंत्रक प्रमोद पाटील, मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. उमेश चिंचमलातपुरे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

# अकोट रेल्वे स्थानकावर महिला असुरक्षित



■अकोट,दि २५ (प्रतिनिधी):
काही दिवसापूर्वी अकोला रेल्वे स्थानकावर हेमंत गावंडे यांच्या हत्या प्रकरणाने रेल्वे प्रवाशामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच अकोट रेल्वे स्टेशनवर कधीच रेल्वे पोलीस नसल्याने रेल्वेचा प्रवास सुरक्षित नसल्याची संतप्त प्रतिकिया प्रवासी व्यक्त करताना दिसत आहेत.

अकोट येथून अकोला करिता सकाळी ९ दुपारी ३ आणी रात्री ८ अशा ३ मेमू ट्रेनच्या फेऱ्या आहेत. मात्र अकोट स्थानकावर एक तिकीट घर वगळता कोणीही दिसून येत नाही. रेल्वे विभागाचा ना कोणता कर्मचारी ना रेल्वे पोलीस आणी लोहमार्ग पोलीस दलाचे अधिकारी कर्मचारी नसतात . अकोला रेल्वे स्टेशन येथे जशी घटना घडली तशी अकोट मध्ये घडल्यास कोणा कडे दाद मागायची हा प्रश्न नागरिकांना पडला आहे. रात्री शेवट ची मेमू ही ८ वाजता अकोला करिता निघते . त्या मुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन अकोट रेल्वे स्थानकावरून प्रवास करावा लागत आहे. रेल्वे प्रशासन अकोला सारखी घटना अकोट मध्ये घडण्याची वाट बघत आहे.

# मनपाची अर्थसंकल्पीय सभा संपन्न



■अकोला,दि २५ (प्रतिनिधी):
दि.२५ मार्च २०२५ रोजी अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये सकाळी ११.३० वा. सन २०२४-२५ चे सुधारित व सन २०२५-२६ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत अर्थसंकल्पीय सभेचे आयोजन करण्यात होते. या सभेमध्ये अंदाजपत्रकीय तरतुदीस अनुसरून मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मनपा आयुक्त यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना महानगरपालिका प्रशासनाचे प्राप्त होणारे उत्पन्न तसेच मनपा लोकाभिमुख सेवा देण्याकरिता तसेच आसवश्यक सोई-सुविधा पुरविण्याकरिता अपेक्षित कामानिहाय खर्च याचा समातोल राखीत १०.९२ कोटी शिल्लकीचे अंदाजपत्रक सादर केले. सदर सभेचे संचालन अनिल बिडवे यांनी तर अंदाजपत्रकीय सभेचे प्रास्ताविक मुख्य लेख अधिकारी जगदीष मानमोठे यांनी केले.

यावेळी मुख्य लेखा अधिकारी, जगदीष मानमोठे, मुख्य लेखा परिक्षक वैजनाथ शेळके, मनपा उपायुक्त गीता ठाकरे, शहर अभियंता नीला वंजारी, कार्यकारी अभियंता अजय गुजर, महानगरपालिका सचिव अमोल डोईफोडे, सहा.आयुक्त विजय पारतवार, विठ्ठल देवकते, दिलीप जाधव, शिक्षणाधिकारी डॉ. शाहीन सुल्ताना यांचेसह सर्व विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

## श्री जितेंद्रदास आनंदकंद महाराज याची पाचदिवसीय श्री शिवमहापुराण की कथा ३० मार्च से ३ एप्रील प्रर्यत

**अकोला :** अकोला शहरातील विख्यात व मागील कुंभ मेळ्या प्रमाणे याही वर्षी प्रयागराज येथील कुंभमेळा मध्ये राज राजेश्वर महाराज यांच्या कृपेने व सर्वाच्या सहकार्याने संपन्न झालेल्या शिवपुराणकथे नंतर अकोला येथे राजेश्वर मंदिरात जितेंद्रदास आनंदकंद महाराज याची पाचदिवसीय श्री शिवम हापुराण कथा ३० मार्च ते ३ एप्रील प्रर्यत सायं ५ ते रात्री ८ वाजे प्रयत्न आयोजित करण्यात आली आहे तर त्यामध्ये रुद्र स्वाहाकार दि ४ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता व कन्यापूजन सकाळी १० वाजता आणी १०८ ब्राह्मण पूजन भोजन दुपारी. १२ वाजता नंतर गंगा महाप्रसादी भव्य भंडारा दुपारी. १ वाजेपासुन चे शुभ आयोजन करण्यात आले आहे तरी जितेंद्रदास आनंदकंद महाराज याच्या अमृततुल्य वाणीतून श्री शिव महापुराण कथेची संधी उपलब्ध झाली आहे.

# बेलुरा खुर्द येथे अवैध गौण खनिज उत्खननावर प्रशासनाचा दणदणीत दंड -४.६८ लाखांचा दंड, ३ ट्रॅक्टर जप्त



■पातुर,दि २५ (प्रतिनिधी):
अवैध गौण खनिज उत्खननाविरोधात प्रशासनाने पुन्हा एकदा कठोर पावले उचलत मोठी कारवाई केली आहे. बेलुरा खुर्द येथे मंडळ अधिकारी व तलाठ्यांच्या पथकाने धडक कारवाई करत ३ ट्रॅक्टर जप्त केले असून, एका ट्रॅक्टरला जागेवरच पलटी करावे लागले. या कारवाईत प्रशासनाने एकूण ४.६८ लाख रुपयांचा दंड ठोठावला असून, यामुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

ही कारवाई पातूरचे तहसीलदार डॉ. राहुल वानखडे यांचे मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी श्रीमती शेफाली देशमुख, तसेच तलाठी श्री. डी. के. देशमुख, श्री. मिलके, श्री. अमित सबनीस आणि श्री. गवई यांच्या पथकाने केली.अधिकाऱ्यांनी धाडसाने ही मोहीम राबवून अवैध गौण खनिज तस्करांना चांगलाच धडा शिकवला.कारवाईदरम्यान एक ट्रॅक्टर जागेवरच पलटी होण्याचा प्रसंग घडला, ज्यामुळे मोहिमेचे धोकादायक स्वरूप स्पष्ट होते. मात्र, अधिकाऱ्यांनी कोणताही दबाव न मानता आपल्या जबाबदारीचे पालन करत ही कठोर कारवाई केली.

प्रशासनाच्या या कठोर निर्णया मुळे अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वीही अशा कारवाया करण्यात आल्या असल्या, तरी या नवीन कारवाई मुळे प्रशासन याविषयी किती गंभीर आहे, हे स्पष्ट होते.या कारवाईनंतर स्थानिक नागरिकांनी प्रशासनाचे कौतुक केले आहे आणि अशा मोहिमा सातत्याने राबवाव्यात, अशी मागणी केली आहे. प्रशासनाचा इशारा-अवैध उत्खनन करणाऱ्यांवर कठोर कारवाई सुरूच राहील असे डॉ. राहुल वानखडे यांनी व्यक्त केले या घटनेनंतर प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला आहे की, ज्यांनी बेकायदेशीर उत्खनन करून निसर्गाचा ऱ्हास केला आहे, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. भविष्यात अशाच प्रकारच्या मोहिमा नियमितपणे राबवण्यात येणार असल्याचेही प्रशासनाने सांगितले.संपूर्ण तालुक्यात कारवाईची चर्चा बेलुरा खुर्द येथे झालेल्या या कारवाईची सध्या संपूर्ण तालुक्यात चर्चा आहे. अवैध उत्खनन रोखण्यासाठी अशाच कठोर पावलांची आवश्यकता असल्याचे नागरिकांचे मत आहे.बेलुरा खुर्द येथे प्रशासनाने उचललेले हे पाऊल निश्चितच उल्लेखनीय आहे. अशा कठोर कारवाया भविष्यातही सुरू राहतील, अशी अपेक्षा आहे.

## थोडक्यात

### श्याम के दिवाने गृप गांधी चौकात साकारणार राम दरबार



**अकोला:** सांस्कृतिक व आध्यात्मिक सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या म हानगरातील 'शाम के दिवाने' या युवकांच्या समूहाच्या वतीने व विहिप रामनवमी शोभायात्रा समिती,गांधी चौक मित्र मंडळ व गांधी चौक नवयुवक मंडळाच्या सहकार्याने यंदा गांधी चौक येथील दुर्गा माता मंदिर परिसरात रामनवमी निमित्त अयोध्येतील हुबेहूब दिसणारा भव्य राम दरबारचा देखावा साकारण्यात येणार आहे. गांधी चौक येथील माता मंदिर परिसरात दिनांक २ एप्रिल ते ६ एप्रिल पर्यत भव्य राम दरबार उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अयोध्येच्या धरतीवर हा राम दरबार सजविण्यात येणार असून यात अयोध्येतील हनुमान गढी मंदिराचा ही देखावा सादर करण्यात येणार आहे. या उत्सवाचा भूमिपूजन सोहळा गुरुवार दिनांक २७ मार्च रोजी स ९-३० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यात शाम के दिवाने समूहाच्या समस्त पदाधिकारी व रामभक्त महिला पुरुषांनी उपस्थित राहावे असे आवाहन शाम के दिवाने गुपच्या वतीने करण्यात आले आहे.

# रामनवमी शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हा!

## रामनवमी शोभायात्रा समितीने केला गतवर्षीच्या शोभायात्रेतील झाकीकारांचा गौरव



■अकोला,दि २५ (प्रतिनिधी):
रामनवमी शोभायात्रा समितीचे संस्थापक दिवंगत माजी आ.गोवर्धन शर्मा यांनी पारंपरिक पद्धतीने सुरू केलेल्या रामनवमी शोभायात्रेत अकोलेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.रामनवमी शोभायात्रा समितीच्या वतीने स्थानीय राणी सती धाम येथे गत वर्षी शोभायात्रेत सहभागी झालेल्या देखावेकार, भजनी व आखाडे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा गौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. समितीचे सर्वसर्वाधिकारी कृष्णा गोवर्धन शर्मा यांच्या अध्यक्षतेत संपन्न झालेल्या या सोहळ्यात भाजप जिल्हाध्यक्ष किशोर मांगटे पाटील, समितीचे माजी अध्यक्ष विलास अनासने, रामप्रकाश मिश्रा, शैलेश खरोटे, विहिप बजरंग दलाचे प्रांत सहसंयोजक सुरज भगेवार,विहिप जिल्हाध्यक्ष प्रकाश लोढीया, कोषाध्यक्ष राहुल राठी,प्रकाश घोगलिया,राणी सती धामचे अध्यक्ष जगदीश बाछूका,रा स्व संघाचे अजय नवघरे,हरीश अलीमचंदाणी, महिला समितीच्या माजी महापौर सौ सुमन गावंडे,सौ अर्चना शर्मा,सौ रेखा नालट,सौ पुष्पा वानखडे आदी मान्यवर उपस्थित होते.सर्वप्रथम मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र व स्व आ. गोवर्धन शर्मा यांच्या प्रतिमा पूजनाने या सोहळ्याचा प्रारंभ झाला.समितीच्या वतीने यावेळी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक बजरंग दलाचे सुरज भगेवार यांनी करीत सन १९९० ते १९९२ पर्यतचा अयोध्येतील राम भक्तांच्या कारसेवेचा आलेख सादर करीत रामनवमी शोभायात्रेची माहिती दिली.

आपल्या मनोगतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अजय नवघरे यांनी रामनवमी दिनी होणारी राम जन्माची ही महायात्रा सकल जनमानसाची महायात्रा व्हावी असे म नोगत व्यक्त केले.विहिपचे जिल्हाध्यक्ष प्रकाश लोढीया यांनी आपल्या मनोगतात सर्वांनी श्री रामाच्या एकंदर जीवनाचा आदर्श आपल्या जीवनात घेऊन त्या दृष्टीने मार्गक्रमण करून आपले व समाजाचे कल्याण करावे असे आवाहन केले.

यावेळी समितीचे सर्वसेवाधिकारी कृष्णा शर्मा यांनी उपस्थितांना संबोधित करीत महानगरातील प्रत्येक कुटुंबाने यावर्षी या रामजन्म शोभायात्रेत सहभागी होऊन आपली एकता व अखंडता या दृष्टीने प्रदर्शित करण्याचे आवाहन केले. समितीचे नवनियुक्त अध्यक्ष शैलेंद्र उर्फ बंटी कागलीवाल यांनीही आपले मनोगत व्यक्त करीत आपणावर दिलेली अध्यक्षपदाची जबाबदारी आपण निष्ठेने पूर्ण करून यावर्षी चांगले देखावे व झाकी निर्माण करण्याचा कसोशीने प्रयत्न करू असे आश्वासन देत सामजिक भावना कलुषित होऊ नये याची दक्षता ही घेण्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तर भाजपचे जिल्हाध्यक्ष किशोर मांगटे पाटील यांनी स्व. लालाजींचा हा वसा सर्वांनी शोभायात्रेच्या माध्यमातून पुढे सुरू ठेवावा.

# डीबिटी साठी महा ई सेवा केंद्रात कॅम्प यशस्वी



■माझोड,दि २५ (प्रतिनिधी):
संजय गांधी विभागाच्या लाभार्थ्यांना डीबीटी करणे महत्वाचे असल्या मुळे माझोड येथील महा ई सेवा केंद्राच्या वतीने मंगळवार दि.२५ मार्च रोजी शिबिर राबविण्यात आले. तहसीलदार सुरेश कव्हळे व मंडळ अधिकारी मधुकर काळे यांच्या मार्गदर्शनात हे शिबिर राबवीण्यात आले. माझोडच्या तलाठी स्वाती माळवे व गोरेगांव खुर्द चे तलाठी संदीप गावंडे यांनी डीबीटीचे काम केले. या वेळी गोरेगांव खुर्द,गोरेगांव बुद्रुक व माझोड येथील जवळपास १०० लाभार्थीना लाभ झाला. या वेळी महा ई सेवा केंद्र संचालक साहेबराव खंडारे व ऑपरेटर सचिन खंडारे व गणेश इंगळे यांनी सहकार्य केले.

## बाभुळगाव येथे सीताबाईचे श्रमसंस्कार शिबिर संपन्न

**अकोला :** विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबतच सामाजिक कर्तव्याची सुद्धा जाणीव होण्याकरिता सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालया अकोला द्वारा बाभुळगाव येथे सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिरचे (एन. एस. एस. ) आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. सीकची यांच्या मार्गदर्शनात नुकतेच करण्यात आले होते.

# बार्शीटाकळी पिंजर पोलिस स्टेशनचे प्रशिक्षण शिबिर



■बार्शीटाकळी,दि २५ (प्रतिनिधी):
मूर्तिजापूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी दराडे यांनी बार्शीटाकळी व पिंजर पोलिस स्टेशनचे एक दिवसीय प्रशिक्षण घेतले. २४ मार्चला गुलाम नबी आझाद महाविद्यालयाच्या प्रांगणात पोलिस कर्मचा-यांना रमजान ईद व १४ एप्रिल या सणांमध्ये जमाव नियंत्रण कसे करावे याचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणामध्ये स्प्रिंग सेल, बॉम्ब स्टील एलआरटीएसएलइ ३८ रबर स्प्रे, ३८ प्लास्टिक सेल, बॉम्ब डायनामाइक, ग्रेट नॉर्थ चिली स्प्रे, सेल, अश्रुधूर अशा अनेक प्रकारच्या बॉम्बची माहिती पोलिसांना देण्यात आली. कशा प्रकारे हाताळावे तसेच दंगल कशी नियंत्रित करावी, कारवाई करावी अशी माहिती देण्यात आली. बॉम्बचं डेमो मैदानात करण्यात आले. बार्शीटाकळीचे पीआय तुलकनवार, एपीआय दराडे, पीएसआय सोनवणे, पीएसआय ग्यालोरे उपस्थित होते.


motilal oswal Home Finance

**मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड**
कॉर्पोरेट ऑफिस: मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, एसटी डेपोसमोर, प्रभादेवी, मुंबई-४०००२५
ईमेल:- hfquery@motilaloaswal.com.
CIN Number :- U65923MH2013PLC248741

**ई-लिलाव व विक्रीसाठी सार्वजनिक सूचना**

आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी १५ दिवसांची ई-लिलाव विक्री सूचना आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ आणि ९ च्या तरतुदीसह वाचले. याद्वारे सामान्यत: जनतेला आणि कर्जदार/जामीनदार/गहाणदारांना विशेषत: सूचना देण्यात येत आहे की, मोतीलाल ओसवाल होम फायनान्स एनसी लिमिटेड (पूर्वी अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडे गहाण ठेवलेल्या खाली नमूद केलेली मालमत्ता जसे आहे तेथे जसे आहे तसे आणि जसे आहे तसे ऑनलाइन वर विकले जाईल सरफैसी कायद्याच्या तरतुदींनुसार देय वसुलीसाठी आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इत्यादीसाठी खाली दिलेल्या तपशिलानुसार www.motilaloswalhf.com या वेबसाइटद्वारे सुरक्षितता व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ चे नियम ८ आणि ९ वाचले आहेत.

**ई-लिलावाची तारीख आणि वेळ: १७-०४-२०२५ रोजी सकाळी ११:३० ते दुपारी ०२:०० वाजेपर्यंत (५ मिनिटांच्या कॅशच्या अमर्याद विस्तारांसह)**

| अ. क्र | कर्जदार/जमीनदार/कर्ज खाते | मागणी सूचना तारीख आणि रक्कम | स्थावर मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत, ईएमडी आणि ईएमडी सबमिट करण्याची शेवटची तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | LAN: LXAKO00114-15001072<br>शाखा : अकोला<br>कर्जदार: मयूर श्याम चावरिया<br>सह-कर्जदार: भाग्यश्री मयूर चावरिया | १५-०३-२०१९ साठी रू. १०,१२,७६४/- (रुपये दहा लाख बारा हजार सातशे चौसष्ट फक्त) | फ्लॅट क्रमांक डी-१, चौथा मजला, सूर्या हाईट्स, प्लॉट क्रमांक ७, ८ आणि ९, अनु. क्रमांक २६/२, मौजे-खडकी, ता. आणि जि. अकोला - ४४४००१, महाराष्ट्र | राखीव किंमत: रु. १३,२७,२८४/- (रुपये तेरा लाख सत्तावीस हजार दोनशे चौऐंशी फक्त)<br>ईएमडी: रु. १,३२,७२८/- (रुपये एक लाख बत्तीस हजार सातशे अठ्ठावीस फक्त)<br>ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख: १६-०४-२०२५ |

नियम आणि अटी १. लिलाव बोली दस्तऐवजाच्या पुढील अटी व शर्तींनुसार आणि त्यात नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार आयोजित केला जातो. बोलीदारांनी बोली माहिती आणि समर्थनासाठी, ई-लिलावासाठी ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेची माहिती आणि ऑनलाइन सादर केला जाणारा बोली फॉर्मसाठी, सध्याच्या ई-लिलाव सेवा प्रदात्या, मेसर्स एआरसीए एमआरटी प्रायव्हेट लिमिटेडच्या वेब पोर्टल https://www.auctionbazaar.com/ ला भेट देऊ शकता. इच्छुक खरेदीदार त्याच पोर्टलवर लिलावाच्या अटी व शर्ती आणि प्रक्रियेतून जाऊ शकतात आणि भूषण मोरेश्वरराव पवार ८६५७९५६०४० आणि सुरेंद्र गिते ९३२४९०६९३६ यांच्याशी संपर्क साधू शकतात. वर नमूद केलेल्या वेब पोर्टलवर तपशील उपलब्ध आहेत आणि त्यांच्या सेंट्रलाइज्ड हेल्प डेस्क +९१ ८३७०९ ६९६९६, ई-मेलशी संपर्क साधू शकतात. आयडी.contact@auctionbazaar.com

एसडी/-

ठिकाण: महाराष्ट्र
दिनांक: २६.०३.२०२५

भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

अधिकृत अधिकारी, मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड
(आधी अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)

# नवा मुद्दा : दिशा सालियान

औरंगजेबाचा मुद्दा काही अंशी मंदावल्याचे दिसुन येत आहे. छावा चित्रपट बघितल्याने मुघल सम्राट औरंगजेबच्या व्यक्तिमत्वाविषयी भारतीय जनतेच्या मनात अतिशय द्वेषाची भावना निर्माण झाली.या द्वेषभावनेतून संभाजीनगर येथील औरंगजेबाची कबर उखडून टाकण्याची एकमुखी मागणी होऊ लागली.

हिंदूत्ववादी संघटना या कामी पूढे होत्या. त्यानंतर नागपूर येथे जातीय दंगल उसळली. समाजासमाजात तेढ निर्माण झाली. अनेक निरपराध लोक यात नाहक बळी ठरले. शासकीय संपतीचे नुकसान झाले. हिंदू विरुद्ध मुस्लीम असा नागपूरच्या दंगलीला रंग देण्याचा प्रयत्न झाला. वातावरण पुन्हा बिघडेल अशी परिस्थिति निर्माण झाली. पोलिसावर हल्ला करण्यात आला. दगडफेक, जाळफोळ करण्यात आली. जवळपास ३० वाहने जाळण्यात आली. संपूर्ण देशात या दंगलीचा वनवा पेटतो की काय? अशी एकूण परिस्थिती निर्माण झाली.

त्यातही काही नेत्यांच्या चिथावणीखोर बोलण्यामुळे सामाजिक परिस्थिती अजून बिकट झाली. अशा परिस्थितीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनिल आंबेकर यांनी संघाची भूमिका स्पष्ट केली. औरंगजेबाचा मुद्दा हा सध्या संयुक्तीक वाटत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर सध्या माहोल शांत झाला. संघाने उशिरा का होईना आपली प्रतिक्रिया दिल्यामुळे वाद थोडा शांत झाला.

तमाम हिंदुत्ववादी संघटना शांत झाल्या. औरंगजेबाची कबर संरक्षित स्थळ म्हणून घोषित करण्यात आले. मात्र हिंदूत्ववादी संघटनानी बाबरी मश्जीद सारखीच औरंगजेबाची कबरीची स्थिती निर्माण करु असा इशारा दिल्यामुळे वादाची ठिणगी पुन्हा जिवंत झाली.

औरंगजेबाचा मुद्दा शांत होतो न होतो तोच आमच्या राजकारण्यांनी दिशा सालियान मुद्दा पुन्हा उकरून काढलेला आहे. पाच वर्षापूर्वी म्हणजेच ८ जुन २०२० ला दिशा सालियानचा मृत्यू झाला होता. चौदाव्या मजल्यावरुन पडून तिचा मृत्यू झाला होता. ही आत्महत्या होती की हत्या? यावर बरेच रणकंदन झाले.

पोलीस तपासात ही आत्महत्या होती, असे पुढे आले होते. ज्या रात्री आत्महत्या झाली होती त्या वेळेला कोणतीही पार्टी नव्हती किंवा दिशावर बलात्कार झाला नव्हता, असा निष्कर्ष पोलीसांनी त्यावेळेला काढला होता. मात्र नारायण राणेंनी उद्धव ठाकरेना बदनाम करण्यासाठी या प्रकरणात आदित्य ठाकरेचे नाव जोडण्याचा प्रयत्न केला.

या प्रकरणात तीन सदस्यीय एसआयआय. नेमण्यात आली. त्यांचा सुद्धा रिपोर्ट आत्महत्या असाच आला. आता दिशा सालीयान प्रकरणाला पाच वर्षाचा कालावधी लोटून गेला. या दरम्यानच्या काळात दिशा सालीयान यांचे वडील सतीश सालीयान यांनी कधीही या प्रकरणाबाबत गेल्या पाच वर्षात उच्च न्यायालय किंवा इतर न्यायालयात याचिका दाखल केलेली नाही. औरंगजेबाचे प्रकरण मिळते न मिळते दिशा सालीयानचा मुद्दा राजकारण्यांनी उकरून काढला व अर्थसंकल्पीय अधिवेशनात यावर गरमागरम चर्चा झाली.

ज्या मनिषा कायदे यांनी सोशल मिडीयावरून आदित्य ठाकरेची बाजू घेतली होती त्यांनी आता आपले सूर बदलले आहे. पक्ष बदल केल्यामुळे आपल्या वाणीत बद्दल घडवून आणलेला आहे, असा आरोप करण्यात आला.

राजकारणी लोकांना आता काही उद्योग राहिलेले नाहीत . रातोरात पक्ष बदलविल्या जात आहेत. स्वतःच्या स्वार्थासाठी पक्ष बदल केला जात आहे. नैतीकतेचा पूर्णता ऱ्हास होत आहे. कुणाकडूनही नैतिकतेची अमंलबजावणी होतांना दिसून येत नाही. राजकारणात वाईट विचारांचा शिरकाव झालेला आहे. पद, प्रतिष्ठा, पैसा या पलीकडे साधनशुचितेला महत्व उरलेले नाही. ही वास्तविक परिस्थिती आहे.

गेल्या पाच वर्षापासून सतिश सालीयान हे गप्प का होते? इतक्या उशिराने त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचीका का दाखल केली? असे प्रश्न सामान्य जनतेच्या मनात निर्माण झाले आहेत. आपल्या याचिकेतून त्यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

न्यायालय जो निर्णय देईन तो तर देईलच. खरे काय किंवा खोटे काय ? याचा निर्णय लागेलच. मात्र, पोलीस प्रशासनाने यावर आधीच टिप्पणी केली असल्यामुळे हा विषय अधिवेशनात लाऊन धरल्यामुळे सामान्य माणसाच्या समस्याकडे लक्ष द्यायला आमच्या लोकप्रतिनींना वेळ नाही का.० ? असा प्रश्न या निमित्याने विचारला जात आहे.

नितीन कैलासराव गोहने
हिरापूर, ता. सावली
जि. चंद्रपूर
8275393387

राज्यात रोज कुठे ना कुठे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. नापिकी व कर्जबाजारपणा यामुळे शेतकरी वैतागलेला आहे. राज्य शासनाने आपल्या जाहीरनाम्यात शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. हे आश्वासन अर्थसंकल्पात पूर्ण करता आले नाही विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नाही. भ्रष्ट मंत्र्यावर आरोप केल्या जात असतांना सुद्धा त्याला पाठीशी घालण्याचे धोरण स्वीकारल्या जात आहे.

माणिकराव कोकाटे, धनंजय मुंडे,संतोष देशमुख, या प्रकरणावरून लक्ष हटविण्यासाठी सत्ताधारी पक्ष आटोकाट प्रयत्न करीत आहे. २२ उद्योगपतीचे १६ लाख कोटीचे कर्ज माफ केल्या गेले. मात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे कोणतेही धोरण सरकारने स्वीकारले नाही. या व अशा अनेक समस्या असतांना लोकप्रतिनिधी याकडे दुर्लक्ष करीत आहे.

राजकीय चिखलफेकीत वेळ वाया जात आहे. याला फसवा, त्याला फसवा अशा कुरापती केल्या जात आहे. बेभान वक्तत्व करून सामाजिक एकीचा भंग करण्याचा प्रयत्न राजकारण्यांकडून केल्या जात आहे.

सामान्य माणसाला आता राजकारण म्हणजे आखाडा वाटायला लागला आहे. जा सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी लोकांनी निवडून दिले ते न सोडविता जनतेचा हिताच्या नसलेल्या प्रश्नावर चर्चा करणे वेळ घालविणे म्हणजे मतदारांचा अपमान आहे.

ग्रामीण भागात प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुलाचे बांधकामे सुरु आहेत. रेती प्रश्न एरणीवर आहे. रेती अभावी ग्रामपंचायतीची कामे, घरकुलाची कामे, सार्वजनिक कामे ठप्प पडलेली आहेत. मात्र सरकारने अजूनही वाळू धोरण आणलेले नाही. घरकुलाच्या रक्कमेतही वाढ केलेली नाही. सामान्य लोकांच्या समस्या अनेक प्रकारच्या आहेत. त्या सोडविण्याचा प्रयत्न करायला हवा. अनावश्यक मुद्यांना राजकीय व्यक्ती प्राधान्य देत आहेत. औरंगजेबानच्या कबरीचा मुद्दा थांबला आहे. दिशा सालीमान प्रकरण नव्याने उकरण काढल्या जात आहे.

औरंगजेबाची कबर ३५० वर्षापूर्वीची आहे. दिशा सालीमान प्रकरण पाच वर्षापूर्वीचे आहे. पोलीस तपासातही काहीही निष्पन्न झाले नव्हते. आता पुन्हाही ते निघणार नाहीच ही परिस्थिती असली तरी जुने तथ्यहीन मुद्दे काढून सभागृहाचा वेळ वाया घालविला जात आहे. सामान्य माणसाचे प्रश्न, कष्टकरी, शेतकरी, बेरोजगार, नौकरदार, यांचे प्रश्नाला प्राधान्य मिळावे हीच अपेक्षा मतदारांची आहे. यादृष्टीने प्रयत्न होतील अशी अपेक्षा करूया.

■ ■ ■

# अनिष्ट रूढी आणि परंपरा हद्दपार करण्याकडे साहित्यिकांची लेखणी वळावी

खरं म्हणजे राजकीय , सामाजिक, धार्मिक, सांस्कृतीक, शैक्षणिक क्षेत्रांमध्ये जशी विभागणी दिसून येते, अगदी त्याचप्रमाणे नजिकच्या काळात साहित्याच्या क्षेत्रात सुद्धा उच्चशिक्षित, अर्धशिक्षित आणि अल्पशिक्षित अशी विभागणी बघायला मिळते.

या उतरंडीनुसार साहित्याच्या क्षेत्रात शाळा, महाविद्यालयामधून विद्यार्थ्यांना मराठीसह अन्य भाषेत विषयानुरूप विद्यादान करणाऱ्या शिक्षक, प्राध्यापकांची संख्या मोठ्या प्रमाणात असून, काही अभिनंदनिय अपवाद वगळता अनेकांनी पदोन्नती अर्थात पैसा प्रतिष्ठा आणि प्रसिद्धीसाठी मराठीसह अन्य विषयांवर संशोधन करून आचार्य पदवी प्राप्त केल्याचे दिसून येते.सोबतच शिक्षक, अधिव्याख्याता म्हणून विद्यार्थ्यांना प्राधान्याने मराठी व अन्य विषयांचे विद्यार्जन करावे लागत असल्याने, आपल्या हुद्यावर चाकोरी करतांना गलेलट्ठ वेतनासह प्राध्यापकी ही समाजमान्य प्रतिष्ठीत नोकरी सांभाळून साहित्य निर्मिती करणे म्हणजे त्यांच्यासाठी एकत्रितपणे पद, पैसा, आणि प्रसिद्धीतून प्रतिष्ठा आपसुकच योगायोगाने प्राप्त होत असली तरी, त्यासाठी साहित्यिकांनी आपल्या विद्यार्थी दशेपासूनच रात्रंदिवस अभ्यास करून अर्थात मेहनत घेऊन प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली असते.



आर. एस. तायडे
सामाजिक कार्यकर्ते
कोणार्क कॉलनी, अमरावती.
९४२०१२५७६२

कोणतेही यश हे सहज प्राप्त होत नसते तर त्यासाठी त्यांनी ठेवलेले सातत्य आणि घेतलेले परीश्रम कारणीभूत असतात.एकमात्र नक्की की, त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील हुद्यांमुळे सहजच त्यांना अभ्यास, वाचन, मनन, चिंतन, संभाषण प्राप्त होऊन, त्यातूनच पुढे प्रसिद्ध मान्यवर साहित्यिक, व्याख्याते बनण्याची संधी त्यांना प्राप्त झालेली असते. ते त्यांच्या विषयात आचार्य पदवीधारक डॉ. असल्याने साहजिकच त्यांच्या साहित्यात व्याकरणाची घट्ट पकड असणे समजून घेण्यासारखे आहे.

परंतु केवळ साहित्यात व्याकरण शुद्ध असल्यानेच समाज परीवर्तन होत नसते यावर सुद्धा त्यांनी विचार करण्याची गरज आहे.कारण संबंधित साहित्याच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शिक्षक, प्राध्यापकांच्या व्यतिरिक्त समाजात ग्रामीण भागापासून तर शहरी भागापर्यंत जो मध्यमवर्गीय साहित्यिक वर्ग आहे, तो इतरत्र आस्थापनेत कार्यरत अथवा खासगी क्षेत्रात काम करीत असतांनाच साहित्य निर्मिती करून तो आपल्यापरीने साहित्यिक योगदान समाजापर्यंत पोहोचवित असतो.

साहित्यातील तिसऱ्या प्रकारात मोडणारा वर्ग म्हणजे अल्पशिक्षित साहित्यिक वर्ग,जो ग्रामीण, अतिदुर्गम, दऱ्याखोऱ्यातील अविकसित भागापासून तर शहरी भागांपर्यंत झोपडपट्टीत वास्तव्यास असलेल्या साहित्यिकांचा वर्ग समजण्यात येतो त्यांनी सुद्धा समाजोपयोगी, प्रबोधनात्मक साहित्य निर्मिती केली असल्याचे दिसून येते.

त्यांच्यातील काही अशिक्षित असल्याने त्यांचे साहित्य ते स्वतःहा कागदावर उतरवू शकले नसले तरी पण, त्यांच्या पुढे बसलेल्या शिक्षित समाजातील श्रोत्यांनी अशिक्षित साहित्यिकांच्या भाषा, बोलीतून त्यांचे विचारसाहित्य कागदावर आणण्याचे महान कार्य केले असून, ते आजच्या पिढीतील साहित्यप्रेमींना साहित्य पर्वणीच ठरत आहे. अशा अशिक्षित, अल्पशिक्षित साहित्यिकांनी आपल्या प्रबोधनातून जे समाज प्रबोधन केले ते खऱ्याअर्थाने आजच्या पिढीला निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

अशा साहित्यिक प्रबोधनकारांमध्ये बहीणाबाई, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, अण्णाभाऊ साठे, नामदेव ढसाळ, वामनदादा कर्डक, विठ्ठल उमप, राजानंद गडपायले, नामदेवराव पाटणकर, बी. काशिनंदा, नारायण सुर्वे, राघोजी बनसोड, उत्तम मुळे, मदन नंदेश्वर अशा कितीतरी ज्ञात-अज्ञात साहित्यिक मान्यवरांचा अत्यंत आदरपूर्वक नामोल्लेख करावा लागेल. जे उच्चशिक्षित नव्हते सोबतच ते अल्पशिक्षित असल्याने त्यांना कोणत्याही सुखसोयी, सुविधा, आर्थिक बळ नसतांना त्यांनी अत्यंत विपरीत परिस्थितीत समाजाच्या अनिष्ट चालीरीती, अमानुष परंपरा विरूद्ध साहित्याची निर्मिती करून समाज प्रबोधन केले. मुळातच ते अशिक्षित अथवा अल्पशिक्षित होते त्यामुळे त्यांच्या साहित्यात खरंच व्याकरणाचा लवलेश तरी होता काय? तरी त्यांचे विचार प्रबोधन माणसांच्या हृदयापर्यंत कसे पोहोचले? याचा विचार प्रतिष्ठित आणि धनसंपन्न, विद्वान साहित्यिक मान्यवरांनी करणे गरजेचे आहे.

आजही देशाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत अर्धी अधिक जनता निरक्षर आहे, जी ग्रामीण क्षेत्रातील अतिशय दुर्गम भागात राहते.त्यामुळे वाढती धर्मांधता, अंधश्रद्धा, जातियवाद, माणसां माणसांतील भेदभाव, तरूणी- महिलांवरील वाढते अत्याचार, बलात्कार, बेरोजगारी, भ्रष्टाचार, महागाई, ढासळलेले राजकारण अशा प्रकारे सामान्य माणसांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांनी जनजीवन विस्कळित झाले असतांना तळागाळातील शेवटच्या वंचित समाजघटकांना सामाजिक परीवर्तनाच्या दिशेने साहित्यातून प्रबोधन होण्याची अत्यंत गरज आहे.

कालपर्यंत ग्रामिण भागातील अशिक्षीत महिला जात्यावर भल्या पहाटे उठून गाणे गाऊन दळण दळणाऱ्या महिलांची गाणे आपला इतिहास उजागर करीत होत्या. आज आपण सुधारलेल्या समाज व्यवस्थेत वावरत असलो तरी, समाजातील वंचित घटक अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत, भितीयुक्त वातावरणात, धर्मांधतेच्या खाईत लोटल्या जात असून, हजारो उच्चशिक्षित आचार्य पदवी प्राप्त तरुण नोकरीसाठी वणवण भटकंती करीत आहेत.

सामान्यांपासून शिक्षण हिसकावून घेतल्या जात आहे. सत्ताधाऱ्यांकडून पावलोपावली संविधानिक मुल्य पायदळी तुडवल्या जात आहे, गरीबांना महागाईचे चटके असह्य होत आहेत, बेरोजगारीचे संकट अधिकाधिक गडद होत आहे, दिवसाढवळ्या सरपंचासारख्या प्रतिष्ठित माणसांच्या अत्यंत निर्दयीपणे हत्या होत आहे, जिकडे तिकडे गुंडगिरी, झुंडशाही माजविण्याचे प्रकार हल्ली महाराष्ट्रात वाढत्या संख्येने व्हायला लागलेत

अशा समाजविघातक प्रवृत्तीवर अंकुश ठेवण्यासाठी तथा समाजाला भेडसावणाऱ्या विविध सामाजिक समस्यावर किती मान्यवर साहित्यिक आपली लेखणी झिजवत आहेत, हा खरा प्रश्न आहे.

महालात राहणाऱ्यांना झोपडपट्टीतील वेदना समजण्याची गरज आहे आणि त्यादृष्टीने सामाजिक जागृती करण्यासाठी खऱ्या अर्थाने साहित्यिकांची लेखणी झिजणे आवश्यक असतांना त्यांना व्याकरणातील दुर्बळता महत्त्वाची वाटते, परंतु सर्व आघाड्यांवर दुर्बल होत चाललेल्या समाज बांधवांना धिर देण्यासाठी अथवा समाजातील एक सामाजिक घटक समजून त्यांच्यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची आवश्यकता कधीच साहित्यिकांना वाटू नये, ही खरी शोकांतिका व चिंतेची बाब ठरते.

सद्यस्थितीत त्यांना साहित्यातील व्याकरण महत्त्वाचे आहे की, येथील व्यवस्थेने हक्कांपासून वंचित ठेवलेल्यांचे सामाजिक संरक्षण महत्त्वाचे आहे, याचा साहित्यिकांनी विचार करण्याची वेळ आली आहे. त्या अनुषंगाने मान्यवर साहित्यिकांना कळकळीची नम्र विनंती करावीशी वाटते की, देश आणि राज्यातील समाज स्वास्थ्य बिघडवल्या जात असतांना त्यांनी व्याकरणाला महत्त्व देऊन साहित्याला गौन न ठरवता सामाजिक परीवर्तनासाठी आपली अमुल्य अशी लेखणी झिजवावी.हिच विद्वान साहित्यिक मान्यवरांकडून अपेक्षा आहे आणि तीच बदलत्या काळाची गरज सुद्धा!

■ ■ ■

# उष्माघात टाळा, आरोग्य सांभाळा...

सध्या उन्हाळा सुरु झाला असून दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. भारतात हवामान खाते व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या निकषानुसार मैदानी भागात ४० डिग्री अंश सेल्सीअस, डोंगराळ भागात ३० डिग्री अंश सेल्सीअसपेक्षा व समुद्र किनारी भागात ३७ अंश डिग्रीपेक्षा जास्त तापमान जात असल्यास त्यास उष्मलाट प्रवण क्षेत्र मानले जाते. उष्मा-लहर ही वातावरणीय तापमानाची स्थिती आहे. ज्यामुळे शारीरिक ताण येतो, ज्यामुळे कधीकधी मानवी जीवनावर अतिशय विपरीत परिणाम होत असतो. कोणत्याही ठिकाणचे कमाल तापमान सलग दोन दिवस 45 अंश सेल्सिअसपेक्षा जास्त राहिल्यास त्याला उष्मा लहरी स्थिती म्हणतात.

----------------

वाढत्या तापमानामुळे उन्हात फिरणाऱ्या व्यक्तीला उष्माघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घ्यावयाची काळजी, उपाययोजना याची माहिती या लेखाच्या माध्यमातून जाणून घेण्यात येत आहे.





: संकलन :
सतिश आनंदराव बगमार
माहिती सहायक,
जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा.

बुलढाणा जिल्ह्यामध्ये तापमानाचा पारा वाढत आहे. कडाक्याच्या उन्हाळ्यात तापमानाचा पारा पुढील तीन महिने ४२ ते ४५ अंशांच्या घरात राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या शेतीची कामे सुरू असून शेतमजूर आणि शेतकरी उन्हाची पर्वा न करता शेतात राबतात. त्यामुळे त्यांना उष्माघाताचा फटका बसण्याची सर्वाधिक शक्यता असते.

उष्माघाताचा लोकांना त्रास होऊ नये, यासाठी जिल्हा आरोग्य प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व उपजिल्हा रुग्णालयात स्वतंत्र उष्माघात कक्ष सुरू केले आहेत. उष्माघात कक्षात रुग्णांसाठी बेड, कुलर, थंड पाण्याची व्यवस्था, फॅन यासह औषधोपचारासाठी आवश्यक असलेली सर्व सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**उष्माघाताची लक्षणे :** उन्हाळा सुरु झाला की, उन्हात फिरल्यामुळे डोके दुखी, ताप, जास्त घाम येणे आणि बेशुद्ध पडणे, अशक्तपणा जाणवणे, शरीरात पेटके येणे, नाडी असामान्य होणे.

**लक्षणे आढळल्यास घ्यावयाची काळजी:** व्यक्तीला सावलीच्या ठिकाणी झोपवा, व्यक्तीचे कापडे सैल करा, त्याला द्रव पदार्थ, कैरीचे पन्हे पाजा, तापमान कमी करण्यासाठी थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवा, बाधीत व्यक्तीला तात्काळ जवळच्या आरोग्य केन्द्रात घेऊन उपचार आणि वैद्यकीय सल्ला घ्या.

**उष्माघाताची प्रौढांमध्ये दिसणारी लक्षणे :** शरीराचे तापमान १०४ फॅरन्हाईटपर्यत (४० डिग्री सेल्सिअस) पोहोचल्यास स्नायुंचे आखडणे, मळमळणे, उलटीचा भास होणे, चिंता वाटणे व चक्कर येणे हृदयाचे ठोके वाढणे, धडधडणे.

**उष्माघाताची लहान मुलांमध्ये लक्षणे :** आहार घेण्यास नकार देणे, नियीमत चिडचिड होणे, लघवीचे कमी झालेले प्रमाण, कुठूनही रक्तस्त्राव होणे, तोंडाच्या येथील त्वचा कोरडी होणे, शुष्क डोळे होणे.

**उष्माघातामुळे त्रास झाल्यास करावयाचे प्रथमोपचार :** त्रास झालेल्या मुला,मुलीला लगेच घरात किंवा सावलीत आणावे, संवेदनशील राहुन त्यांचे कपडे सैल किंवा ढिले करावेत, नळाच्या पाण्याने ओल्या केलेल्या पट्ट्या शरीरावर ठेवाव्यात, उलटी होत असल्यास त्यांना एका कुशीवर वळवावे. जेणेकरुन ते गुदमरुन जाणार नाहीत.

हवा येण्यासाठी पंख्याचा वापर करावा, पायाखाली उशी किंवा तत्सम काही ठेवुन त्यांना आडवे पडायला सांगावे, वारंवार स्वच्छ आणि थंड पाण्याचे घोट पाजावेत, बेशुद्ध असल्यास त्यांना खायला किंवा प्यायला काहीही देण्याचा प्रयत्न करु नये.

**उष्णतेच्या लाटेदरम्यान काय करावे :** हलके खावे, फळे आणि सलाड सारखे पचायला हलके असणारे अन्न खावे, पुरेसे पाणी प्या, सैल, हलके, फिक्या रंगाचे आणि सुती कपडे परिधान करावेत. गॉगल, छत्री, टोपी, बुट, चप्पल घालूनच घराबाहेर पडावे. प्रवास करतांना पाण्याची बाटली आपल्याजवळ बाळगावी. थंड पाण्याने आंघोळ करावी. घराबाहेरील उपक्रम, मैदानी उपक्रमादरम्यान थोड्या-थोड्या वेळाने विश्रांती घ्यावी. विश्रांतीची वारंवारता वाढवावी.

**उष्माघातापासुन बचावासाठी काय करावे :** घराबाहेर जाण्यापुर्वी भरपुर पाणी प्यावे, सुती, सैल आणि आरामदायी कपडे घाला. भरपुर ताजे अन्न खाल्यानंतरच घरातुन बाहेर पडा. घराबाहेर जातांना डोके झाका किंवा छत्रीचा वापर करा. पाणी, ताक, ओ.आर.एस पाण्याचे द्रावण किंवा लस्सी, निंबुपाणी, आंबा, पन्हे इत्यादी पेय घ्या.

**उष्माघातापासुन बचावासाठी काय करू नये :** रिकाम्या पोटी घराबाहेर पडु नका, उन्हात अधिकवेळ राहु नका, तिखट, मसालेदार आणि शिळे अन्न खाऊ नका, नेहमी पाणी सोबत ठेवा, शरिरात पाण्याची कमतरता कमी पडु देवु नका. उष्णतेचा त्रास झालेल्या व्यक्तीची मदत करत असतांना या गोष्टीचा अवलंब करावा.

संबंधित व्यक्तीला थंड ठिकाणी तातडीने हलवावे. शरिराच्या जास्तीत जास्त भागांवर किंवा कपड्यावर थंड पाण्याचा मारा करावा. शक्य असेल तेव्हढा वेळ त्या व्यक्तीला वारा घालावा. शरिराचे तापमान वाढलेले, बेशुद्ध, गोंधळलेली, घाम येणे, थांबलेली अशी आपल्या नजरेस आल्यास टोल क्रमांक 108 किंवा 102 या क्रमांकावर संपर्क साधावा.

उष्माघात ही गंभीर स्थिती असून वेळीच उपचार न केल्यास जीवघेणा ठरू शकतो. त्याची लक्षणे ओळखून तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे.

गरम वातावरणात स्वतःची काळजी घेणे आणि इतरांनाही सावध करणे गरजेचे आहे. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांनी तीव्र उन्हात फिरु नये, आरोग्याची काळजी घ्यावी. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी वरील सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी केले आहे.

■ ■ ■

# नागपूर दंगल : सुनियोजित कट?

## वाचक लिहितात

नागपूरमध्ये उसळलेल्या दंगलीसाठी ह्यछावाह्व चित्रपट कारणीभूत असल्याचा दावा ऑल इंडिया मुस्लिम जमातचे राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना शहाबुद्दीन रझवी यांनी केला आहे. त्यांनी या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी केली आहे. मात्र, हा चित्रपट फेब्रुवारीमध्येच प्रदर्शित झाला होता. जर चित्रपटामुळे लोकांच्या भावना भडकल्या असत्या, तर दंगल तात्काळ घडली असती. मात्र, दीड महिना उलटल्यानंतर अचानक दंगल होणे हे योजनाबद्धरित्या केलेले षडयंत्र आहे असे लक्षात येते.

या चित्रपटाच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराजांचा खरा इतिहास जगासमोर आला. तसेच क्रूरकर्मा औरंगजेबाने महाराजांना कशा यातना दिल्या आणि त्यांची निघृणपणे हत्या केली, हे सत्य देखील सर्वांसमोर आले. परंतु असे अनन्वित अत्याचार बघून हिंदूच्या मनात उफाळलेली चीड कुठेही हिंसाचाराच्या माध्यमातून बाहेर आली नाही. हिंदूंनी फक्त शांततापूर्ण मोर्चे व आंदोलन केले.

परंतु, ही दंगल घडवून आणणारे सर्व आरोपी कट्टर विचारसरणीचे असून,त्यांनीच दंगल घडवून आणली आहे, हे देखील आता स्पष्ट झाले आहे. तरीदेखील हिंदूंना चुकीच्या पद्धतीने जबाबदार ठरवण्याचा प्रयत्न काही प्रसारमाध्यमे आणि राजकीय नेते करत आहेत.

दंगलीत केवळ हिंदूंच्या दुकानांची, घरांची आणि वाहनांची तोडफोड झाली आहे. सार्वजनिक आणि खाजगी संपत्तीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे ही दंगल अचानक उफाळून आलेली नाही, तर एक हा एक सुनियोजित कट होता असे स्पष्टपणे लक्षात येते.

हिंसक जमावाने महिला पोलिसांवरही हल्ले केले, त्यांच्यासोबत अभद्र वर्तन केले. २०१२ मध्ये आझाद मैदानावर झालेल्या दंगलीतही असेच प्रकार घडले होते. असे दंगे म्हणजे कायदा हातात घेणेच नव्हे का? आता तरी शासनाने यासंदर्भात कठोर कारवाई करावी. दंगलीत झालेल्या सार्वजनिक आणि खाजगी संपत्तीची नुकसान भरपाई दंगलखोरांकडून वसूल करावी, त्यांच्यावर कठोर कारवाई केली तरच अशा घटनांवर आळा बसू शकेल. अन्यथा अशा घटना पुन्हा पुन्हा घडतील.

म्हणूनच, न्याय व कायद्याचा सन्मान टिकवण्यासाठी कठोर कारवाई होण्याची जितकी आवश्यकता आहे,तितकीच आवश्यकता आज हिंदू समाजाला आत्मरक्षणासाठी संघटित होण्याची आहे.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.

## नागपूर दंगलखोरांवर ठोस कारवाईची अपेक्षा !

नागपूर येथे धर्मांधांनी सुनियोजित दंगल घडवून आणली. या दंगलीमागील सूत्रधार फहीम खानला अटक करण्यात आली. फहीम खानच्या पाठीशी कोण होते, त्याला कोणाचा आदेश होता याच्या मुळाशी जाऊन संबंधितावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

या दंगलीत रस्त्यावर उतरून दुचाकी, चारचाकी, तसेच नागरिकांची घरे यांची हानी केली पोलिसांवर आक्रमणे केली अशी माहितीच फक्त सध्याच्या घडीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी दिली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडून आता बेधडक कारवाईची अपेक्षा आहे.

उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेश या राज्यांप्रमाणे आता महाराष्ट्रातही दंगलखोरांवर वचक बसवण्यासाठी दंगलखोरांच्या घरांवर लगेच बुलडोझर फिरवला पाहिजे. यामध्ये जनतेसोबत पोलिसांवर केलेल्या हल्ल्याचे गांभीर्य पाहता मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी आता थातुरमातुर कारवाई न करता ठोस कारवाईच केली पाहिजे. अन्यथा जिहादी धर्मांधांचा आत्मविश्वास अजून वाढेल!

■ भूषण वाळणुसकर, डोंबिवली.

# दररोज सकाळी हळदीचे पाणी प्यायल्याने शरीरात काय बदल होतात?



हळद एक असा मसाला आहे जो आपल्या अन्नाची चव आणि रंग वाढवतो. परंतु तो आपल्या आरोग्यासाठी आणि सौंदर्यासाठी देखील खूप फायदेशीर आहे. अन्नापासून ते त्वचेसाठी हळद वापरली जाते.

हळदीमध्ये अँटी-इंफ्लेमेटरी, अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-बॅक्टेरियल असे अनेक गुणधर्म असतात जे आपल्या शरीराच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. दररोज सकाळी एक ग्लास पाण्यात अर्धा चमचा हळद पावडर मिसळून प्यायल्याने अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात.

**वेदना कमी करतेः** हळदीमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात हळद वेदना आणि सूज कमी करण्यास मदत करते. हे गुणधर्म शरीरातील वेदना आणि जळजळ निर्माण करणाऱ्या केमिकल्सचा परिणाम होऊ देत नाही, ज्यामुळे वेदना आणि सूज कमी होते.

**त्वचेसाठी फायदेशीर :** हळदीमध्ये अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात जे त्वचा निरोगी आणि चमकदार बनवण्यास मदत करतात. हे गुणधर्म त्वचेवरील ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करतात, ज्यामुळे त्वचेची वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावते. याव्यतिरिक्त, हळदीमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म देखील असतात जे त्वचेची सूज आणि लालसरपणा कमी करण्यास मदत करतात.

**पचनसंस्था सुधारतेः** हळदीमध्ये पाचक एंजाइम असतात जे पचनसंस्थेसाठी खूप फायदेशीर ठरतात. सकाळी नियमितपणे हळदीचे पाणी प्यायल्याने गॅस आणि इतर पचन समस्यांसारख्या पचन समस्यांपासून तुमचे रक्षण होते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते :** हळदीमध्ये कर्क्यूमिन नावाचे संयुग असते, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. हे संयुग शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते, ज्यामुळे आपल्याला रोगांशी लढण्यास सक्षम बनवते.

**वजन कमी करण्यास मदत करते :** हळदीमध्ये चयापचय वाढवणारे गुणधर्म असतात जे वजन कमी करण्यासाठी फायदेशीर असतात. हे गुणधर्म शरीराचा चयापचय दर वाढवतात, ज्यामुळे शरीर अधिक कॅलरीज बर्न करते आणि वजन कमी करते.

**त्वचेच्या आरोग्यासाठी उपयुक्तः** हळदीचे पाणी त्वचेला आतून निरोगी ठेवते. डाग, मुरुम, वयाच्या खुणा कमी होण्यास मदत करते.

**शरीर डिटॉक्स करतेः** हळदीचे पाणी यकृताची कार्यक्षमता सुधारते आणि शरीरातील विषारी घटक बाहेर टाकते.

**सांधेदुखी व सूज कमी करतेः** हळदीतील दाहनाशक गुणधर्म सांधेदुखी आणि सूज कमी करण्यास प्रभावी ठरतात.

**हृदयविकाराचा धोका कमी होतोः** हळदीचे पाणी नियमितपणे प्यायल्याने हृदयविकाराचा धोका कमी होतो. म्हणजेच हळदीचे पाणी पिऊन तुम्ही निरोगी आयुष्य जगू शकता. हळदीचे पाणी अत्यंत गुणकारी आहे.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### बळीला मारक धोरण

नवी तुर येता बाजारात
कां बरं कोसळले भाव ?
यांच कारण आयातीला
परवानगी दिली ना राव . .

आज दहा वर्षापूर्वीचा
सोयाबीनला मिळतोय भाव
महागाई निर्देशांक पाहता
कां भावांतर देत नाही राव ?

जय जवान जय किसान
म्हणून थोपटून घेती पाठ
बळीच्या आत्महत्या वाढल्या
कारण तो झालाय भुईसपाट ..!

निवडून दिलेल्या नेत्यांना
सांगा आपल्या व्यथा
नको कर्जमाफी पण
खर्चाधारीत भाव हवा .. !

# गटशेतीचे नवे धोरण आणून आर्थिक मदत वाढवू : देवेंद्र फडणवीस

**पुणे, २५ मार्च :** राज्य शासनाच्या वतीने २०१६ सालापासून वीस शेतकरी व १०० एकर जमीन असेल तर गटशेतीला आतापर्यंत एक कोटी रुपयांचे अनुदान देण्यात येत होते. आता राज्य सरकार गटशेतीचे नवे धोरण आणणार असून आर्थिक मदत वाढवू. त्यातून गटशेतीला आपण आंदोलनाचे स्वरूप देऊ, अशी महत्त्वाची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केली.

बालेवाडी येथील शिवछत्रपती शिवाजी क्रीडा संकुलात येथे पाणी फाऊंडेशनच्या वतीने आयोजित 'सत्यमेव जयते शेतकरी चषक २०२४'च्या भव्य पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. आमीर खान आणि किरण राव यांनी स्थापन केलेली ही संस्था २०१६ पासून दुष्काळमुक्त आणि समृद्ध महाराष्ट्र घडविण्याचे काम करत आहे.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, सह्याद्री फार्म्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे, भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतीलाल मुथा आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्यासह आमीर खान, किरण राव आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. मनोरंजन आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक सेलिब्रिटींनी या कार्यक्रमात ग्लॅमरची भर घातली. यावेळी मान्यवरांनी सर्व सहभागी शेतकरी गटांचे कौतुक केले. तसेच त्यांनी त्यांच्या एकतेचे कौतुक केले आणि शेतीमुळे निर्माण झालेल्या अनिश्चितता आणि आव्हानांचा सामना करण्यासाठी शेतीतील सामूहिकीकरण कसे महत्त्वाचे आहे यावर भर दिला.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पाणी फाऊंडेशनच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि अखिल महाराष्ट्र स्पर्धेचे अधिकृतरीत्या उद्घाटन केले. शाश्वत पाणी व शेती पद्धतीतील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांनी सर्व



शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. जमिनीवर मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणण्यासाठी फाऊंडेशनसोबत सकारात्मक सहकार्य सुरू ठेवण्याची कटिबद्धताही त्यांनी व्यक्त केली.

ते पुढे म्हणाले, मी आधीपासून आमीर खान यांना सांगत होतो तुमची क्षमता संपूर्ण महाराष्ट्राची आहे. आज माझी इच्छा पूरी केल्याबद्दल मी तुमचे आभार मानतो. पाणी फाऊंडेशनचा जलसंधारणाचा विचार सर्वत्र झपाट्याने पसरला पाहिजे. जोपर्यंत शेतकरी व लोक पाण्याचे शास्त्र शिकत नाहीत, जलसंधारणात लोकसहभाग वाढत नाही तोपर्यंत महाराष्ट्र दुष्काळीच राहील. राज्य सरकारच्या वतीने शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. ईश्वरानंतर खरी सृजनशीलता कोणामध्ये असेल तर ती बाळाला जन्म देणाऱ्या आईमध्ये आणि पिकाला जन्म देणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये असते. शेती व जलसंधारणाच्या क्षेत्रात आमची एक लाख माणसे काम करत आहेत. त्यांना आम्ही पाणी फाऊंडेशनच्या मागे उभे करू.

यावेळी बोलताना पाणी फाऊंडेशनचे संस्थापक आमीर खान यांनी २०२६ पासून पाणी फाऊंडेशन आपले कार्य संपूर्ण महाराष्ट्रात करणार असल्याची महत्त्वाची घोषणा केली. यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याला शेतकरी चषक स्पर्धेचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. यातून त्यांना प्रशिक्षण मिळेल आणि एकरी खर्च कमी करण्यासाठी आणि एकरी उत्पादकता आणि उत्पन्न सुधारण्यासाठी ज्ञान मिळेल. आमीर खान आणि किरण राव यांनीही आपल्या भाषणात शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. खान यांनी पाणी फाऊंडेशनच्या व्यापक दृष्टीकोनाबद्दल सांगितले. आर्थिक आणि पर्यावरणदृष्ट्या सक्षम महाराष्ट्र घडविण्यासाठी फाऊंडेशन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते सर्व तालुकास्तरीय पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. पाणी फाऊंडेशनच्या कार्याला शासनाच्या वतीने संपूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

पाणी फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सत्यजित भटकळ यांनी संस्थेच्या कार्याचा प्रभाव मांडताना २०२४ मध्ये शेतकरी चषकात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना १०० कोटी रुपयांहून अधिक अतिरिक्त नफा झाल्याचे नमूद केले. संस्थेचे मुख्य सल्लागार डॉ. अविनाश पोळ यांनी शेतकरी गट स्पर्धेच्या चौकटीबाहेर जाऊन लघुउद्योग व आर्थिक उपक्रम उभारण्यासाठी कसे विलक्षण कार्य करीत आहेत, याची माहिती दिली.

'चला हवा येऊ द्या' या लोकप्रिय मराठी मालिकेच्या टीमने सादर केलेले प्रहसन तसेच पाणी फाऊंडेशनने सादर केलेला मल्टिमीडिया परफॉर्मन्स हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. या सादरीकरणात महाराष्ट्रातील तीन महिला शेतकऱ्यांनी आपल्या जिद्दीच्या आणि यशाच्या कहाण्या सांगितल्या, तसेच सुप्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक फुलवा खामकर व त्यांच्या पथकाने मनमोहक संगीत, गीत तसेच नृत्य सादर केले.

# स्मार्ट राहणीमानासह यंदा सणासुदीचा काळ साजरा करा, सॅमसंगकडून बीस्पोक एआय डिजिटल अप्लायन्सेसवर विशेष फेस्टिव्ह ऑफर्सची घोषणा

**गुरूग्राम, २५ मार्च :** सॅमसंग हा भारतातील सर्वात ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड आपले एआय-पॉवर्ड रेफ्रिजरेटर्स, वॉशिंग मशिन्स, एअर कंडिशनर्स आणि मायक्रोवेव्ह्जवर आकर्षक ऑफर्ससह उगादी, गुढीपाडवा आणि ईद सण साजरा करत आहे. कुटुंबं समृद्धता आणि नवीन शुभारंभाचे स्वागत करण्यासाठी तयारी करत असताना सॅमसंग आपल्या नवीन इनोव्हेशन्सवरील विशेष डिल्ससह होम अपग्रेड्सना अधिक फायदेशीर करत आहे. फक्त ३१ मार्च २०२५ पर्यंत उपलब्ध असलेल्या या लिमिटेड पीरियड ऑफर्स ग्राहकांना अद्वितीय मूल्यामध्ये स्मार्टर व अधिक कनेक्टेड अप्लायन्सेस घरी आणण्याची सुविधा देतात.

किफायतशीर ऑफर्स: ग्राहक निवडक डिजिटल अप्लायन्सेसवर जवळपास ४८ टक्के सूट, जवळपास २०,००० रूपये कॅश-बॅक आणि सुलभ झीरो डाऊन पेमेंट पर्यायांचा लाभ घेऊ शकतात.

विस्तारित वॉरंटी ऑफर्स: निवडक फ्रण्ट लोड वॉशिंग मशिन्सवर २ वर्षांची विस्तारित व सर्वमसोवशक वॉरंटीसह ४,२९० रूपयांचे सॅमसंग केअर+ ४९९ रूपयांच्या स्पेशल किमतीत उपलब्ध आहे. तसेच रेफ्रिजरेटर्सवर एफडीआर व एसबीएस मॉडेल्ससाठी ४४९ रूपयांच्या आणि ५०० लीटरखालील फ्रॉस्ट फ्री मॉडेल्ससाठी ३४९ रूपयांच्या स्पेशल किमतीत १ वर्षाची विस्तारित वॉरंटी ऑफर करण्यात आली आहे.

वॉरंटी ऑफर्स: सॅमसंग रेफ्रिजरेटर्सच्या डिजिटल इन्व्हर्टर कम्प्रेसरवर आणि वॉशिंग मशिन्सच्या डिजिटल इन्व्हर्टर मोटरवर २० वर्षांची वॉरंटी, मायक्रोवेव्ह्जच्या सिरॅमिक एनामेल कॅव्हिटीवर १० वर्षांची वॉरंटी आणि एअर कंडिशनर्सवर ५ वर्षांची सर्वसमावेशक वॉरंटी यां सह दीर्घकाळापर्यंत टिकाऊपणाची खात्री देत आहे, ज्यामुळे प्रत्येक खरेदी दीर्घकालीन गुंतवणूक ठरेल.

इन्स्टॉलेशन ऑफर: बीस्पोक एआय विंडफ्री एसी मोफत इन्स्टॉलेशनसह येतात, ज्यामुळे ग्राहकांना कार्यक्षमपणे उच्च दर्जाच्या कूलिंगचा अनुभव घेता येतो.

ग्राहकांना इंटेलिजण्ट व सर्वोत्तम अप्लायन्सेसच्या माध्यमातून त्यांच्या घरातील राहणीमानाला अधिक उत्साहित करण्याची सुविधा देत या ऑफर्स Samsung.com वर आणि भारतभरातील निवडक सॅमसंग रिटेल आऊटलेट्समध्ये उपलब्ध असतील.

# मलाबार गोल्ड अँड डायमंड्सकडून अकोल्यातील ३६ विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती

**अकोला, २५ मार्च :** भारतातील आघाडीचा व्यवसाय समूह आणि मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची पालक कंपनी असलेल्या मलाबार समूहाने अकोल्यातील ३६ हून अधिक पात्र विद्यार्थिनींना ३,१६,००० रुपयांच्या शिष्यवृत्ती देऊन शिक्षणाद्वारे तरुणींना सक्षम करण्याच्या आपल्या वचनबद्धतेला अधोरेखित केले.



श्री शिवाजी कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स अकोला येथे हा शिष्यवृत्ती वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थिनींना कोणत्याही अडथळ्यांशिवाय त्यांच्या शैक्षणिक आकांक्षा पूर्ण करता याव्यात यासाठी आर्थिक मदत देण्यात आली. हा उपक्रम शिक्षणाला चालना देण्यासाठी आणि तरुणींना उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी सक्षम करण्यासाठी मलाबार समूहाच्या समर्पणाला प्रतिबिंबित करतो.

या कार्यक्रमाला ॲड. गजाननराव पुंडकर, उपाध्यक्ष श्री शिवाजी शैक्षणिक संस्था, अमरावती; प्रो. सुरेश राऊत, सदस्य कॉलेज विकास समिती; श्रीमती सुचिता पाटेकर, माध्यमिक शिक्षण अधिकारी आणि डॉ. रामेश्वर भिसे, प्राचार्य श्री शिवाजी कॉलेज, अकोला यांची उपस्थिती होती. कार्यक्रमातील त्यांच्या सहभागाने महिलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी, समाजात त्यांची भूमिका अधिक बळकट करण्यासाठी आणि त्यांना सन्मानाचे व आदराचे स्थान मिळविण्यात मदत करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांच्या महत्त्वाला अधोरेखित केले गेले.

या उपक्रमाबाबत बोलताना, मलाबार समूहाचे अध्यक्ष एम पी अहमद म्हणाले, शिक्षणाद्वारे तरुण मुलींना सक्षम करणे हा कायमस्वरूपी बदल घडवून आणण्याचा एक सर्वात प्रभावी मार्ग आहे. कारण शिक्षण हे एका समृद्ध राष्ट्राचा आधारस्तंभ आहे. तरुण महिलांना यशस्वी होण्यासाठी साधने आणि ज्ञान प्रदान करून, आम्ही केवळ व्यक्तींमध्येच गुंतवणूक करत नाही तर आपल्या समाजाच्या भविष्यात देखील होणारी ही गुंतवणूक आहे. म्हणूनच या शिष्यवृत्ती केवळ आर्थिक मदत मानल्या जाऊ नयेत तर प्रत्येक मुलीला तिच्या आर्थिक पार्श्वभूमीची पर्वा न करता तिच्या प्रतिभेच्या पूर्ण क्षमतेपर्यंत भरारी घेण्याची संधी मिळावी याची खात्री करणारी वचनबद्धता त्या दर्शविणाऱ्या आहेत.

समूहाच्या सामाजिक दायीत्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत, मलाबार स्कॉलरशिप प्रोग्राम हा एक प्रमुख उपक्रम असून, उपेक्षित समुदायांमधील होतकरूंसाठी शैक्षणिक अंतर भरून काढण्यास तो मदतकारक ठरला आहे. तरुण मुलींसाठी शैक्षणिक संधी वाढवून, मलाबार समूहाचे उद्दिष्ट हे असे दूरगामी परिवर्तन घडवून आणणे आहे, जे व्यक्तींपेक्षा कुटुंबे आणि संपूर्ण समुदायांपर्यंत विस्तारणारा प्रभाव साधेल.

# 'योग फाउंडेशन तर्फे सर्वात भव्य-दिव्य 'महाचडी होमा'चे आयोजन

**मुंबई, २५ मार्च :** २६ आणि २७ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य दिव्य महाशिवरात्री महोत्सवाचे अत्यंत यशस्वी आयोजन केल्यानंतर, आता 'अंतर योग फाउंडेशन', प्रख्यात आध्यात्मिक सद्गुरु, क्रांतिकारी महानायक आणि ज्ञानाचे महासागर आचार्य उपेंद्रजी यांच्या मार्गदर्शनाखाली 'महाचंडी होमा'चे आयोजन २९-३० मार्च २०२५ रोजी, ग्रांडे बॅंक्वेट, नेस्को, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथे करत आहे. २९ आणि ३० मार्च २०२५ या दोन दिवशी सकाळी ८ ते रात्री ८ दरम्यान हे आयोजन होणार आहे.



दोन दिवसांच्या या भव्य दिव्य आयोजनादरम्यान अंतर योग फाउंडेशनचे प्रख्यात अध्यात्मिक सद्गुरू, आचार्य उपेंद्रजी यांनी रचलेल्या, आजतागायत हजारो लोकांना त्वरीत शक्ती, संपत्ती आणि विवेकबुद्धी एकत्रितपणे मिळवून देणाऱ्या 'अंतर योग श्री दुर्गा सप्तशती तंत्रोक्त बीज मंत्र साधना' या ग्रंथाचे लोकार्पण होणार आहे . तसेच विविध क्षेत्रातील १० यशस्वी आणि कर्तृत्ववान महिलांचा, त्यांना देवी दुर्गामातेचे मूर्त रूप समजून अंतर योग फाउंडेशन तर्फे सत्कार केला जाणार आहे. दोन दिवसांच्या या भव्य दिव्य आयोजनादरम्यान सहभागी झालेल्या साधकांना आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणारा, दैवी संरक्षण प्रदान करणारा आणि भौतिक सुख व भरभराट प्राप्त करून देणाऱ्या दुर्मिळ व त्वरित फलंदायी साधनांचा अनुभव मिळणार आहे. या महोत्सवात देशातील अनेक आध्यात्मिक गुरू, राजकीय नेते, उद्योगपती, क्रीडा व चित्रपट क्षेत्रातील दिग्गज आणि हजारो साधक सहभागी होतील. अधिक माहितीसाठी, कृपया संपर्क करा ९१-७७१०९४८४६१.

# बदलत्या ऋतूसाठी आयुर्वेदावर आधारित ७ दिवसांची आहार योजना

## आयुर्वेद तज्ञ डॉ. मधुमिता कृष्णन यांचा लेख



हिवाळ्यानंतर वसंत ऋतू (संधी कला) सुरू होत असताना आयुर्वेद ऋतूमधील बदलामुळे होणाऱ्या असंतुलनाला प्रतिबंध करण्यासाठी संतुलित आहाराचे महत्त्व निदर्शनास आणत आहे. या काळात वात, पित्त आणि कफ हे दोष जाणवतात, ज्यामुळे व्यक्तींना आजार होण्याचा धोका वाढतो. उष्ण, दमट हवामानामुळे वात वाढतो, ज्यामुळे कोरडेपणा, अस्थिरता आणि श्वसनाच्या समस्या उद्भवतात. दरम्यान, तापमानात चढ-उतार झाल्यामुळे पचनशक्ती कमकुवत होते, ज्यामुळे शरीरात टॉक्झिन्स वाढून रोगप्रतिकारशक्ती कमी होते.

या टप्प्यादरम्यान आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी शरीराला पौष्टिक व आरोग्यदायी आहारासह पोषण देणे आवश्यक आहे. आयुर्वेद तज्ञ असल्याने मी दैनंदिन आहारामध्ये घरी बनवलेले तूप, वेजीटेबल सूप्स, हंगामी पालेभाज्या आणि मूठभर बदामांसारख्या प्रथिनांच्या नैसर्गिक स्रोताचा समावेश करण्याची शिफारस करते.

हा हंगाम अनपेक्षित असतो, सकाळी थंडावा असतो, तर दुपारी तापमान खूप उष्ण असते, ज्यामुळे अनेकदा आहार सेवन अनियमित होते. थंडीच्या दिवसात तुम्हाला तेलकट, हेवी फूड्स खाण्याची इच्छा होऊ शकते तर तापमान वाढल्यावर थंड पेये आणि आइस्क्रीम खावेसे वाटते. पण, असंतुलित आहार सेवन केल्याने पचनशक्ती कमकुवत होऊ शकते, ज्यामुळे पोटदुखी, थकवा किंवा हंगामी आजार होऊ शकतात.

७ दिवसांचा सुव्यवस्थित आयुर्वेदिक आहार तुम्हाला हंगामी आजारांपासून दूर ठेवून पौष्टिक, चवदार आहाराचा आस्वाद घेण्यास मदत करू शकतो. खाली साधी पण गुणकारी आहार योजना देण्यात आली आहे. लक्षात ठेवा की प्रत्येकाचे शरीर वेगळे असते, म्हणून तुमच्या वैयक्तिक गरजांनुसार आहाराचे प्रमाण व घटक समायोजित करा.

ऋतू बदलासाठी ७ दिवसांची आयुर्वेदिक आहार योजना

**पहिला दिवस**

ब्रेकफास्ट: दह्यासोबत मेथी थेपला (व्हिटॅमिन बी२ आणि मॅग्नेशियमसह संपन्न, जो ऊर्जा देतो).

दुपारचे जेवण: पालक-पनीर करीसोबत बाजरीची रोटी, ताज्या भाज्यांचे कोशिंबीर आणि मूठभर कॅलिफोर्निया बदाम (रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी नैसर्गिक प्रथिने आणि आरोग्यदायी फॅट्सने युक्त).

रात्रीचे जेवण: तूप, जिरे आणि काळी मिरी घालून शिजवलेली मूग डाळ खिचडी, वाफवलेल्या बीट आणि गाजराच्या भाजीसोबत सर्व्ह केली जाते (रात्रभर स्नायूबळ पूर्ववत होण्यास मदत करते).

**दुसरा दिवस**

ब्रेकफास्ट: भाजलेले बदाम (ऊर्जा व फायबरचा पोषक स्रोत) आणि चिमूटभर आले व दालचिनीसह मसाला ओट्स लापशी.

दुपारचे जेवण: राजमा करीसह जीरा भात, भाजलेल्या पालेभाज्या (रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास आणि भूकेचे शमन करण्यास मदत करतात).

रात्रीचे जेवण: लवंग आणि मिरपूड सारख्या गरम मसाल्यांसह शिजवण्यात आलेली बाजरीची खिचडी, बीटरूट कोशिंबीरसह (पचन आणि आतड्यांच्या आरोग्यास मदत करते) सर्व्ह केली जाते.

**तिसरा दिवस**

ब्रेकफास्ट: गरम बदाम दूध, बदाम (त्वचेसाठी व रोगप्रतिकारशक्तीसाठी प्रथिने आणि व्हिटॅमिन ई देते), आणि अंजीर असलेले होममेड मुसली / तूप घालून गाजर पराठा.

दुपारचे जेवण: चना मसाल्यासह संपूर्ण गव्हाची चपाती, हंगामी भाज्यांची कोशिंबीर आणि मूठभर बदाम (उत्तम पचनासाठी चांगल्या फॅट्सने युक्त).

रात्रीचे जेवण: वाफवलेल्या भातासह गाजर-आल्याचा सूप आणि भाज्यांचे स्टिर-फ्राय (जळजळ कमी करते आणि चयापचयला मदत करते).

**चौथा दिवस**

ब्रेकफास्ट: पुदिन्याच्या चटणीसोबत बेसन पोळा (स्नायूबळ वाढवण्यासाठी वनस्पती-आधारित प्रथिनांचा उत्तम स्रोत).

दुपारचे जेवण: वाफवलेला भात, शेवग्याच्या सांबरासह, भाजलेल्या पालेभाज्या आणि भाजलेले बदाम (दिवसभर ऊर्जेची पातळी राखण्यास मदत करतात).

रात्रीचे जेवण: नारळाचे दूध, काळी मिरी आणि वेलचीसह भाजीपाला स्टू, स्ट्रिंग हॉपर्स किंवा संपूर्ण गव्हाच्या ब्रेडसह सर्व्ह केले जाते. (रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्यासाठी आवश्यक पौष्टिक घटक देते).

**पाचवा दिवस**

ब्रेकफास्ट: काळी मिरी आणि तूप (एकूण उत्तम आरोग्यासाठी रिबोफ्लेविन आणि झिंक असलेले) सह शिजवलेला बाजरीचा उपमा.

दुपारचे जेवण: हिरव्या मूग डाळीच्या कढीसह संपूर्ण गव्हाची चपाती, तळलेले सलगम आणि गाजर व बदाम (पचन आणि आतड्यांच्या आरोग्यास मदत करते).

रात्रीचे जेवण: काळी मिरी, जिरे आणि तूप घालून शिजवलेली मिश्रित डाळ खिचडी, हलक्या मसाल्याच्या बीटरूट कोशिंबीरसह सर्व्ह केली जाते. (स्नायूबळ कायम राखण्यास मदत करते आणि रात्रीची भूक कमी करते).

**सहावा दिवस**

ब्रेकफास्ट: तूप, गूळ, बदाम (अँटीऑक्सिडंट्सने भरलेले शक्तिशाली रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे) आणि वेलची वापरून बनवलेला गरम शिरा / दही आणि बदामांसह मेथी थेपला.

दुपारचे जेवण: मसालेदार शेवग्याच्या रस्सासह बाजरीची रोटी, ताज्या भाज्यांचे कोशिंबीर आणि बदामाच्या पिठाच्या कुकीज (गोड चवीची इच्छा पूर्ण करण्याचा पौष्टिक मार्ग).

रात्रीचे जेवण: तळलेले पालक आणि संपूर्ण गव्हाच्या ब्रेडसह बेसन पोळा (कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यास आणि झोपेचा दर्जा सुधारण्यास मदत करते).

**सातवा दिवस**

ब्रेकफास्ट: हळद आणि काळी मिरी घालून बनवलेले पोहे (भूकेचे शमन करण्यास आणि अनारोग्यकारक स्नॅकचे सेवन टाळण्यास मदत करतात).

दुपारचे जेवण: मेथी चणा भाजीसह गव्हाच्या चपात्या, ताजे सॅलड आणि मूठभर बदाम (हृदयाचे आरोग्य उत्तम ठेवण्यास मदत करते आणि कोलेस्टेरॉलची पातळी कमी करते).

रात्रीचे जेवण: तळलेल्या भाज्या आणि भातासह मसूर सूप, गरम सर्व्ह केले जाते (मज्जासंस्थेला आराम देण्यास आणि चांगली झोप मिळण्यास मदत करण्यासाठी मॅग्नेशियमसह युक्त).

आहाराचे प्रमाण कसे असावे (आयुर्वेद तज्ञांचा सल्ला)

नेहमी वैयक्तिक गरजा व प्राधान्यांनुसार प्रमाण निर्धारित करा.

संतुलित आहारामध्ये सर्व सहा चवींचा (गोड, आंबट, खारट, कडू, तिखट आणि तुरट) समाविष्ट करा.

स्वत:हून कोमट तेलाने (अभ्यंग) नियमित मालिश केल्याने वात संतुलित होण्यास, रक्ताभिसरण सुधारण्यास आणि एकूण आरोग्य उत्तम राखण्यास मदत होऊ शकते.

या सोप्या आयुर्वेदिक आहार योजनेचे पालन करून तुम्ही पचनशक्ती उत्तम ठेवू शकता, रोगप्रतिकारशक्ती मजबूत करू शकता आणि आरोग्यदायी, पौष्टिक आहाराचे सवेन करत ऋतूबदलामुळे होणाऱ्या परिणामांवर नियंत्रण ठेवू शकता.

# सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत विषकन्या आणि तिने राजावर केलेले हल्ले तेनाली परतवून लावू शकेल का?

**मुंबई, २५ मार्च :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत कृष्ण भारद्वाजने साकारलेल्या तेनालीच्या बुद्धीचातुर्याच्या सुरसरम्य कथा बघताना प्रेक्षक गुंग झाले आहेत. आगामी भागांमध्ये, तेनालीने लैलाचे खरे स्वरूप उघडकीस आणण्याचा चंग बांधलेला दिसेल. ती खतरनाक विषकन्या आहे याची जाणीव मात्र त्याला नाही आहे. तेनाली राज्यातून हरवलेल्या शाही मोहरचा शोध घेत असताना विचित्र घटना घडू लागतात- लैलाचे संशयास्पद वागणे, पर्शियन पत्र हरवणे आणि घातक घटनांची मालिका. त्या पत्रातील छुपा अर्थ जेव्हा तेनाली शोधून काढतो, तेव्हा त्याची भीती खरी असल्याचे त्याच्या लक्षात येते. त्याला समजून चुकते की लैला एक प्रशिक्षित मारेकरी आहे आणि राजा कृष्णदेवरायावर (आदित्य रेडिज) विषप्रयोग करण्यासाठी ती आली आहे. राज्यात रंग पंचमीचा उत्सव सुरू होतो आणि इकडे लैलाचे कुटिल कारस्थान उधळून लावण्यासाठी रामाचे प्रयत्न सुरू होतात.

पदोपदी मायावी जाळे पसरलेले असताना तेनाली उशीर होण्याअगोदर राजापर्यंत पोहोचू शकेल का?

तेनाली रामा मालिकेत शीर्षक भूमिका करत असलेला कृष्ण भारद्वाज म्हणतो, तेनाली आपल्या बुद्धीचातुर्याबद्दल ओळखला जातो, पण यावेळी तो लढा देत आहे, त्यात प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे. लैला (पवित्रा पुनिया) ताकदवान आहे त्यामुळे तिच्याशी सुरू असलेला संघर्ष अधिकच रोमांचक होत आहे. रंगपंचमीचे दृश्य करणे आव्हानात्मक होते पण तितकेच आकर्षकही होते. कारण सणासुदीची भव्यता कायम ठेवून आम्हाला आमच्या तीव्र भावना अभिव्यक्त करायच्या होत्या. तो फारच समाधान देणारा अनुभव होता. या खतरनाक परिस्थितीला तोंड देऊन तेनाली कथेतील गूढ कसे उकलतो हे बघायला प्रेक्षकांना नक्की आवडेल.

## आज का अंदाज

बुधवार २६ मार्च २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| १४५ | ४७० | ७८९ | १६० | ५९९ | ३६६ | १५० | १८० |
| ३८९ | ५६० | २३९ | ३५९ | ३०० | ७८० | २६८ | ३७९ |
| २८० | ३८० | ३४७ | ८९० | १२० | ११३ | ७९० | २७० |
| ०२ | १२ | ४३ | ७३ | ३२ | ५२ | ६४ | ९४ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ | ३० | ५० | ६१ | ९७ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ | ३८ | ५८ | ६७ | ९१ |

**२६ मार्च: सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ६८ | ९८ |
| २० | ५० | ६४ | ९४ |
| २३ | ५३ | ६३ | ९७ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** आज बेरोजगार लोकांना रोजगार मिळेल. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. नवीन व्यवसाय सुरू करू शकता. व्यवसायात प्रगतीसह लाभ होईल. व्यवसायात पालकांचे सहकार्य मिळेल.

**वृषभ :** व्यवसायात आज चांगली कमाई होईल. दिलेले पैसे परत केले जातील. उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडतील. सरकारी योजनांमध्ये आर्थिक लाभ होईल. कुटुंबातील काही शुभ कार्यक्रमावर जास्त पैसे खर्च होतील.

**मिथुन :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजयांची भरभराट होईल. आज आर्थिक क्षेत्रात चढउतार होतील. विश्वासू व्यक्तीकडून फसवणूक झाल्यामुळे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते.

**कर्क :** मुलांच्या मदतीने जमीन, इमारत, वाहन इत्यादी खरेदी करण्याची संधी मिळेल. आज तुमचे आरोग्य चांगले राहील. जर तुम्ही कोणत्याही गंभीर आजाराने ग्रस्त असाल तर तुमचे आरोग्य सुधारेल.

**सिंह :** आज दिवसाची सुरुवात खूप व्यस्त असेल. तुम्हाला काही अप्रिय बातम्या मिळू शकतात. कामाच्या ठिकाणी खूप व्यस्तता राहील. कोणत्याही महत्त्वाच्या कामात अडथळे येऊ शकतात.

**कन्या :** तुमच्या घरातून किंवा व्यवसायाच्या ठिकाणाहून काही मौल्यवान वस्तू चोरीला जाण्याची शक्यता आहे. प्रेमप्रकरणात पैसा जास्त खर्च होईल. व्यवसायात उत्पन्न कमी आणि खर्च जास्त होईल.

**तुळ :** आज पैशाची कमतरता तुम्हाला त्रास देत राहील. व्यवसायात खूप धावपळ आणि कठोर परिश्रम करूनही अपेक्षित आर्थिक लाभ न मिळाल्याने तुम्हाला वाईट वाटणार नाही.

**वृश्चिक :** आज, प्रेमाच्या बाबतीत, आपल्या वैयक्तिक इच्छा किंवा भावना इतरांवर लादण्याचा प्रयत्न करू नका आणि आपले अति भोग सोडू नका. वाहन चालविताना काळजी घ्यायलाच हवी.


**धनु :** तुमच्या कामात तुम्हाला तुमच्या बंधू-भगिनींचे शक्य सहकार्य मिळत राहील. धैर्य आणि धैर्य ठेवा. महत्त्वाच्या कामात हुशारीने निर्णय घ्या. घाईघाईने कोणतेही मोठे निर्णय घेऊ नका.

**मकर :** तुम्ही जास्त अंतर्मुख होऊ नका. तुमच्या चांगल्या-वाईट सवयींबद्दल प्रिय व्यक्तीशी बोलून तुमचे मन हलके करा. नाहीतर त्रास होऊ शकतो. तुमच्या आरोग्याशी संबंधित समस्यांवर जास्त पैसे खर्च होतील.

**कुंभ :** कामाच्या ठिकाणी तुमचे चारित्र्य शुद्ध ठेवावे. तुम्ही एखाद्या मोठ्या संकटात सापडू शकता. आर्थिक स्थितीही कमकुवत राहील. तुम्ही घर किंवा व्यवसायाच्या ठिकाणी अनावश्यक पैसे खर्च कराल.

**मीन :** छोट्या प्रवासाचे योग येतील. हुशारीने वागा. राग टाळा. प्रेमसंबंधात जवळीकता येईल. वैवाहिक जीवनात महत्त्वाकांक्षेवर नियंत्रण ठेवा. एकमेकांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करा.

# शब्दकोडे क्रमांक २०६६



**आडवे शब्द :-**

१) अवस
४) ठराव, निश्चय
६) शहर, गाव
८) एक अधिक एक चतुर्थांश
१०) पुरुष
११) निराश
१२) किराणा मालाचा दुकानदार
१३) आई (इं.)
१४) प्रहार
१५) मोटार(इं.)
१६) दिवस
१८) धमनी
१९) जमेची खोटी बाब
२१) अधिक श्रेष्ठ, वरचढ
२३) माल, पैसे मिळाल्याची चिठ्ठी
२५) भिंतीवर सरपटणारा प्राणी
२६) प्रसन्न होऊन दिलेला आशीर्वाद
२८) सुसर
३०) होडी
३१) कावळा
३२) भूपती
३३) प्रेत जाळण्याची चिता
३४) माल साठविण्याची जागा
३५) आकाश
३६) हिस्सा
३८) संपूर्ण
४०) तात्प्रर्यार्थ
४१) नशीब
४२) मार्ग
४३) भारवाहक
४५) कट्टा, ओटा
४८) सैन्याची तुकडी
५०) नवऱ्याचा भाऊ
५१) गयावया करणे
५६) पाळीपाळीने
५९) किंमत
६०) व्यर्थ
६१) धपाटा
६२) वृद्धत्व, थोडे
६३) एक द्विदल धान्य
६५) मालाची विक्री
६७) वर्ष, साल
६८) बैलाच्या मानेवरील जोखड
६९) एक सुगंधी पांढरे फूल
७२) शिकारीचा प्राणी
७३) एक सुगंधी वनस्पती
७५) शरीर
७६) अबोलीची वेणी
७८) नग्न
७९) बोकड
८०) पडसे
८१) हिरा, पाचू इ प्रकार
८२) मोठा नगारा

**उभे शब्द :-**

२) मनुष्य
३) नवरदेव
४) मडके
५) गवंडी
६) होकारच्या विरुद्ध
७) विटी कोलण्याचा खड्डा
८) घर
९) उत्तराधिकारी
११) खोबऱ्याची बर्फी
१२) सतरंजी
१४) नाश, वध
१५) कावळा
१७) महान
१९) नातवाची वा नातीची मुलगी
२०) पाणी
२१) वर्ष, साल
२२) तादाम्य, एकरूप
२४) वरपांगी
२६) हिशेबातील वांधा मिटविणे
२७) खटला
२९) मोजणी करणारा
३१) व्यवस्था, जबाबदारीचे काम
३७) एक श्वासरोग
३९) श्रीरामाचा एक भाऊ
४०) ** बुद्धी नाठी
४४) दडून बसणे
४५) कबूतर
४६) थोर मनाचा, धर्मात्मा
४७) दुसऱ्यांदा
४९) फळाचे साल
५२) ढग
५३) कधीही, केव्हाही
५४) दारूचा एक प्रकार
५५) चरण्याची जागा
५७) मोजकेपणा, मितता
५८) काचेला आरसा बनविणारा घटक
६३) कपि
६४) घट्ट
६५) डोक्यातला फोड .
६७) मनाचा झालेला ग्रह
६९) आम्रवृक्षाची मंजिरी
७०) संताप
७१) विश्रांती
७२) लाकडाचे एक उत्तम जात
७४) गंध
७७) उचलण्यास वजनदार

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# गुंतवणुकदार यांना मोठे-मोठे आमिष दाखवून फसविणाऱ्यांला पुणे येथून अटक

■अकोला : दिनाक १९/२/२०२५ रोजी फिर्यादी सौ. सुरेखा गौतम ओवे, रा. गोकुळ कॉलनी, अकोला यांनी पोलीस स्टेशन खदान येथे फिर्यादी दिली की, आरोपी कं. १ नागेश अरुण वाहुरवाघ, आ.क्र.२ सोनाली नागेश वाहुरवाघ, आ. क्र. ३ गौरव प्रभाकर अंबुसकर, आ.क्र. ४ उमेशकुमार बाबाराव निखाडे यांनी फिर्यादी व इतर गुंतवणुकदार यांचा विश्वास संपादन करुन त्यांचे कंपनी मध्ये रक्कम गुंतविल्यास कमी वेळात दुप्पट रक्कम करुन देण्याचे तसेच महिन्याला ५,१० व १५ टक्के रक्कम परतावा म्हणुन देण्याचे मोठ-मोठे आमिष देवून गुंतवणुकदार यांना ॲडव्हांस अलायन्स कन्सलटन्सी व द स्पाईस हाउस व हॉटेल चस्का मध्ये रक्कम गुंतविण्यास प्रोत्साहीत केले तसेच गुंतवणुकदार यांनी नमूद आरोपींचे कंपनीमध्ये गुंतविलेली रक्कम व त्याचा परतावा मागीतला असतां आरोपी हे गुंतवणुकदार यांना त्यांची गुंतवणुकीची रक्कम व त्यावरील परतावा देण्यास कपटपूर्वक कसुर करून गुंतवणुकदारांची फसवणुक केली अशा फिर्याद वरुन पो स्टे. खदान अप क १५८ / २०२५ कलम ४२०, ३४ भादवी सह कलम ३, ४ एम पी आय डी ॲक्ट १९९९ अन्वये वर नमूद आरोपी यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हयाचे तपासामध्ये आज पावेतो नोंदविलेल्या जबाबातील गुंतवणुकदार यांची एकुण फसवणुकीची रक्कम १,५९,८९,९९९/- रुपये इतकी आहे.नमूद आरोपी यांचे विरुध्द गुन्हा दाखल झाला तेंव्हा पासुन आरोपी फरार होते. नमूद गुन्हयाचे तपासामध्ये फरार आरोपीचा शोध घेत असतांना मिळालेल्या गुप्त माहीती वरुन आरोपी गौरव प्रभाकर अंबुसकर याचा पुणे येथे शोध घेतला असतां आरोपी हा त्याचा भाऊ सौरभ प्रभाकर अंबुसकर यांचे राहते फ्लॅट व्हिटीपी पुर्वांचल, सि विंग, फ्लॅट नं. १२०९, केसानंद फाटा जवळ, वाघोली, पुणे येथून दिनांक २५/३/२०२५ रात्री दरम्याण ताब्यात घेण्यात आले.

# जेष्ठ नागरीक निराधारांना अकोला पोलीस देत आहे आधाराची साथ

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी): अकोला पोलीस दलाअंतर्गत समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे कार्य सातत्याने चालु असते. समाजातील एक महत्वाचा घटक म्हणजे वयोवृध्द 'जेष्ठ नागरीक' होय. जेष्ठ नागरीकांचे अडचणी, कुटुंबाकडुन होणारा अत्याचार हयाची दखल घेण्यासाठी अकोला पोलीसांनी मोलाची पाऊले उचलली आहेत. मागील सन १ जाने २०२४ ते आजपावेतो २०२५ मध्ये ३२२जेष्ठ नागरीकांसोबत संपर्क करण्यात आला आहे.

जेष्ठ नागरीकांवर होणा-या किरकोळ तसेच गंभीर गुन्हयांची दखल अकोला पोलीस दल गांभीर्याने घेत असते. जेष्ठ नागरीकांकरीता तात्काळ मदत म्हणुन डायल ११२ तसेच १०९१ सारख्या हेल्पलाईन ची सुविधा करण्यात आली. सदर अत्याचारग्रस्त जेष्ठ नागरीकास घटनास्थळी पोलीस सेवा पुरविण्याचे कार्य केले जाते.



डायल ११२ वर १ जाने ते आजपावेतो १६६१ कॉल ची नोंदणी झालेली आहे. 'डायल ११२ वर आलेली तक्रार ला आजपावेतो ची तात्काळ प्रतिसाद ' वेळ ५ मिनिट ५७ सेकंद नोंदविली आहे.

पोलीस स्टेशन खदान हददीतील ६७ वर्षीय महिला यांचा डायल ११२ वर दिनांक. २५/२/२०२५ रोजी रात्री २३.२९ वाजता कॉल आला की, त्या वृध्द महिलेला त्यांचा भाऊ चाकू घेवुन मारण्यास आला. सदर घटनेची गांभीर्याने दखल घेत खदान पोलीस स्टेशन नी अवघ्या ६ मिनिट ४९ सेकंद मध्ये घटनास्थळी धाव घेतली व सदर युवकास पोलीसांनी ताब्यात घेवुन त्याचेवर कायदेशिर कारवाई केली व होणारा गंभीर गुन्हा टाळल्या गेला.

पोस्टे सिव्हिल लाईन हददीतील महिला वय ६० वर्ष दुरध्वनी क्रमांक. ९३०७४१६२४७ वरून रात्री १/५९ वाजता कॉल आला सदर महिलेला स्वताच्या घरातील लोक बांधुन ठेवुन मारहान करत होते. सदर घटनास्थळी सिव्हील लाईन पोलीस स्टेशन नी ८ मिनिटे १० सेकंद मध्ये पोलीस मदत पुरविण्यात आली कर्तव्यावर असणारे पोलीस अंमलदार यांनी घटनास्थळी जावुन सदर महिलेला मदत केली.

शहर विभागातच नाही तर ग्रामीण भागात सुध्दा सदर कार्य सातत्याने व तातडीने चालु असल्याचे प्रकर्षाने लक्षात येते. दिनांक. ११/३/२०२४ रोजी रात्री ११/२८वाजता पोलीस स्टेशन बार्शिटाकळी हददीतील ग्राम पुणोती येथील जेष्ठ नागरीकास त्यांचा मुलगा दारू पिवुन मारहान करत आहे तसेच घरातील सामान फेकत असल्याची माहिती डायल ११२ वर मिळाल्याने अवघ्या ७ मिनिट ५० सेकंद मध्ये पोलीसांनी घटनास्थळी धावा घेवुन सदर घटनेतील दारू पिलेल्या व्यक्तीला भांडण करण्यापासून परावृत्त केले - मारहणन करण्यास पोलीसांनी ताब्यात घेवुन त्याचे कायदेशीर कारवाई केली. अशा अनेक अनुचित घटना टाळण्याचे कार्य अकोला पोलीस करीत आहेत.

एल्डरलाईन १४५६७ हया नॅशनल हेल्पलाईन बाबत माहिती देवुन सदर हेल्पलाईन ही जेष्ठ नागरिक यांचे प्रश्नांचे निराकरण करून त्यांना वृध्दाश्रम सेवा पुरविणे, बेघर आणि अत्याचारग्रस्त जेष्ठांची मदत करणे, कायदेशिर आणि पेन्शन संबंधित समस्या निराकरण करणे, तसेच जेष्ठ नागरिक संघामार्फत एकटे राहणारे जेष्ठ नागरिकांच्या घरी भेटी देवुन त्यांच्या अडीअडचणी विचारून त्यांचे निराकरण केले जाते.

# खा.अनुप धोत्रे नी केला मोदीजींचा परीवारीक सत्कार

## मतदार संघासोबतच केली मोदीजीनी परीवारीक चर्चा

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी): जागतिक नेते देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अकोला लोकसभा मतदारसंघातील खासदार अनुप धोत्रे यांना आशीर्वाद देऊन राजकीय सामाजिक पारिवारिक विषयावर चर्चा करून आगे बढो आशीर्वाद दिले.



जागतिक नेते तसेच देशाची यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज खासदार अनुप धोत्रे यांनी अकोला लोकसभा मतदार संघाच्या वतीने समस्त मतदारांच्या वतीने सबका साथ सबका विकास सबका प्रयासाने देशाला सुजलाम सुफ्फलाम करणारे सांस्कृतिक वारसा जतन करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आभार व अभिनंदन अकोला लोकसभा मतदारसंघातील १७ लाख मतदारांच्या वतीने आज त्यांचा सत्कार करून आशीर्वाद घेतले यावेळी त्यांच्यासोबत त्यांच्या अर्धांगिनी सौभाग्यवती समीक्षाताई धोत्रे, कुमारी यशिका, रणविजय, राजनंदनी यांनी सुद्धा पंतप्रधानांची आशीर्वाद घेतले यावेळी पंतप्रधानांनी माजी केंद्रीय मंत्री संजय भाऊ धोत्रे यांच्या प्रकृतीची विचारपूस केली अकोला लोकसभा मतदारसंघातील शेतकरी तसेच या मतदारसंघातील विशेषतेबद्दल अडी अडचणी बद्दल माहिती घेतली.

# आरोपींनी फिर्यादी महिलेचा मानसिक छळ केल्याप्रकरणी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

■पातुर,दि २५ (प्रतिनिधी): पोलीस स्टेशन पातूर अंतर्गत ग्राम कोठारी बु. अप नंबर ८५/२५ कलम ८५,३५२,३५२(२) इछड प्रमाणे फिर्यादी सौ साक्षी विशाल ठोंबरे वय २१ वर्ष राहणार कोठारी बुदुक तालुका पातुर यांचे तक्रारीवरून आरोपी १. विशाल हरिदास ठोंबरे वय २२ वर्ष २. हरिदास काशीराम ठोंबरे वय ४५ वर्ष ३. सौ सुनीता हरिदास ठोंबरे वय ४० वर्ष सर्व राहणार कोठारी बुदुक तालुका पातुर यांनी दि .१/७/२०२४ चे दुपारी ७ वाजता दरम्यान आरोपींनी फिर्यादीस माहेर वरून प्लॉट साठी व मोटरसायकल घेण्यासाठी पैसे आणण्याचे कारना वरून शिवीगाळ व लाथा बुककयांनी मारहाण करीत मानसिक छळ केल्याप्रकरणी आरोपी विरुद्ध२४/०३/२०२५ रोजी पातूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पातुर पोलीस स्टेशन अंतर्गत दिवसेंदिवस महिलांचे मानसिक छळ करण्याच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.हकिकत अशा प्रकारे की नमूद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे पती विशाल हरिदास ठोंबरे सासरे हरिदास काशीराम ठोंबरे सासू सौ सुनीता हरिदास ठोंबरे यांनी गावात प्लॉट घेण्यासाठी व मोटारसायकल घेण्यासाठी माहेरहून पैसे आणण्याचे कारणे करून फिर्यादी हीच शिवीगाड लाथा बुक्यांनी मारहाण करून जर तू पैसे आणले नाही तर तुला आणखी मारणार अशी धमकी दिली व फिफ्रर्यादीचा शारीरिक व मानसिक छळ केला अशा फिफ्रर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस निरीक्षक हनुमंत डोपेवाड यांचे मार्गदर्शनात पोलीस हेड कॉन्स्टेबल संबोधी इंगळे करीत आहेत.

# थकित करापोटी पुर्व आणि दक्षिण झोन येथील आठ मालमत्तांवर सीलची कारवाई

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी): मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त गीता ठाकरे आणि सहा.आयुक्त तथा कर अधिक्षक विजय पारतवार यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील दक्षिण झोन अंतर्गत न्यु राधकिसन प्लॉट येथील वार्ड क्रं. डी - १ मालमत्ता क्रं. ८९१ धा.शर्मा यांचेकडे सन २०१७-१८ ते २०२४-२५ पर्यतचे एकुण रक्कम रूपये १,१६,७४१/- मालमत्ता कर थकित असल्याने, तसेच लक्झरी बस ओनर्स असोसिएशन रा.अनिकट वार्ड क्रं. डी - १ मालमत्ता क्रं. २६३४ तर्फे रविंद्र घनबहादुर यांचे कडे सन २०१७-१८ ते २०२४-२५ पर्यतचे एकुण रक्कम रूपये १,१३,३१४/- मालमत्ता कर थकित असल्याने, तसेच मित्र





नगर येथील वार्ड क्रं. डी - ५ मालमत्ता क्रं. १८५३ धा.जयप्रकाश मोटवानी यांचेकडे सन २०१४-१५ ते २०२४-२५ पर्यतचे एकुण रक्कम रूपये १,६१,९५५/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने तीन्ही मालमत्तांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाई सहा.आयुक्त दविदास निकाळजे यांच्या मार्गदर्शनात आणि उपस्थितीत झाली असून या कारवाईत सहा.कर अधिक्षक प्रशांत बोळे, गोपाल लोखंडे, रवि सोनोने, गिरीष काललकर, संजय धांडे आदींची उपस्थिती होती. याचसोबत पुर्व झोन अंतर्गत टॉवर चौक येथील पाडीया कॉम्प्लेक्स मधील वार्ड क्रं. अे - १ मालमत्ता क्रं. १९१९ धा.आशा पाडीया यांचेकडे एकुण रक्कम रूपये ३,३७,३३६/- मालमत्ता कर थकित असल्याने, तसेच वार्ड क्रं. अे - १ मालमत्ता क्रं. १९२० धा.आशा पाडीया यांचेकडे एकुण रक्कम रूपये ७७,७३९/- मालमत्ता कर थकित असल्याने, तसेच वार्ड क्रं. अे - १ मालमत्ता क्रं. १९३३ धा.श्रीनिवास पाडीया यांचेकडे एकुण रक्कम रूपये १,२४,१७६/- मालमत्ता कर थकित असल्याने, तसेच वार्ड क्रं. अे - १ मालमत्ता क्रं. १९५४ धा.अरुणकुमार अग्रवाल यांचेकडे एकुण रक्कम रूपये ७,५८,४६९/- मालमत्ता कर थकित असल्याने, तसेच वार्ड क्रं. अे - १ मालमत्ता क्रं. १९५८ धा.लता पाडीया यांचेकडे एकुण रक्कम रूपये ९,८३,९८७/- मालमत्ता कर थकित असल्याने पाचही मालमत्तांवर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे.

# सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या विश्वस्तांना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी): मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देशानुसार शासकीय कार्यालयासाठी १०० दिवसांच्या कृती आराखडा निश्चित केला आहे. या अंतर्गत मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी जिल्हास्तरीय, विभागस्तरीय कार्यालयांना विश्वस्त कार्यशाळा घेण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार मा. धर्मादाय सह आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला व चॅरिटी बार असोसिएशन, अकोला यांचे संयुक्त विद्यमाने दि.२७/०३/२०२५ (गुरुवार) रोजी सकाळी ठिक १०:३० ते दुपारी १:३० पर्यत आर. एल.टी. सायन्स कॉलेज, सिव्हील लाईन, अकोला येथे सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या विश्वस्तांना मार्गदर्शन करणेकरीता विश्वस्त परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

विश्वस्त परिषदेमध्ये न्यासाचे लेखापरिक्षण व हिशोबपत्रके सादर करणे, बदल अर्ज सादर करण्याची प्रक्रिया, अधिनियमाचे कलम ४१-अ व कलम ५०-अ मधील तरतुदी याबाबत न्यासांच्या विश्वस्तांनी धर्मादाय संघटेतील अधिकारी, जेष्ठ विधीज्ञ व सनदी लेखापाल मार्गदर्शन करणार आहेत.

अकोला जिल्ह्यातील सर्व विश्वस्तांनी विश्वस्त परिषदेमध्ये उपस्थित राहून तज्ञांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री. स.ना. भावसार, धर्मादाय उप आयुक्त, अकोला व श्री. नितीन धुत, अध्यक्ष, चॅरिटी बार असोसिएशन, अकोला यांनी केले आहे.

# आगीच्या घटनेमुळे पीडित कुटुंबांना आर्थिक मदत करा : कशीश खान

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी): दि २१ मार्च रोजी, सकाळी ११:३० वा. , अकोला शहरातील भारत नगर, अकोटफैल येथे नुकत्याच घडलेल्या शॉर्ट सर्किट मुळे लागलेल्या भीषण आगीत इफ्तेखार अहमद खान, शेख हसन, आणि वसीम शाह यांच्या घरे पूर्णतः जळून खाक झाली. या दुर्घटनेमुळे हे तीन कुटुंबे रमजान महिन्यात बेघर व निराधार झाली आहेत.परंतु, या घटनेला काही दिवस उलटूनही प्रशासनाचा कोणताही अधिकारी अद्याप या पीडित कुटुंबांची भेट घेण्यासाठी गेलेला नाही. या पार्श्वभूमीवर, शहर महिला काँग्रेसच्या उपाध्यक्षा तथा सलमान खान फाउंडेशनच्या संचालिका काशिश खान यांनी या पीडित कुटुंबांना भेट देऊन त्यांच्या व्यथा ऐकल्या.या निवेदनाद्वारे आम्ही मा. जिल्हाधिकारी व मा. पालकमंत्री महोदयांना विनंती करतो की, या पीडित कुटुंबांना त्वरित आर्थिक मदत व पुनर्वसनाची सोय करून द्यावी, जेणेकरून त्यांचे जीवन पूर्ववत होऊ शकेल.



# तळेगावचे माजी सरपंच बापुराव त्र्यंबकराव खारोडे यांचे निधन

तेल्हारा : तेल्हारा तालुक्यातील सहकार क्षेत्रातील गणमान्य नेते तथा तळेगाव बु चे माजी सरपंच बापुराव त्र्यंबकराव खारोडे यांचे दिनांक २४ मार्च रोजी वयाच्या ६६ व्या वर्षी दिर्घ आजाराने निधन झाले त्याच्या मागे पत्नी, ३ मुले सुना नातवंडे असा आप्त परिवार आहे स्व बापुराव त्र्यंबकराव खारोडे यांचा सहकार क्षेत्रात मोठा दबदबा होता तळेगाव बु च्या सरपंच पदाची धुरा त्यांनी तब्बल १० वर्ष सांभाळुन गावाच्या विकासासाठी भरीव असे कार्य त्यांनी केले.



स्थानिक सोमेश्वर संस्थानचे ते सदस्य राहिले सामाजिक, धार्मिक क्षेत्रातही त्याचे मोठे योगदान राहिले खरेदी विक्री संस्था तेल्हारा चे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले स्थानिक स्वराज्य संस्थेत ही त्यांनी काम केले व्यापार क्षेत्रातही त्यांनी काम केले आहे त्याच्यावर आज दिनांक २४ मार्च रोजी दुपारी त्याच्या गावी तळेगाव बु येथे त्याच्या मळ्यात त्याच्यावर अंतीम संस्कार पार पडला यावेळी त्यांच्या अंतयात्रेत तेल्हारा तालुक्यातील सहकार क्षेत्रातील गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी मान्यवरांनी त्यांना श्रध्दांजली वाहीली तेल्हारा तालुका खरेदी विक्री संस्थेचे संचालीका रत्नप्रभाबाई गुणवंतराव खारोडे यांचे ते जेठ होते.

# लायन्स क्लबच्या भव्य मोफत हृदयरोग उपचार शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




## २५० पेक्षा जास्त रुग्णांची झाली तपासणी

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी): लायन्स क्लब अकोला,लायन्स क्लब अकोला मिडटाऊन गोल्ड व ओझोन हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने स्थानीय ओझोन हॉस्पिटल येथे संपन्न मोफत हृदयरोग तपासणी व उपचार शिबिरास रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

केडीया प्लॉट परीसरातील ओझोन हॉस्पिटल येथे दिनांक २३ मार्च रोजी आयोजित या शिबिराचा प्रारंभ डिस्ट्रिक्ट ३२३४एच २ चे प्रांतपाल गिरीश सिसोदिया, ओझोन हॉस्पिटलचे संचालक डॉ विनीत हिंगणकर, संचालक डॉ निलेश कोरडे, उपप्रांतपाल-१अश्विन बाजोरिया, माजी प्रांतपाल रमाकांत खेतान, डिस्ट्रिक्ट जीएमटी कोऑर्डिनेटर व प्रकल्प प्रमुख मुरलीधर उपाध्याय, डिस्टिक पीआरओ महेंद्र खेतान, झोन चेअरपर्सन व मारवाडी महिला संमेलनाच्या अध्यक्षा अनिता उपाध्याय,डीसी सर्विस विक कोओर्डिनेटर मुकेश शर्मा,लायन्स क्लब गोल्डचे अध्यक्ष मनोजसिंह बिसेन, लायन्स क्लब अकोलाचे अध्यक्ष डॉ मंदार सावजी,डीसी डॉ आशिष डेहनकर, प्रकल्प प्रमुख पराग शाह, विवेक गावंडे, सचिन महाजन, धीरज गावंडे,दर्शन शाह, पियुश संघवी, विशाल शाह आर्दीच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी मुंबईचे हृदयरोग तज्ञ डॉ कनक नागले, येथील डॉ दीपक बोहरा उपस्थित होते.

## अनोळखी युवकाचा रेल्वेतून पडून मृत्यू

बोरगाव मंजू : पोलिस स्टेशन हद्दीतील काटेपुर्णा नजीक लोहमार्गावर धावत्या रेल्वेतून पडून एका २० वर्षिय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना बुधवार दिनांक २० मार्च रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली, बोरगाव मंजू पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून अनोळखी युवकाची ओळख पटविण्याचे आवाहन केले

# गायत्री नगरच्या कीर्तन महोत्सवाचे भक्तिभावात समापन

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी): श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बिजोत्सव सेवा समिती, गायत्री नगर, कौलखेडच्या वतीने गायत्री नगरच्या प्रांगणात हभप प्रशांत महाराज ताकोते यांच्या मार्गदर्शनात आयोजित किर्तन महोत्सवाचे सोमवारी मोठ्या भक्तिभावात समापन झाले.या सांगता सोहळ्यात इलोरा येथील हभप तुकाराम महाराज साखरामपूरकर यांनी काल्याचे किर्तन करून कीर्तनाची महिमा आपल्या कीर्तनातून प्रतिपादित केली.सकल जगाच्या कल्याणासाठी सत्संग आवश्यक असून आजच्या युवा पिढीने सत्संगाची कास धरून आपल्या जीवनाचा उद्धार करण्याचे आवाहन केले.



या किर्तन उत्सवात हभप सचिन महाराज पवार देहू,हभप शिवाजी महाराज मानकर आळंदी, हभप नाना महाराज कदम नेकतूर,हभप पांडुरंग महाराज घुले देहू, हभप कृष्णा महाराज चवरे पंढरपूर, हभप अशोक महाराज इलक शास्त्री शेवगाव,हभप अनिल महाराज पाटील बार्शी, तथा वारी भैरवगडचे हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी कीर्तन करीत वारकरी संप्रदायाची महती सांगून वातावरण भक्तीमय केले. या महोत्सवात जिल्ह्यातील अनेक मान्यवरांनी भेटी देत या महोत्सवाचे कौतुक केले.

या कीर्तन उत्सवाच्या सामूहिक गाथा पारायण कार्यक्रमात हभप शोभाताई पवार यांनी सहभाग घेतला, तर मृदुंगाचार्य म्हणून हभप विठ्ठल महाराज कावळे आळंदी, हभप अमोल महाराज पेलमहाले आळंदी, हभप ज्ञानेश्वर महाराज यादगिरे अकोला तर गायनाचार्य म्हणून हभप गोरक्षनाथ गतिर आळंदी, हभप विठ्ठल महाराज भेंडे आळंदी, हभप किशोर महाराज लढे अकोला,हभप दिलीप महाराज काळबागे अकोला व संत ज्ञानेश्वर महाराज हरिपाठ मंडळ देगाव गायत्री नगर, कौलखेड,खडकी, उमरीच्या मंडळांनी सेवा दिली. या उत्सवात गायत्री शक्तीपीठ गायत्री नगर, संत आदिशक्ती मुक्ताई मंडळ कौलखेड, विठ्ठल परिवार अकोला,गुरुदेव सेवा मंडळ अकोला, संत निवृत्तीनाथ महाराज सेवा समिती खडकी,तीन मंदिर महिला हरिपाठ मंडळ गायत्री नगर, महिला भजनी मंडळ गायत्री नगर, शिवमहिम महिला मंडळ गायत्री नगर, बंजारा नगर जेष्ठ नागरिक तथा युवा मित्र मंडळ,ज्येष्ठ नागरिक हरिपाठ मंडळ ,गजानन महाराज मंदिर प्रगट दिन उत्सव मित्र मंडळ, गायत्री नवयुवक नवदुर्गा उत्सव मंडळ, गजानन गणेश उत्सव मित्र मंडळ हिंगणा आदी सेवा संस्थांनी यात सहकार्य केले.

# हिंदू मुस्लिम एकतेचा संदेश देणारी शिव महापुराण कथा

## मुस्लिम धर्मियांकडून रामाचार्य यांचा सन्मान

■अकोट,दि २५ (प्रतिनिधी): श्री संत चतुर्भुज महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत एकनाथ षष्ठी निमित्त श्री शिव महापुराण कथेचे आयोजन केले होते. २० रोजी आरंभ तर सांगता २७ रोजी होणार आहे.

काकडा, हरिपाठ, हरी किर्तन असा क्रम आहे. शिव महापुराण कथेचे प्रवक्ता ज्ञानेश्वर महाराज गई शेगाव होते. अन्सार अली अफ्फसर अली यांनी भागवत श्रोत्यांना अन्नदान केले. कीर्तनकारांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. शिव महापुराण कथेत मुस्लिम बांधवांनी हिंदू मुस्लिम एकतेचा संदेश दिला. २० ला कीर्तनकार दत्ता महाराज अहिर (आसलगाव), २१ ला भागवताचार्य गजानन गायकवाड, शनिवारी रामायणाचार्य ज्ञानेश्वर महाराज पातोंड (वरूड जवळका), २३ रोजी भागवताचार्य माणिक भगत (कोकलवाडी), २४ ला भागवताचार्य केशव मोरे (म्हैसपूर), २५ ला रामायणाचार्य धीरज चांदुरकर (अंतरगाव), २६ ला भागवताचार्य अविनाश कडू (परतवाडा), मृदुंगाचार्य पंजाब अंभोरे, नंदकिशोर हाडोळ, महादेव काळे,गायनाचार्य बाळकृष्ण पिंपळे, गणेश चांदूरकर, प्रफ्फुलु रोंगे, गोपाल अढाऊ, विणेकरी सुधाकर देठे गजानन काळे होते. कार्यक्रमाला पुरुषोत्तम महाराज मुरेकार, रमेश पळसकार, जगन्नाथ हाडोळे, बापूराव काळे, ज्ञानेश्वर भुस्कट, पुरुषोत्तम मुरेकार, सोपान डवाले, अर्जुन बोरोडे, श्रीकृष्ण मुळे, टाळकरी विनोद टोहरे, रवींद्र हाडोळे, विठ्ठल भांडे, सुदर्शन रायबोले, कृष्णा लोखंडे, बंडू हुसे, मंगेश अंभोरे, गजानन महाराज महिला व पुरुष भजनी मंडळ, संत चतुर्भुज महिला व पुरुष भजनी मंडळ, संत सावता माळी महिला व पुरुष भजनी मंडळ व श्री सिद्धेश्वर महाराज भजनी मंडळ या मंडळांचा भव्य गाव प्रदर्शना मिरवणुकीमध्ये सहभाग राहील. २७ रोजी ज्ञानेश्वर महाराज गई शेगाव यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होईल. पंढरीनाथ संस्थान तर्फे महाप्रसादाचे भाविक भक्तांना तसेच गावकरी मंडळींना महाप्रसादाचे आयोजन केलेआहे.

महानिर्मिती
ई-निविदा सुचना-५५/२०२४-२५
१) एम आय एस ई.नि ३१२ कोड ३००००५६१२४ : औ.वि.के. पारस येथील संच ३ व ४ बॉयलर आणि बॉयलरहाउस परिसर, ओ.एच.पी., वर्कशॉपचे, हाउसकिपींग, सपाट नाल्यांचे साफसफाई, फिडर फ्लोअर कडिल कोळसा, बॉटम ॲश काढणे, उचलणे व वाहून नेणे कामाचा द्विवार्षिक कंत्राट. (Esti.: रू. ३१८.०१ लाख, EMD: रू. ३२१५१४/-
(१) ई निविदा अ.क्र. १ विक्रिचा कालावधी दि. २६.०३.२०२५ ते १५.०४.२०२५ सादर करण्याची दि. १६.०४.२०२५ वेळ: १६:०० वा.
टीप- सविस्तर माहिती करीता कृपया आमची वेबसाईट पहावी https://eprocurement.mahagenco.in
मुख्य अभियंता
औ.वि. केंद्र, पारस

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम खोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# निरामय

## मद्यपानापासून दूर रहा...

आरोग्य विशेष

डॉ. शरद दुबे

अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस म्हणजेच ऑस्टिओ नेक्रोसिस. यामध्ये कंबर आणि मांडी यांच्यामधील सांध्याला योग्य त्या प्रमाणात रक्तपुरवठा पोहोचत नसल्याने हाडांच्या ऊती मृत पावतात. अति मद्यपानाच्या सवयींमुळे ६० टक्के तरुणांना उतारवयात अव्हॅस्कुलर नेक्रोसिस म्हणजेच एव्हीएन चा धोका असतो. म्हणजेच मद्यपान ५० वर्षे आणि त्यावरील वयाच्या प्रौढांमध्ये अव्हॅस्कुलर नेक्रोसिसचे प्रमुख कारण ठरत असून अशा रुग्णांना प्रत्यारोपणाची आवश्यकता भासते.



अधिक प्रमाणात मद्यपान केल्याने रक्तवाहिन्यांमध्ये चरबीयुक्त पदार्थ जमा होऊ शकतात. ते हाडांमधील रक्त प्रवाह अडवतात, परिणामी अव्हॅस्कुलर नेक्रोसिस होतो. अति मद्यपान करणाऱ्या ५० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सुमारे १० पैकी ५ व्यक्तींमध्ये अव्हॅस्कुलर नेक्रोसिसची समस्या आढळून येते. अशा रुग्णांना 'हिप रिप्लेसमेंट' शस्त्रक्रियेची आवश्यकता भासते. ताज्या आकडेवारीनुसार प्रौढांमध्ये 'एव्हीएन'च्या प्रकरणांमध्ये १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे २५ ते ३५ वयोगटातील ६० टक्के तरुणांना अति मद्यपानामुळे वयाच्या पन्नाशीतच अव्हॅस्कुलर नेक्रोसिस होण्याची शक्यता वाढते.

**रक्तपुरवठ्याअभावी मरतात हाडांच्या ऊती**

अव्हॅस्कुलर नेक्रोसिस ही अशी स्थिती आहे, जिथे रक्तपुरवठ्याअभावी हाडांच्या ऊती मरतात. त्यामुळे सांधेदुखी आणि हाडे ठिसूळ होतात, तुटतात. एखादी व्यक्ती साधारणपणे आठ ते १० वर्षे सलग अल्कोहोलचे सेवन करत असल्यास आठवड्यातून ४०० मिलीलीटर किंवा त्याहून अधिक मद्य आपल्या शरीरात ढकलतो.


**चरबी वाढते**

मद्यपानामुळे सीरम ट्रायग्लिसराइड आणि कोलेस्टेरॉलची पातळी तसेच अस्थिमज्जामध्ये चरबी जमा होण्याचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढू शकते. अर्थात अव्हॅस्कुलर नेक्रोसिसचा धोका इतर घटकांवरदेखील अवलंबून असतो. जसे की, तंबाखूचा वापर, जुनाट आजार आणि अनुवांशिकता हीदेखील त्याचमागील कारणे असू शकतात. या आजाराची लक्षणे म्हणजे कंबरदुखी, स्नायूंमधील कडकपणा आणि स्नायुंच्या हालचालींवर येणाऱ्या मर्यादा ही आहेत. या रुग्णप्रमाणेच, नितंबाचे हाड मोडलेल्या रुग्णांवर टोटल हिप रिप्लेसमेंटने उपचार केले जातात. वेळीच उपचार न केल्यास अव्हॅस्कुलर नेक्रोसिसमुळे सांध्यांचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होऊ शकते. त्यामुळे 'हिप रिप्लेसमेंट' प्रक्रियेची आवश्यकता लक्षात घेणे गरजेचे ठरते.

## कानाचे दुखणे असू शकते ब्रेन ट्युमरचे लक्षण

आरोग्यभान

डॉ. रवींद्र सोमाणी



कानाच्या दुखण्याला संसर्ग समजून दुर्लक्ष करण्याची चूक कधीही करू नका कारण हे ब्रेन ट्यूमरचे लक्षण असू शकते. अलीकडेच एका १९ वर्षांच्या तरुणासोबतही असेच घडले. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये संबंधित तरुणाला चक्कर आली आणि दिसण्यात तसेच बोलण्यात काही समस्या निर्माण झाल्या. डॉक्टरांकडे गेल्यावर कानात संसर्ग झाल्याची शक्यता नाकारता येत नाही, असे त्याला सांगण्यात आले; पण चार महिन्यांनंतर त्याला ग्लिओब्लास्टोमा ब्रेन ट्युमर असल्याचे उघड झाले तेव्हा सगळ्यांनाच धक्का बसला.

**सर्वात धोकादायक कर्करोग**

कुटुंबीयांनी सांगितले, की डॉक्टरांनी प्रथम या आजाराचे ग्रंथींच्या तापाचा दुष्परिणाम म्हणून वर्णन केले आणि कानाच्या संसर्गासाठी औषध दिले. पण काही दिवसांमध्ये मुलाची प्रकृती अधिक बिघडू लागल्यामुळे त्याला दुसऱ्या डॉक्टरांकडे नेण्यात आले. तेथे दोन आठवड्यांच्या उपचारानंतर सीटी स्कॅन करण्यात आले. या तपासणीत त्याला 'ब्रेन स्टेम ग्लिओब्लास्टोमा' हा सर्वात धोकादायक कर्करोग असल्याचे आढळून आले.

**उपचार कसे होते?**

'ब्रेन स्टेम ग्लिओब्लास्टोमा'वर उपचार करणे अजिबात सोपे नाही. या मुलावर सहा आठवडे रेडिओथेरपी केली. २०२४ च्या डिसेंबर महिन्यातील ख्रिसमस सणाच्या एक दिवस आधी त्याच्यावरील उपचार संपले; परंतु नंतरही दुष्परिणाम दिसतच होते. पुढे तर त्याला काहीही गिळता येत नव्हते. बेडवरून उठताही येत नव्हते. चार जानेवारीला श्वासोच्छवास अचानक थांबला आणि तो कोमात गेला. २४ तासांनंतर त्याला शुद्ध आली. उपचार सुरु होतेच. पाच आठवड्यांनंतर घरी परतला आणि २५ फेब्रुवारीला त्याचा मृत्यू झाला.

**'ग्लिओब्लास्टोमा ट्यूमर' म्हणजे काय ?**

ग्लिओब्लास्टोमा ट्यूमर' हा ब्रेन ट्यूमरचा एक प्रकार आहे, जो 'ग्लिअल' पेशींपासून उद्भवतो. ही गाठ मेंदूच्या आतील भागात वाढते आणि त्याचा मेंदूच्या सामान्य कार्यावरही परिणाम होऊ शकतो. हा जगातील सर्वात धोकादायक कर्करोगांपैकी एक आहे.

**'ग्लिओब्लास्टोमा ट्यूमर'ची लक्षणे**

* डोकेदुखी
* कान दुखणे
* उलट्या
* अशक्तपणा
* स्मरणशक्ती कमी होणे

**ग्लिओब्लास्टोमा ट्यूमरची कारणे**

* अनुवांशिक उत्परिवर्तन
* रेडिएशनचा संपर्क
* विशिष्ट रसायनांच्या संपर्कामुळे मेंदूला झालेली दुखापत

## खांदेदुखी टाळा, निरोगी राहा

सांधेविकार



खांद्याच्या दुखण्यामागे बरीच कारणं असू शकतात. दुखापत, सातत्याने होणारी हालचाल, वजनदार वस्तू उचलणं, अपघात, खेळणं किंवा वाढतं वय या कारणांमुळे खांद्यांचं दुखणं उद्भवू शकतं. खांद्याच्या दुखण्यामुळे हातांच्या हालचालींवरही मर्यादा येतात. खांद्यामध्ये तीन महत्त्वाची हाडं असतात. ही हाडं खांद्यांच्या सांध्यांशी जोडलेली असतात. खांद्याच्या कोणत्याही भागात या वेदना जाणवू शकतात.

व्यायामाने या वेदनांवर नियंत्रण मिळवता येतं. इतकंच नाही तर, या व्यायामाचे दीर्घकालीन लाभही आहेत. व्यायामामुळे स्नायू लवचिक व्हायला मदत होते. खांदे मागून पुढे फिरवणं, बालासन, खांद्यांचे स्नायू ताणणं, डंबेल्स उचलणं अशा व्यायामांमुळे लाभ होऊ शकतात. हे सर्व व्यायाम अगदी सोप्या पद्धतीने करता येतात. शिवाय ते तुम्ही कुठेही करू शकता. हे व्यायाम नियमित केल्यामुळे वेदना बऱ्याच प्रमाणात कमीह होऊ शकतात.

खांदा बराच काळ दुखत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. खांद्याच्या व्यायामांनी आराम मिळाला तर डॉक्टरांकडे जाण्याची गरज लागणार नाही. पण खांद्यांमध्ये सूज, तीव्र स्वरूपाच्या वेदना, हात आणि खांद्यांमध्ये जाणवणारा अशक्तपणा, हातांमधल्या संवेदना जाणं, खांद्यांमध्ये हालचाल करताना त्रास होणं अशी लक्षणं दिसत असतील तर तातडीने डॉक्टरांकडे जायला हवं.

खांद्याच्या दुखण्यावर काही घरगुती उपाय करता येतील. अनेकदा जीवनशैली, चुकीच्या पद्धतीने बसणं, झोपणं यामुळे खांद्यांचं दुखणं उद्भवतं. त्यामुळे आपण जीवनशैलीत सकारात्मक बदल करणं गरजेचं आहे. नियमित व्यायाम करणं गरजेचं आहे. खांदेदुखीला कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी टाळायला हव्यात. खांद्यांमध्ये दाह जाणवत असेल तर दाह कमी करणारी औषधं घेता येतील. अन्यथा, हिरव्या पालेभाज्या, टोमॅटो, ऑलिव्ह ऑईल, मासे, स्ट्रॉबेरी, संत्री, ब्लूबेरी अशी फळं यांचा आहारात समावेश करायला हवा. दुखापत गंभीर स्वरूपाची असल्यास शस्त्रक्रियेची गरज लागू शकते. खांदेदुखी तीव्र स्वरूपाची नसेल तर गरम आणि गार पाण्याचा शेकही देता येईल.

खांद्याच्या दुखण्याची अनेक कारणं आहेत. या कारणांचा शोध घेणं गरजेचं आहे. नेमकं निदान करून त्यावर उपचार होणं आवश्यक असल्यामुळे याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि निरोगी आयुष्य जगा.

## टॉन्सिल स्टोनविषयी...


व्याधी विचार

डॉ. महेश दळे

खडे फक्त किडनीमध्येच नाही तर घशातही तयार होऊ शकतात. याला 'टॉन्सिल स्टोन' म्हणतात. फार कमी लोकांना याची जाणीव असली तरी ही एक सामान्य समस्या आहे.

हे खडे अन्न, श्लेष्मा आणि मृत पेशींमध्ये असणाऱ्या पोषक घटकांपासून बनलेले असतात. ते घशातील टॉन्सिल ग्रंथीजवळ जमा होतात. मात्र नंतर त्यामध्ये बॅक्टेरिया आणि विषाणू तयार होतात. त्यामुळे धोकादायक आजारांचा धोका वाढतो. अशा परिस्थितीत टॉन्सिल स्टोन आणि त्यामुळे होणाऱ्या समस्यांबद्दल जाणून घेणे आवश्यक आहे.

**घशात टॉन्सिल स्टोन कुठे?**




'टॉन्सिल स्टोन' घशाच्या मागील बाजूस असणाऱ्या पांढऱ्या किंवा पिवळ्या दगडाच्या तुकड्यासारखा असतो. बाहेरून पाहिल्यास हे खडे पांढरे किंवा पिवळ्या पुरळासारखे दिसतात. सुरुवातीला त्याचा आकार वाटाण्याएवढा किंवा त्याहूनही लहान दिसू शकतो. परंतु वेळीच उपचार न केल्यास, काही प्रकरणांमध्ये आकार गोल्फच्या चेंडूइतकाही मोठा होऊ शकतो.

**कोणत्या समस्या उद्भवतात?**

घशाचा अन्न गिळले जाते तो भाग म्हणजे टॉन्सिल असून ते स्नायूंनी बनलेले आहे. त्यातही भेगा असल्याने टॉन्सिल पॉकेट असेही म्हणतात. त्यामुळेच या कप्प्यांमध्ये अन्न, मृत पेशी आणि जीवाणू यातील काही घटक जमा होतात, तेव्हा हळूहळू घट्ट होऊन ते 'टॉन्सिल स्टोन'चे रूप घेतात. टॉन्सिलमध्ये खडे होणे ही एक सामान्य समस्या असते आणि अनेकदा हा त्रास असणाऱ्या लोकांना याची जाणीवही नसते. यावर वेळीच उपचार न केल्यास ते ट्यूमरचेही कारण बनू शकते.

**कानातही वेदना**

'टॉन्सिल स्टोन' तयार होतो तेव्हा सुरुवातीला श्वासाच्या दुर्गंधीशिवाय कोणताही त्रास होत नाही. परंतु खड्याचा आकार वाढू लागतो किंवा कडक होऊ लागतो तेव्हा घसा आणि कानात वेदना होतात तसेच गिळण्यास त्रास होतो. 'टॉन्सिल स्टोन' झाल्यानंतर घशात काहीतरी अडकल्यासारखे वाटते. त्यामुळे वेदनाही कायम राहतात. तेव्हा अशा कोणत्याही लक्षणांकडे दुर्लक्ष करु नये.


## तरुण वयातही वंध्यत्व समस्या

लाईफस्टाईल

डॉ. तुषार गलांडे

देशात वंध्यत्वाची समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, भारतात वंध्यत्व दर ३.९ ते १६.८ टक्क्यांच्या दरम्यान आहे. एखाद्या जोडप्याने मूल होण्यासाठी १२ महिने किंवा त्याहून अधिक काळ नियमित लैंगिक संबंध ठेवले आणि तरीही ती स्त्री गर्भधारणा करत नसेल, तर त्यास वंध्यत्व समजले जाते. आता ही समस्या तरुण वयातच महिलांमध्ये दिसून येत आहे.

आजच्या काळात जीवनशैलीतील बदल, प्रदूषण आणि वैद्यकीय परिस्थितीमुळे वंध्यत्वाची प्रकरणे वाढत आहेत. 'पीसीओएस', एंडोमेट्रिओसिस, थायरॉईड रोग, मधुमेह आणि लठ्ठपणा यांसारख्या परिस्थितींमुळेदेखील वंध्यत्व येऊ शकते. खेरीज केवळ महिलांमध्येच नाही तर पुरुषांमध्येही वंध्यत्व वाढत आहे. पुरुषांमध्ये शुक्राणूंची संख्या कमी होणे, इरेक्टाइल डिसफंक्शन यासारख्या समस्याही वाढत आहेत.



**वंध्यत्वाचा उपचार कसा केला जातो?**

एखाद्या जोडप्याला वंध्यत्वाचा त्रास होत असेल तर ते आधी औषधे घेतात आणि नंतर नैसर्गिक मार्गाने गर्भधारणेचा प्रयत्न करतात. हे शक्य नसल्यास इंट्रायूटरिन रेसेमिनेशन केले जाते. यातूनही मूल होत नसेल तर आय.व्ही.एफ. चा अवलंब केला जातो. आता तर वैद्यकीय शास्त्रात आणखी प्रगती झाली आहे. आता एग फ्रीझिंग आणि सरोगसीद्वारे गर्भधारणा होऊ शकते. तरुण वयातच महिलांची अंडी गोठविली जातात. नंतर गर्भधारणेचा निर्णय घेतला की अंडी डीफ्रॉस्ट करून 'आयव्हीएफ' मध्ये वापरली जाऊ शकतात. गेल्या काही वर्षांत 'आयव्हीएफ'चे हे तंत्रज्ञान लक्षणीय पद्धतीने वापरले जात आहे. अनेकांना त्याची मदत मिळत आहे.

**वंध्यत्व कसे टाळावे?**

ही समस्या टाळायची तर आहाराची काळजी घ्या. धूम्रपान करू नका आणि अल्कोहोलचे सेवन करू नका. गर्भनिरोधक औषधे घेणे टाळा. जीवनशैली योग्य ठेवा. झोपेची आणि उठण्याची वेळ सेट करा. दररोज किमान अर्धा तास व्यायाम करा.

## उच्च रक्तदाबाच्या रुग्णांत वाढ

लाईफस्टाईल

डॉ. प्रसन्न नेने

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ'च्या आकडेवारीवरून दिसून आले आहे, की सुमारे ३३ टक्के शहरी आणि २५ टक्के ग्रामीण भारतीय उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत. यापैकी २५ टक्के ग्रामीण आणि ४२ टक्के शहरी लोकांना हा आजार असल्याची माहिती नाही. याचे कारण म्हणजे लोकांना उच्च रक्तदाबाची लक्षणे माहीत नसतात. यामागील एक कारण म्हणजे या आजाराची लक्षणे सहज दिसून येत नाहीत. त्यामुळेच उच्च रक्तदाबाला 'सायलेंट किलर' असेही म्हणतात. चिंतेची बाब म्हणजे आता हा आजाराही तरुण वयातच होत आहे. २५ ते ४० वर्षे वयोगटातील लोकही याचे मोठ्या प्रमाणात बळी ठरत आहेत.

**तरुण वयात उच्च रक्तदाब**



उच्च रक्तदाब हा गंभीर आजार आहे. तरुणांमध्ये त्याचे प्रमाण वाढण्यामागे अनेक कारणे असू शकतात.

* **वाईट जीवनशैली :** रात्री उशिरा झोपण्याची सवय आरोग्यास हानी पोहोचवत आहे.
* **वाईट खाण्याच्या सवयी:** फास्ट फूड, प्रक्रिया केलेले अन्न आणि गोड पेये यांचे अतिसेवन. या पदार्थांमुळे उच्च रक्तदाबाची समस्या उद्भवते.
* **व्यायाम न करणे :** व्यायाम न करणे हेदेखील तरुणांमध्ये उच्च रक्तदाबाचे एक प्रमुख कारण आहे.
* **मानसिक ताण आणि चिंता:** तरुणांमध्ये मानसिक तणाव आणि चिंता या समस्या वाढत आहेत. हेदेखील उच्च रक्तदाबाचे कारण आहे.
* **धूम्रपान आणि अल्कोहोलचे सेवन:** धूम्रपान आणि अल्कोहोलचे सेवन वाढत असल्यामुळे रक्तदाब वाढू शकतो. **लक्षणे** – हा रोग तपासणीद्वारे ओळखता येतो. तथापि, काही लक्षणेही दिसू शकतात. तीव्र डोकेदुखी, छातीत दुखणे, चक्कर येणे ही यातील काही लक्षणे आहेत.


**औषध होऊ शकते बंद**

झोपणे आणि वेळेवर उठणे, व्यायाम करणे हे उपाय तुम्हाला या आजारापासून दूर नेऊ शकतात. त्याचप्रमाणे कमी प्रमाणात मीठ खाणे, मन शांत ठेवण्यासाठी ध्यान करणे यासारख्या सुधारणा करूनही हा आजार आटोक्यात ठेवता येतो.

आरोग्यभान

## कॅल्शियमची कमतरता असल्यास...

आता चुकीच्या जीवनशैलीचे परिणाम आपल्या आरोग्यावर होऊ लागले आहेत. आहारातल्या बदलांमुळे कमी वयात विविध आजारांना निमंत्रण मिळत आहे. हाडांच्या आरोग्यासाठी कॅल्शियम गरजेचं असतं. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हाडं ठिसूळ होऊ लागली आहेत. मात्र काही पदार्थांच्या सेवनामुळे शरीराला आवश्यक तेवढं कॅल्शियम मिळत नाही.




शीतपेयांमधल्या कार्बन डाय ऑक्साइड आणि फॉस्फरसमुळे हाडं ठिसूळ होतात. शरीरात कॅल्शियम योग्य प्रकारे शोषलं जात नाही. यासह चॉकलेटमधल्या काही घटकांमुळेही शरीरातल्या कॅल्शियमचं प्रमाण कमी होतं.

आहारात मिठाचं प्रमाण मर्यादित असायला हवं. मिठातल्या सोडियममुळे शरीरातलं कॅल्शियम मूत्रावाटे बाहेर निघून जातं. म्हणूनच मिठाचं प्रमाण कमी ठेवण्याचा सल्ला दिला जातो.

चहा-कॉफीचं अतिसेवनही शरीरासाठी घातक आहे. यातल्या कॅफेनमुळे शरीरातलं कॅल्शियम नष्ट होऊ लागतं.

जास्तीचा मांसाहारही घातक ठरु शकतो. प्राणीजन्य प्रथिनं हाडांचं नुकसान करु शकतात. त्यामुळे मांसाहारही प्रमाणात करावा.

जाणून घ्या

## स्पाँडिलायटिस सतावतोय?

सध्या स्पाँडिलायटिसचं प्रमाण वेगाने वाढत आहे. एके काळी प्रौढांना होणारा हा आजार आता तरुणांना विळख्यात घेत आहे. १०० पैकी एका तरुणाला आज स्पाँडिलायटिस आहे. त्यातही पुरुषांना हा त्रास होण्याची शक्यता जास्त असते. बैठी जीवनशैली, बसण्याच्या, झोपण्याच्या चुकीच्या पद्धती, पोषक आहाराची कमतरता, व्यायामाचा अभाव ही स्पाँडिलायटिसची कारणं आहेत. आयुर्वेदिक उपायांनी हा विकार नियंत्रणात ठेवता येईल.




स्पाँडिलायटिसच्या रुग्णांनी आम्ल म्हणजे आंबट तसंच कशाय पदार्थ खाऊ नयेत. लाल मांस, आंबट फळं असे अतिआम्लयुक्त पदार्थ टाळायला हवेत. बटाट्यांमुळे शरीरात वात दोष निर्माण होतो आणि त्यामुळे हाडांचं नुकसान होऊ शकतं.

स्पाँडिलायटिसमुळे जडणाऱ्या बद्धकोष्ठतेला कारक ठरणारे पदार्थ रुग्णांनी टाळायला हवेत. बद्धकोष्ठतेमुळे मानेतल्या वेदनांचं प्रमाण वाढतं तसंच मानेतले स्नायू आखडतात. गायीचं तूप वातशामक असतं. स्नेहपानासारख्या गायीचं तूप वापरून केल्या जाणाऱ्या उपचारांमुळे आराम पडू शकतो. औषधी तेलाने मसाज केल्यामुळेही आराम मिळू शकतो. शल्लकी, रसना, गुग्गुळ, गुडूची, अश्वगंधा, सुंठ ही आयुर्वेदिक औषधं या विकारात उपयुक्त ठरतात.

हृदयारोग्य

## 'हार्ट फेल्युअर'चा मोठा धोका

भारतात मधुमेहानंतर हृदयरोगाचा धोका सर्वाधिक मानला जातो. मधुमेहामध्ये रुग्णाचे एकाएकी प्राण जाण्याची शक्यता कमी किंवा अगदीच नगण्य असते. मात्र हृदयरोगामध्ये हृदयविकाराचा झटका येऊन रुग्णाचे प्राण तडकाफडकीही जाऊ शकतात. विशेषत: 'हार्ट फेल्युअर'मध्ये रुग्णाचे प्राण जाण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे हृदयरोग, त्यातही 'हार्ट फेल्युअर' अधिक गंभीर मानला जातो. पण डॉक्टरांच्या मते 'हार्ट फेल्युअर' म्हणजे जीवनाचा अंत हे समीकरण आता बदलू लागलं आहे.



'हार्ट फेल्युअर'मध्ये रुग्णाच्या हृदयाचे स्नायू हळूहळू कमकुवत होत जातात आणि संपूर्ण शरीराला लागणाऱ्या रक्ताचा पुरवठा करण्यास असक्षम ठरतात. या व्याधीच्या सुरुवातीला शरीराचा रक्तपुरवठा वाढवण्यासाठी हृदय विशेष प्रयत्न करून स्वत:चा आकार वाढवतं आणि अधिक जोरात आकुंचन पावतं. याची परिणती हृदयाचा आकार वाढण्यात होते. या अवस्थेला 'एन्लार्ज्ड हार्ट' असं म्हटलं जातं. यात हृदयाच्या आकुंचन पावणाऱ्या स्नायूंचा आकार वाढतो आणि एकूणच स्नायूंचं वजनही वाढतं. यामुळे सुरुवातीला तरी हृदय अधिक जोरात रक्त 'पंप' करतं. वेगात रक्त पंप केल्यामुळे हृदयाचं 'आउटपुट' वाढतं. हृदयाने स्वत:हून केलेल्या या सुधारणेमुळे समस्या झाकली जाते, परंतु समस्येवर उत्तर शोधलं जात नाही. त्यामुळे शरीर आणि हृदय यांच्यातला ताळमेळ हरवतो. परिणामी, रुग्णामध्ये थकवा येणं, श्वसनाला त्रास होणं आणि 'हार्ट फेल्युअर'ची इतर लक्षणं दिसू लागतात. हृदयविकाराचा किंवा उच्च रक्तदाबाचा त्रास असलेल्या आणि हृदयविकाराच्या झटक्यांचा इतिहास असलेल्या रुग्णांमध्ये 'हार्ट फेल्युअर' होण्याची शक्यता अधिक असते. देशात एकूण आठ ते दहा दशलक्ष रुगण 'हार्ट फेल्युअर'मुळे त्रस्त आहेत. शहरी भागात हे प्रमाण लोकसंख्येच्या १० टक्के तर ग्रामीण भागात ते लोकसंख्येच्या चार ते पाच टक्के आहे. अमेरिकेसारख्या पाश्चिमात्य देशांच्या तुलनेत भारतात 'हार्ट फेल्युअर'ची व्याधी कमी वयात जडू शकते. भारतीय रुग्णांमध्ये हे वय सरासरी ५६ ते ६१ वर्षं असून पाश्चिमात्य देशांमध्ये ते ७२ वर्षं आहे.

